म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १०१६.

REFBK-0003832

॥ श्रीउद्योगदेवता प्रसन्न ॥

ज्ञानमित्र-पुस्तकमाला-पुष्प पंधरावें.

# माझें गुरुस्थान.

लेखक,

' महाराष्ट्रभाषाचित्रमयूर '

स्वर्गीय, कृष्णाजी नारायण आठल्ये,

एडिटर; केरळकोकिळ व नवमन्वंतर.

मराठी ग्रंथ संग्रहालय शाखा
१०१६
३०११५५
३८३२
REFBK-0003832

...दक,

...व्हाण.

...यावृत्ति. ] फेब्रुवारी १९२९. [ किं. बारा आणे.

All rights reserved by the Publisher.

ॐ

सद्गुरुवांचोनी सांपडेना सोय ।
धरावे ते पाय आधीं आधीं ॥
आपणांसारिखें करिती तात्काळ ।
नाहीं काळवेळ तयालागीं ॥ १ ॥

—तुकाराम.

हें पुस्तक नारायण बळवंत चव्हाण यांनीं आपल्या 'हरिहर'
नामक छापखान्यांत छापून ज्ञानमित्र कचेरी, शनवार
पेठ घर नं. ४८३ पुणें सिटी येथें प्रसिद्ध केलें.

# पहिल्या आवृत्तिची प्रस्तावना.

अनुक्रम १०३०७
नों. दि.

जगामध्यें साधारपणें मातापित्यांची योग्यता फार मोठी समजतात. परंतु गुरूची योग्यता त्यांच्याहूनही फार मोठी आहे. कारण, मतापितरें जें सुख देतात तें क्षणिक असतें; अशाश्वत असतें; आणि गुरु जें सुख देतो तें शाश्वत असतें; अविनाशीं असतें. म्हणजे गुरु हा आपला उद्धार-कर्ता आहे; परमार्थिक लाभ करून देणारा आहे; इतकेंच नव्हे, तर गुरु हा प्रत्यक्ष परब्रह्मस्वरूपीच; असें सर्व साधुसंतांनीं सरशहा वर्णन केलें आहे. रंकाला राव करण्याचें, जडाला दिव्य करण्याचें व नराला नारायण करण्याचे सामर्थ्य एका सद्गुरूच्याच आंगीं आहे. ह्याचे प्रत्यंतर पहावयास फार लांब जाणें नको. खुद्द ह्याच पुस्तकांतील गुरुशिष्याची जोडी पहावीं म्हणजे झालें. श्रीमद्विवेकानन्द स्वामींचें 'गुरुस्थान' म्हणजे भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस हे होत. हे पुरुष अगदीं साधे होते. विद्वान् तर मुळींच नव्हते, म्हटलें तरी चालेल. कारण त्यांस लिहितां वाचतां येत नसल्याचें स्वामींनींच सांगितलें आहे. तरी त्यांच्या आंगीं परमेश्वराचें अद्भूत तेज चमकत होतें. ते आपल्या साध्या

व मधुर भाषेनें आणि प्रेमळ दृष्टांतांनीं दुसऱ्याचें मन तेव्हांच आकर्षण करून घेत. इतकेंच नव्हे, तर त्यांच्या अंत:करणांत दिव्य ज्ञानाचा तत्काल प्रकाश पाडीत. त्यामुळें त्यांच्या पुढें कसलाही नास्तिक जावो कीं आस्तिक जावो; विद्वान् जावो कीं अक्षरशत्रु जावो; ईश्वरी तेजांतच लीन होऊन जाई. खुद्द विवेकानन्दांचीच गोष्ट पहाना! ते स्वत: जाडे विद्वान् होते; पदवीधर होतें; त्यांच्या मनावर पाश्चात्य ज्ञानाचा संस्कार झालेला होता. इतकेंच नव्हे तर ते परिपूर्ण पाखंडी होते. तरी सुद्धां त्या साध्या पण ईश्वरस्वरूपी दैदीप्यमान महात्म्यापुढें ते अगदीं विलीन होऊन गेले. ते एकटेच नव्हेत, तर त्यांच्यासारखेच कितीएक युनिव्हर्सिटीचे पदवीधरही कनक व कांता ह्यांवर पाणी सोडून त्यांचे निस्सीम बनलें. केवढा अद्भूत प्रभाव हा! म्हणूनच तुकारामांनीं म्हटले आहे, कीं, " लोहपरिसाची न साहे उपमा " लोखंडाचा व परिसाचा दृष्टांत सुद्धां गुरूंना कमीच पडतो. कारण, परीस, हा लोखंडाचें सोनें करतो; परंतु पुन्हां त्या सोन्यानें कांहीं दुसऱ्या लोखंडाचें सोनें होत नाहीं. म्हणजे परिसाला कांहीं दुसरा परीस निर्माण करतां येत नाहीं. आणि सद्गुरू हे दुसऱ्यालाही सद्गुरूच करून सोडतात. हें त्यांचें सामर्थ्य केवळ अद्वितीय होय.

विवेकानन्द हे स्वतः विद्वान् होते; त्यांनीं नाना प्रकारच्या शेंकडों ग्रंथांचें परिशीलन केलें होतें; असें असतांही यांच्या त्या साध्या गुरूवर केवढी बरें त्यांची भक्ति! ह्या लहानशा पुस्तकांत त्यांनीं त्या महात्म्याच्या ईश्वरी तेजानें वर्णन मोठें रसभरित केलें आहे. आणि तें सांगतांना त्यांचा कंठ इतका सद्गदित झालेला दिसतो कीं, मी आतां त्यांच्या-संबंधानें किती सांगूं आणि किती न सांगूं असें त्यांस होऊन गेल्याचें स्पष्ट नजरेस येतें. गुरूचा मुख्य प्रसाद म्हणजे परमार्थज्ञान हा होय. तो होणें परम दुर्घट आहे. कारण, तोंडच्या गोडगोड गोष्टी पाहिजे त्या विद्वानास सांगतां येतील; परंतु ब्रह्मज्ञानाचा अनुभव फार दूर आहे. तो खऱ्या खऱ्या वैराग्यावांचून कधींही प्राप्त व्हावयाचा नाहीं; म्हणूनच "चणे खावे लोखंडाचे, तेव्हां ब्रह्मपदीं नाचे" किंवा "ब्रह्मज्ञान नव्हे लेंकुराच्या गोष्टी, तेथें व्हावा पोटीं अनुभव" "मेल्या मनुष्याचीं न धरिती आस, तैसा हो उदास संसाराशीं" असें तुकोबांनीं म्हटलें आहे. ह्यावरून वैराग्य हेंच काय तें ईश्वरी तेज आहे. तें जो कोणी दुसऱ्याच्या अंतःकरणांत उत्पन्न करतो तो महात्मा धन्य होय. स्वामी विवेकानन्दांनीं आपल्या गुरूचा सर्व जगास हाच निरोप सांगितला आहे कीं, तुम्हीं वैराग्यसंपन्न व्हा, तरच तुमचा तरणो-

पाय आहे. तरच तुम्हांला परमार्थज्ञानाचा लाभ होईल. तो लाभ प्राकृत जनांसही घडावा म्हणून त्यांच्याच मुखातून निघालेलें गुरुमाहात्म्यामृताचें प्रतिबिंब लोकोपयोगाकरितां म्हणून आम्हींही सज्जनापुढें ठेविलें आहे. तें ग्रहण करण्यास वाचकांच्या अंतःकरणांतही परमार्थज्ञानजिज्ञासेचा अंकूर फुटलेला असेल तर उत्तम. पण तो नसला तरी सद्गुरुकृपाप्रसादसामर्थ्यानें तो उत्पन्न होऊन या परमार्थाचा—ईश्वरी तेजाचा यत्किंचित अंश तरी जिज्ञासूंना मिळो अशी इच्छा करून ही अल्प प्रस्तावना पुरी करतों.

पुणें.
ता. १५ फेब्रुवारी, सन १९१७. } पुस्तककर्ता.

---

## द्वितियावृत्तिचे दोन शब्द.

या पुस्तकाची प्रथमावृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर ज्या सूचना आल्या त्यांचा योग्य विचार करून शक्य त्या सुधारणा या वेळीं केल्याच आहेत. टीपांच्या रूपानें भगवान् रामकृष्णांच्या चरित्राचा विस्तार केला आहे. तसेंच **रामकृष्ण बोधामृतांत** विषयाची स्वतंत्र हेडिंगें देवून मुमुक्षु वाचकांसाठीं अमृततुल्य वचनांच्या संग्रहाची जोड दिली आहे. त्यामुळें ही आवृत्ति विशेषच लोकप्रिय होईल अशी आम्हांस आशा आहे. या कामीं आमचे मित्र श्रीयुत, आण्णासाहेब आठल्ये यांनीं आम्हांस जे सहाय्य केलें त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत अभारी आहों. प्रकाशक.

दा. क्र. ...........

ॐ

# श्रीरामकृष्ण--स्तोत्र.

## श्लोक

[ शार्दूलविक्रीडित. ]

१

चांडालादिक सर्व तृप्त करि जो पाजूनि बोधामृत ।
लोकातीत जनीं सदैव विचरे सर्वांस झाला श्रुत ॥
रामाचा अवतार होउनि जगा झाली कृपा-साउली ।
श्रीकृष्णें सदयें मुमुक्षुस दिली गीता जगन्माउली ॥

२

त्यांचें ज्ञान रहस्य सर्व उघडें सांगावयाला जना ।
बोले शांत मृदुस्वरें कधिं करी सिंहापरी गर्जना ॥
पाखांडी बसती निमूट अवघे पाहोनि ज्याची स्थिती ।
जन्मे हा जणुं रामकृष्ण भगवान् पाहोनि सद्यःस्थिती ॥


—स्वामी विवेकानन्दांचा प्रतिध्वनि.

# माझें गुरुस्थान.

**जन्म.**

शके १७५६ फाल्गुन शु॥२

( स. १८३३, ता. २० फेब्रुवारी. )





**समाधि.**

शके १८०८ भाद्रपद शु॥१

( स. १८८६, ता. १६ आगष्ट. )

माझें गुरुस्थान.



श्रीभगवान् रामकृष्ण परमहंस.

( Harihar Press, Poona City. )

३०३७
९८३०० क्रं. नि. १०१६ नों. दि. ३०/७/५४

ॐ

# माझें गुरुस्थान

---

## श्लोक

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ १ ॥

"धर्माचा जेव्हां जेव्हां ऱ्हास होतो, व अधर्माचें प्राबल्य माजतें, तेव्हां तेव्हां मनुष्यजातीचा उद्धार करण्याकरितां मीच अवतार घेऊन येतों," असें श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत सांगितलें आहे. पृथ्वीवर ज्या ज्या वेळीं मनुष्यांची वस्ती वाढते, नानाप्रकारचे चमत्कारिक प्रसंग गुदरतात, आणि कांहीं तरी नवीन व्यवस्था करण्याची आवश्यकता भासूं लागते, त्यावेळीं एका विविक्षित स्फूर्तींची लाट उसाळत असते. जड आणि चैतन्य ह्या दोन तत्वांनींच मनुष्यदेह बनलेला असल्यामुळें, त्याचीं सर्व कार्यें स्वार्थ व परमार्थ किंवा ऐहिक व पारलौकिक ह्या दोन प्रकारांनींच होत

---

* गुरु हाच ब्रह्मदेव, गुरु हाच विष्णु, व गुरु हाच महादेव होय; इतकेंच नव्हे, तर गुरु हेंच साक्षात् परब्रह्म होय. ह्याकरितां त्या श्रीगुरूंस नमस्कार असो.

असतात. ह्या दोन बाजूंच्याच लाटा जगांत नेहमीं उसळत असतात. जडाची किंवा भौतिकशास्त्राची प्रगति ही जी एक बाजू ती 'युरोप'नें आजमितीला अगदीं शिखरास नेऊन पोंचविली आहे. आगबोटी काय, आगगाड्या काय, तारायंत्रें काय, विमानें काय, सारेंच लोकोत्तर! दुसरी जी बाजू परमार्थाची ती 'एशिया' खंडानें पटकावली आहे. परमार्थाचें मूलस्थान 'एशिया' खंड आहे ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. आजमितीला परमार्थशास्त्रामध्यें कांहीं अधिक प्रगति व्हावी असें मनुष्यमात्रास वाटूं लागलें आहे. आजकाल भौतिक कल्पनांचा प्रभाव व छाप दृष्टीस पडूं लागल्यामुळें त्यांचाच पगडा जिकडे तिकडे पडून मनुष्याला आपल्या मूळच्या दिव्य गुणांचा विसर पडत चालला आहे. त्यामुळें त्याला रात्रंदिवस ह्या नश्वर गोष्टींवरच अवलंबून रहावें लागतें. ह्याकरितां आतां हीं द्रव्यार्जनाचीं यंत्रें थोडीं तरी बंद पडलीं पाहिजेत व कांहीं तरी नवीन वळण लागलें पाहिजे. 'ऐहिकविषयांचें जमलेलें धुकें आतां बाजूस सारा, बाजूस सारा,' अशी ओरड सुरू झाली आहे, व त्याला अनुकूल असा वाराही पण सुटला आहे. त्याचा लोंढा फोपावत चालला आहे. आतां यच्चावत् मनुष्यजातीला आपलें खरें ध्येय काय ह्याची तो पुन्हां जाणीव करून देईल, आगे

ह्याचा उगम कोठून होणार म्हणाल तर, त्याचें मूलस्थान जें 'एशिया' त्याच्यांतूनच. आपल्या ह्या जगाची घटना श्रमविभागाच्या तत्त्वावरच झालेली आहे. एकच मनुष्य साऱ्या गोष्टी करूं म्हणेल तर तें व्यर्थ होय. तसेंच एखादें राष्ट्र साऱ्या गोष्टी करूं म्हणेल तर तें त्याहूनही व्यर्थ होय. पण आपण किती पोरकट आहों! मुलाला लहानपणीं वाटत असतें कीं, आपण जें काय मिळवावयाचें तें फक्त एक खेळ! साऱ्या ब्रह्मांडांत उत्तम व प्रिय वस्तु काय ती तीच. तद्वत् ज्यांना आजकाल भौतिक ऐश्वर्य प्राप्त झालें आहे, त्यांना वाटतें कीं, जगांत येऊन इतिकर्तव्य म्हणून जें काय करावयाचें तें हेंच. ह्याचेंच नांव खरी उन्नति, आणि सुधारणा. सुधारणा म्हणून जी काय म्हणतात ती हीच. आणखी दुसरीं कोणतींही राष्ट्रें हें साध्य करण्याची खटपट न करतील, किंवा तसें सामर्थ्य अंगीं न आणतील, तर त्यांच्यांत कांहीं अर्थ नाहीं! तीं केवळ मृतवत् होत. त्यांचें अस्तित्व सारेंच निरुपयोगी! पण दुसऱ्यापक्षीं 'पौर्वात्य' लोकांना सुद्धां असेंच वाटतें कीं, केवळ भौतिक सुधारणा हीसुद्धां निरुपयोगीच आहे. 'पौर्वात्य' देशांत असा एक श्लोक आहे कीं:—

सुरूपं शरीरं नवीनं कलत्रं। धनं मेरुतुल्यं वचश्चारुचित्रम्।
हरेरंघ्रियुग्मे मनश्चेन्न लग्नं। ततः किं ततः किं ततः किं ततः किं॥१॥

"देह सुखस्वरूप असला, पत्नी तरुण मिळविली, संपत्ति मिळवून नवकोट नारायण बनला, बोलण्यांत मोठा पटाईत झाला, आणि परमार्थांत जर भोंपळ्यायेवढें पूज्य असलें तर त्या साऱ्याला घेऊन काय करावयाचें आहे!" ही जुनी पद्धत आणि ही नवी पद्धत.

थोरवी व सामर्थ्य हें प्रत्येक पद्धतीला आपआपल्यापरी आहेच. ह्याकरितां आजच्या मितीला जर नवीन वळण देणें असेल, तर त्यांत ह्या दोन्हीही पद्धतींचें एकीकरण झालें पाहिजे; म्हणजे दोन्हीही अंगें सारखींच ऊर्जितावस्थेंत आलीं पाहिजेत. ह्या नव्या लोकांना जितकी बाह्यसृष्टि खरी वाटते, तितकीच जुन्या लोकांना अंतःसृष्टि खरी वाटते. जुन्या लोकांना आपल्याला जें जें काय पाहिजे असेल, अथवा हवेंसें वाटेल, तें तें सर्व अध्यात्मांतच मिळेल असें वाटतें. आपल्या निर्वाहाला जें जें काय आवश्यक असेल तें तें खरोखर परमार्थांतच सांपडतें. नव्या लोकांना मात्र हें म्हणणें केवळ स्वप्नवत् भासतें. पण उलट पक्षीं जुन्या लोकांना नव्याचें सर्व वैभव स्वप्नवत् भासतें. ते म्हणतात कीं, ही ह्यांची करणी म्हणजे घटकाभर खेळावयाचे पोरखेळ होत. मोठमोठालीं स्त्रीपुरुषें जीं सोन्यारूप्यांत व ऐषआरामांत लोळत असतात, त्यांजकडे पाहून त्यांना हसूं येतें.

कारण, आज ना उद्यां तें सर्व लयास जाणार हें ते जाणून असतात. प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षाला 'हें ह्यांचें केवळ मनो-राज्य आहे' असें म्हणतो. परंतु खरा विचार केला तर नव्या पक्षाइतकाच हा जुना पक्षही मनुष्यजातीला आवश्यक आहे, आणि आपण क्षमा कराल तर मला वाटतें तो फार फार आवश्यक आहे. यंत्रातंत्रांच्या योगानें कांहीं कधीं मनुष्याला सुख मिळत नाहीं, आणि मिळणारही पण नाहीं; तरी त्यापासूनच सुख होईल असें आम्हीं मानावें, म्हणून ते खटपट करीत असतात. जणों काय सुख म्हणून जें काय आहे तें यंत्रतंत्रांतच भरलेलें आहे! पण खरा प्रकार पाहिला तर यंत्रामध्यें कांहीं सुख नाहीं. सुख असतें तें मनांतच असतें, मन पूर्णपणें ज्या मनुष्याच्या ताब्यांत येईल तोच मनुष्य सुख मिळवूं शकतो. दुसऱ्या कोणासच तें मिळत नाहीं. यंत्राचें सामर्थ्य तें कितीसें? जो विद्युद्युक्त तारेंतून बातमी पाठवितो त्या मनुष्याला येवढा बुद्धिवान् तरी कां म्हणावें? निसर्ग हा आपल्या मनोवेगाचें प्रत्येक कार्य निमिषानिमिषाला त्याच्यापेक्षांही लाखोपट अधिक वेगानें करीत नाहीं काय? मग निसर्गाच्याच पायावर लोळण घेऊन त्याचीच पूजा कां करूं नये? पृथ्वींतील सर्व महाभूतांवर अंमल चालवितां आला, प्रत्येक परमाणूचे आम्ही स्वामी बनलों,

तरी त्याचा उपयोग काय ? आपल्यामध्यें जी सुखोत्पत्तीची शक्ति आहे, तिला जिंकीपर्यंत कोणत्याही मनुष्याला कशानेंच सुख होणार नाहीं. ह्या निसर्गालाच जिंकण्याकरितां वश करण्याकरितां—मनुष्याचा जन्म आहे ही गोष्ट खरी. परंतु नवे लोक ह्या जडालाच किंवा बाह्य सुधारणेलाच निसर्ग असें समजतात. आतां जड सृष्टीमध्येंसुद्धां विलक्षण सामर्थ्य आहे ही गोष्ट खरी आहे. उदाहरणार्थ—पर्वत समुद्र, नद्या ह्यांच्यामध्यें सुद्धां विलक्षण पराक्रम व नानाप्रकार उत्पन्न करण्याचें सामर्थ्य आहे, हेंही कांहीं खोटें नाहीं. पण मनुष्याच्या अंतर्भागांत जें सामर्थ्य आहे तें ह्याहून किती तरी अद्भुत आहे ! तें चंद्र, सूर्य, तारे ह्यांच्यापेक्षांही खोल, जड सृष्टीपेक्षां अत्यंत गूढ आणि आमच्या ह्या क्षुद्रजीवापेक्षां फार सत्ताधीश असें आहे. अलीकडच्या भौतिकशास्त्रांत अर्वाचीन लोक जसे प्रवीण आहेत, तसे ह्या अध्यात्मशास्त्राच्या अभ्यासांत जुने लोक पटाईत आहेत. ह्याकरितां जेव्हां जेव्हां परमार्थविद्येची सरशी होण्याची वेळ येईल तेव्हां तेव्हां ती 'एशियां'तूनच होणें उचित आहे. जुन्या लोकांना जेव्हां जेव्हां यंत्रें वगैरे भौतिक कला पाहिजे असतील, तेव्हां तेव्हां त्यांनीं त्या ह्या नव्या लोकांच्या चरणीं लीन होऊनच शिकल्या पाहिजेत. तसेंच

नव्या लोकांना जर अध्यात्मशास्त्रांत किंवा परमार्थांत गति करून घेणें असेल, ईश्वरस्वरूपाचें ज्ञान संपादणें असेल, किंवा आत्मस्वरूपाविषयीं विचार करावयाचा असेल, ब्रह्मांडांतील गूढ रहस्याची ओळख करून घेणें असेल, तर त्यांनींही जुन्या लोकांच्या चरणीं लागूनच तें शिकलें पाहिजे.

आतां ज्या मनुष्यानें हिंदुस्थानांत अशा प्रकारची चळवळ करून सोडली, त्या एका मनुष्याचें चरित्र मी आज आपल्यापुढें मांडणार आहें. पण तें चरित्र सांगण्यापूर्वी हिंदुस्थानांतील लोकांच्या ज्ञानांतील गूढ काय आहे तें मी तुम्हांस समजून देतों. नश्वर वैभवाला पाहूनच ज्यांची दृष्टि दिपून गेली आहे, खावें, प्यावें आणि द्रव्यार्जन करावें हाच ज्यांचा प्रधान हेतु, यथास्थित द्रव्यसंग्रह करावा येवढींच ज्यांची इतिकर्तव्यता, बाह्यसुखें हीच सारी ज्यांची कल्पना, पैसा हाच ज्यांचा परमेश्वर, क्षणभंगुर संसारामध्यें मजा मारून मृत्यूची किंवा त्याच्या पुढची जे कल्पना सुद्धां कधी मनांत आणीत नाहींत, ती गोष्ट मनांत आली की ज्यांच्या अंगांत कांपरें भरतें, संसारांतील ज्या ऐषआरामांत ते गुंग असतात, त्यापेक्षां अधिक उच्चप्रतीचे विचार मनांत आणावयास जे भितात, असे लोक हिंदुस्थानांत गेले, तर त्यांना तेथें काय बरें दृष्टीस पडेल ? त्यांना जिकडे तिकडे दारिद्र्य, देवभो-

ळेपणा, भ्रान्ति, अज्ञान व गबाळग्रंथच सारा दृष्टीस पडेल. असें कां ? तर त्यांच्या मनांत पोषाख, विद्या, व चारचौघांत शिष्टपणाची वागणूक, येवढ्याचेंच ज्ञान असतें. नव्या राष्ट्रांचें तसें नाहीं. तीं आपल्या बाह्यवैभवाच्या सुधारणेची खटपट करित असतात. 'हिंदुस्थान'ची पद्धत त्याहून फार भिन्न आहे, हें लक्ष्यांत ठेवावें.

आपल्या शेजारच्या मुलखावरही हल्ला करून दुसऱ्यावर कधींच वर्चस्व न मिरविणारी, दुसऱ्याचें म्हणून जें काय असेल त्याचा कधींही अपहार न करणारी, अशी मानवी इतिहासामध्यें आपल्याला हिंदुस्थानांतीलच एक जात काय ती आढळेल. तिचा दोष म्हणून जो काय तो येवढाच कीं, तिच्या जमिनी—नव्हे तिचीं डोकीं सुद्धां—इतकीं सुपीक आहेत कीं, तेथील लोक काबाडकष्ट करूनच आपला द्रव्यसंचय करतात. त्यामुळें इतर राष्ट्रांना मोह उत्पन्न होऊन तीं त्यांच्यावर चढाई करून येतात, व त्यांना लुटतात. त्यांना कितीही लुटलें, जंगली म्हटलें, रानटी म्हटलें तरी त्याचा त्यांना विधिनिषेध वाटत नाहीं. त्यांची नेहमीं समाधानवृत्तीच असते. उलट सर्व जगाला देण्यासाठीं ईश्वरी लीलेचा ते शोध करतात; मनुष्यस्वभावांतील गूढ लोकांपुढें उघड करून देतात, आणि सत्यस्वरूपाचा पुतळा जो परमेश्वर त्याच्या

आड आलेला पडदा ते फाडून टाकतात. कारण, त्यांची एकटयाचीच काय ती भ्रांति गेलेली असते. त्यांना हें माहित असतें कीं, सत्य आहे तें ह्या सर्व बाह्यपदार्थांच्या आणि जडाच्या पलीकडेच आहे, आणि तोच मनुष्यातील ईश्वरी अंश होय तो पापानें मळत नाहीं, अपराधानें कधी बिघडत नाहीं, विस्तवानें जळत नाहीं, आगीनें पोळत नाहीं, त्याला पाणी कधीं भिजवीत नाहीं, उष्णता कधीं शोषित नाहीं, किंवा मृत्यूही त्याला मारूं शकत नाहीं. 'पाश्चिमात्य' लोक मोहरांच्या थैलीला ज्याप्रमाणें जीव कीं प्राण समजतात, त्याप्रमाणें ह्या आत्मस्वरूपाला ते लोक जीव कीं प्राण समजतात. देशाभिमानाचें नांव काढलें कीं, आपल्याला जसें स्फुरण चढतें आणि आपण मोठ्या आनंदानें तोफेच्या तोंडांत शिरण्यास उडी मारतों, किंवा आपल्या देशाकरितां आपण जसे आपल्या प्राणावर उदार होतों, त्याप्रमाणेंच ईश्वराचें नांव घेतलें कीं, हिंदुस्थानच्या लोकांची अवस्था होते. जग हें केवळ कल्पनामय आहे. सर्व कांहीं स्वप्नवत् व क्षणभंगुर आहे, अशी जेव्हां मनुष्याची खात्री होते, त्यावेळीं तो आपलीं वस्त्रेंपात्रें फेंकून देऊन, आपल्याला जें काय ज्ञान झालें तें सिद्ध करून दाखविण्यासाठीं आपल्या धनदौलतीकडे सुद्धां दुर्लक्ष्य करतो. आपला आत्मा हा अमर आहे अशी

मनाला खूण पटली म्हणजे एखादा मनुष्य नदीच्या कांठावर बसून, आपण जशी एखादी गवताची काडी फेंकून देतों, त्याप्रमाणें आपलें शरीरही नदींत टाकण्यास तयार होईल. हिंदुस्थानांतील लोकांचें ह्यांतच शौर्य दिसून येतें. मृत्यु म्हणजे आपला एक बंधूच आहे असें त्यांस वाटतें. कारण आपल्याला मुळीं मृत्यूच नाहीं, अशी तेथें प्रत्येकाची खात्रीच झालेली असते. दुसऱ्यांच्या स्वाऱ्या सहन करण्यांत, दुसऱ्यांच्या जुलुमाखालीं राहण्यांत, आणि झोटिंग बादशाही सोसण्यांत ते तरबेज झालेले आहेत. त्यांच्या अंगांत जें एक प्रकारचें धैर्य आहे, त्याच्या योगानें ते अजिंक्य झालेले आहेत. म्हणूनच आजपर्यंत तें राष्ट्र अस्तित्वांत राहिलें आहे. आणि त्या राष्ट्रांत आजच्यासारख्या अत्यंत भयंकर व अनर्थकारक दिवसांतही आध्यात्मिक महात्मे उदयास आल्यावांचून रहात नाहींत. ' पाश्चिमात्य ' लोक ज्याप्रमाणें भौतिक शास्त्रांत व राजकीय बाबतींत नवे नवे पंडित निर्माण करतात, त्याप्रमाणेंच ' एशिया ' ही आध्यात्मिक विषयांतील सत्पुरुष निर्माण करतो. चालू शतकाच्या आरंभीं जेव्हां ' पाश्चात्य ' लोकांची नजर ' हिंदुस्थाना' कडे वळली, तेव्हां ' पाश्चिमात्य ' विजयी लोक हातांत तरवार घेऊन महर्षींच्या मुलांना उपदेश करूं लागले कीं, तुमच्या जाती अगदीं हलक्या आहेत. तुमची

ग्रं. क्र. ७०७५ नों. दि. ३०।७।५४

जात म्हणजे शुद्ध अविचारी लोकांची एक जात होय. तुमचा धर्म म्हणजे निखालस भाकड कथा. आणि ईश्वर, आत्मा वगैरेच्या संबंधानें तुम्ही जें जें काय प्रतिपादन करतां तें तें केवळ शुष्क पांडित्य होय. त्यांत तिळमात्रही अर्थ नाहीं. हजारों वर्षें केलेली तपश्चर्या व हजारों वर्षें स्वीकारलेलें कडकडीत वैराग्य सारें फुकट! हें ऐकिलें म्हणजे 'युनिव्हर्सिटींतील तरुण लोकांच्या मनांत असा संशय उत्पन्न होतो कीं, खरोखरच असें असेल तर हें आपलें राष्ट्र आज ना उद्यां काळाच्या जबड्यांत सांपडल्यावांचून राहणार नाहीं. पोरबुद्धीच्या स्वभावामध्यें हेच विचार घोळूं लागतात आणि तमाम देशांतील लोकांस असेंच वाटूं लागतें कीं, तर मग आपणही आतां ह्या पाश्चात्य लोकांच्या तत्त्वावर आपले जुने ग्रंथ फाडून टाकावयाला, तत्वज्ञान जाळून भस्म करावयाला ह्या आमच्या गुरूंना हाकून द्यावयाला, आमचीं देवळें जमीनदोस्त करावयाला प्रारंभ करूं या.

विजयश्रीचा झेंडा लावणारे अर्वाचीन लोक, आपल्या तरवारीनें व बंदुकीनें एका क्षणांत आपल्या धर्माचा खरेपणा सप्रमाण सिद्ध करून दाखवितात. जुने जेवढे जेवढे म्हणून मार्ग आहेत तेवढे तेवढे निखालस भोळेपणाचे व मूर्तिपूजकांचे आहेत असें म्हणत नाहींत काय! झालें तर; आतां

आपण हें चट सारें मोडून टाकूया. मुलांना आणून शाळेंत घालतात व त्यांनाही हें सुधारकी शिक्षण मिळतें. ह्यामुळें त्यांच्या मनांतही अगदीं लहानपणापासून ह्याच कल्पना भरलेल्या असतात. तेव्हां त्यांच्या अंतःकरणांत असले संशय उत्पन्न होतात ह्याबद्दल नवल वाटावयास नको. खऱ्या सत्य-शोधाविषयीं मी बोलत नाहीं, किंवा देवभोळेपणा सोडून देण्याविषयीं माझें कांहीं म्हणणें नाहीं. परंतु हल्लीं सत्य म्हणून जें पुढें आलेलें आहे, त्यासंबंधानें 'पाश्चिमात्य' लोक काय बरें म्हणतात? पाद्री लोकांनीं तेथें गेलें पाहिजे, वेद सारे जाळून टाकले पाहिजेत, कारण सारें 'युरोप' असें म्हणतें! हाच प्रतिध्वनि जिकडे तिकडे घुमत राहिला आहे, आणि त्याची जी एक लाट उसळली आहे, तिलाच हिंदुस्थानांत 'सुधारणा' असें म्हणतात.

कोणाला केव्हां कां होईना आपला देश जर सुस्थितीला आणावयाचा असेल तर त्याला तीन गोष्टी अवश्य आहेत. पहिली गोष्ट म्हणजे तसें वाटणें. तुमच्या बंधूंची तुम्हांला खरोखरच कळकळ येते काय? जगामध्यें किती बरें दुःख झालें आहे? अज्ञान व देवभोळेपणा किती बरें फैलावला आहे? ह्या गोष्टी तुमच्या मनांत येतात काय? सारी मनुष्यें आपले बंधूच आहेत, ही भावना तुमच्या मनांत कधीं

उत्पन्न होते काय! ती कल्पना तुमच्या नखशिखांत फिरते काय? ती तुमच्या रक्तांत खेळते काय? ती तुमच्या शरीराच्या प्रत्येक ज्ञानतंतूंत व रोमारोमांत ठाणें देऊन बसते काय? त्या कळकळीनें तुमचें अंतःकरण थबथबून गेलें आहे काय? इतकें असेल तर एक पायरी तुम्ही वर चढलां म्हणून समजा. नंतर आपल्याच मनाशीं विचार करावा कीं, आपल्याला ह्यावर एखादा उपाय सांपडेल किंवा नाहीं? आणि जे तुम्ही मोठ्या डौलानें उभे राहून माणसांना हाका मारमारून सांगतां कीं, ह्या जुन्या सर्व गोष्टी सोडून द्या, त्या तुम्हांला तरी त्यांतून मुक्त होण्याचा एखादा मार्ग सांपडला आहे काय? जुन्या कल्पना साऱ्या भोळसरपणाच्या असतील, पण त्या भोळसरपणाच्या ढिगांतूनच सुवर्णाचे व सत्याचे गठ्ठे भरलेले आहेत. मुळींच गदळसदळ नाहीं, असें शुद्ध सोनें राखण्याचीं साधनें तुम्हांला तरी सांपडलीं आहेत काय? इतकें सारें तुम्हीं केलेंत तर ही फक्त दुसरी पायरी झाली. नंतर आणखी एक पाहिजे. तें हें कीं, तुमचा हेतु काय? तें काम आपण द्रव्याच्या लालसेनें किंवा कीर्तीच्या लालसेनें किंवा अधिकाराच्या आशेनें कधीं करणार नाहीं, असा तुमचा दृढ निश्चय आहे काय? आपल्या कल्पना आपण खरोखरच अमलांत आणूं शकूं आणि तें काम पुढें

नेटानें चालवूं सारें जग जरी आम्हांला चिरडावयाला लागलें तरी सुद्धां मागें सरणार नाहीं, अशी तुमची खरोखरच खात्री आहे काय? आपण कांहीं भलतें सलतें करीत नाहीं, त्या गोष्टीचा आपण पूर्णपणें विचार केला आहे, त्याची आपल्याला इच्छा आहे, तेंच कर्तव्य आपण करणार. प्राणावर गुदरलें तरी सोडणार नाहीं, इतकी तुमची हिंमत आहे काय? तें काम आपण आमरणांत चालवूं, इतकेंच नव्हे तर नाडीचा शेवटचा ठोका पडेपर्यंत व हृदयाची क्रिया चालू असेपर्यंत तें व्रत आपण पाळूं, इतका मनोनिग्रह आपल्यांत आहे काय? इतकें असेल तर मात्र तुम्ही सुधारक खरे; तुम्ही गुरु खरे; तुम्ही सत्ताधीश खरे; आणि मग मात्र तुमच्या चरणीं लागणें अगदीं अवश्य आहे. हें नसेल तर आपल्या ठिकाणीं आमची पूज्यबुद्धि राहणार नाहीं. परंतु मनुष्य जितका दुबळा आहे तितकाच तो आकुंचित दृष्टीचा आहे. थोडासा दम धरण्या-इतकी त्याच्या अंगांत ताकद नाहीं. तें समजण्याइतकी त्याच्या अंगांत शक्ति नाहीं. त्याला लागलीच्या लागलींच त्यांचें फळ पाहिजे असतें. कां? तर तें फळ आपण एकट्या-नेंच खावें अशी त्याची इच्छा असते. तो खरोखर दुसऱ्या-करितां मुळींच झटत नाहीं. कर्तव्य म्हणून कर्तव्य करावयाचें त्याला माहितच नसतें. निष्काम कर्माची त्याला ओळखच

नाहीं. " कर्म करण्याचा तुला अधिकार आहे, पण त्याच्या फळावर तुझा अधिकार नाहीं." असें 'श्रीकृष्णां'नीं म्हटलें आहे. मग फळावर आसक्ति तरी कां ठेवावी? कर्तव्यें हीं आपलीं आहेत; फळाची काळजी फळांना! परंतु मनुष्यांना इतका धीर नसतो. ह्यामुळें उतावळेपणानें तो फळासाठीं जिभल्या चाटीत राहून एखादी नवीन क्लृप्ती काढण्याला तयार होतो. साऱ्या जगांतील सुधारकांची स्थिति अशाच वर्गापैकीं आहे.

मीं सांगितलेंच आहे कीं, ही जी सुधारणेची कल्पना हिंदुस्थानांत आली आहे, तीही दिसण्यांत अशीच आहे. ही बाह्यसृष्टीची किंवा व्यक्तित्वाची लाट, आमच्या पूर्वजांपासून चालत आलेली परमेश्वराविषयींची जी आमच्या अंतःकरणांतील निस्सीम भक्ति, तिच्यावर हल्ला करते. आणि त्यामुळें क्षणभर मनाला असें वाटतें कीं, झालें! आतां काय आपलें सारें राष्ट्र रसातळाला लागेल! पण अशा प्रकारचे हजारों आघात आजपर्यंत आमच्या राष्ट्रानें सहन केले आहेत. शेंकडों वर्षें अशा लाटांवर लाटा येऊन त्यावर कोसळल्या होत्या. आणि त्यांनीं जें जें काय पुढें सांपडेल त्याचा अगदीं फडशा पाडला होता. तरवार पाजळून " अल्ला"च्या जयजयकारानें 'हिंदुस्थानां'तील सारें आकाश घुमून गेलें होतें. इतक्या

गोष्टी होऊन चुकल्या तरी आम्ही जशाचे तसेच उभे आहोंत व आमचें राष्ट्र अजिंक्य तें अजिंक्यच आहे!

ज्याला धर्माचा पाठिंबा आहे तोंपर्यंत भरतभूमि कधींही नष्ट होणार नाहीं. ती आजपर्यंत अमर आहे व पुढेंही तशीच असणार. तिच्यांतील लोकांनीं जोंपर्यंत 'हिंदुस्थानां' तील परमेश्वराला सोडलें नाहीं, नश्वर गोष्टींवर जोंपर्यंत त्यांचा विश्वास बसत नाहीं आणि जोंपर्यंत त्यांनीं आपलें अध्यात्म, आपला परमार्थ सोडला नाहीं तोंपर्यंत ते भिक्षावृत्तीही पतकरतील. दारिद्य आणि हलाखी त्यांना पुरे पुरे करून सोडील, बहुतेक रात्रंदिवस ते केरकचऱ्यांत लोळत पडतील, पण ईश्वराला कधीं दूर करणार नाहींत. आपण ऋषींचीं मुलें आहोंत ही गोष्ट त्यांनीं विसरतां कामा नये. 'पाश्चिमात्य' लोकांपैकीं प्रत्येक मनुष्य, प्रत्येक गल्लीकुचींतील मनुष्यसुद्धां ज्याप्रमाणें आपण प्राचीन कालांतील किंवा पूर्वयुगांतील चोरलोकांच्या किंवा दरवडेखोरांच्या वंशांतील आहोंत अशी परंपरा लावण्यांत भूषण मानतो, त्याचप्रमाणें 'हिंदुस्थानां'तील लोक—नव्हे सिंहासनावरील चक्रवर्तीसुद्धा—अरण्यांत वास करणारे भिक्षावृत्तीवर उपजीविका चालविणारे, वस्त्राऐवजीं ज्यांना वल्कलें परिधान करणें भाग पडे, कंदमुलें भक्षण करून रानावनांत वस्ती करावी लागे,

ईश्वराचा ज्यांना साक्षात्कार असेल, असे मनुष्य आपले पूर्वज असल्याचें सिद्ध करण्यांतच भूषण मानतात. हें आमच्या पूर्वजांचें स्वरूप जोंपर्यंत आमच्या डोळ्यांपुढें आहे, व त्यांचे आम्हीं पूर्वज आहों म्हणून जोंपर्यंत आम्हांला भूषण वाटत आहे, तोंपर्यंत 'हिंदुस्थान'चा प्राण जाणें कधींच शक्य नाहीं!

अशी ही सुधारणेची चळवळ हिंदुस्थानांत चालू असतांच तेथें एक महात्मा अवतार घेऊन आला. व बाल-स्वरूपानें त्यानें इ. सन १८३३ मध्यें 'बंगल्यां'तील एका दूरच्या खेडेगांवांत फेब्रुवारी महिन्याच्या विसाव्या तारखेस एका गरीब ब्राह्मण आईबापांच्या पोटीं जन्म घेतला. ह्याचीं मातापितरें फार जुन्या मताचीं होतीं. आणि जुन्या मताचा ब्राह्मण म्हटला कीं, तो नेहमीं कडकडीत वैराग्यानेंच रहात असतो. तो आपल्या उदरनिर्वाहासाठीं फारच थोडी खटपट करतो. जुन्या चालीचा ब्राह्मण उपजीविकेकरितां फारच थोडे श्रम करतो. अधिक संग्रहाची तो कधींच खटपट करित नाहीं. तो कधीं कोणापासून दानही पण घेत नाहीं. ह्यावरून त्याचें आचारण किती कडकडीत असतें ह्याची आपल्याला कल्पना होईलच. ब्राह्मणाविषयीं आणि त्यांच्या उपाध्येपणाच्या वृत्तीविषयीं आपण पुष्कळ वेळां ऐकलें असेल. आणि आपल्यापैकीं कांहीं लोकांनीं विचारावयालाही कमी केलें

नसेल कीं, ह्या विलक्षण ब्राह्मणसमुदायाचें आपल्या अनुयायांवर वजन तरी राहतें कसें? वास्तविक पाहिलें तर साऱ्या देशामध्यें ब्राह्मणांचा वर्ग अत्यंत गरिबीचा आहे. तरी त्यांच्या वैराग्यांतच काय तें अद्भुत सामर्थ्य असतें. त्यांना संपत्तीची मुळींच कांहीं किंमत वाटत नाहीं. हे ब्राह्मण अत्यंत विरक्त असल्यामुळें त्यांचें सामर्थ्यही तसेंच अद्भुत असतें.

जातीच्या संबंधानें सामान्यतः विचार केला तर खरोखर असें म्हणतां येईल कीं, जे कोणी उत्तम प्रकारचीं बंधनें पाळतात त्यांचीच जात श्रेष्ठ होय. अगदीं हलक्या जातीचे लोक पाहिजे तें खाऊं पिऊं शकतात. पण मनुष्य जसजसा अधिकाधिक योग्यतेला चढतो, तसतशा त्याच्या खाण्यापिण्याच्या मर्यादा अधिक दृढतर होत जातात. आणि ते जेव्हां अत्युच्च स्थितीला पोंचतात तेव्हांच तें खरे ब्राह्मण होतात. 'हिंदुस्थानां'तील पिढीजाद उपाध्याय असतात ते फारच नेमधर्मिष्ठ असतात. 'पाश्चात्य' लोकांच्या संवयींशीं ब्राह्मणांच्या आचारविचारांची तुलना केली तर ब्राह्मण लोक हे नेहमीं त्यांच्यापेक्षां फारच वैराग्यशील असून ते मोठे दृढनिश्चयी असतात. त्यांच्या मनांत एखादा विचार भरला कीं, ते तो पिढ्यानपिढ्या चालवितात; त्याच्यापासून कांहीं तरी निष्पन्न होईपर्यंत तो ते सोडीत नाहींत. त्याच्या मनांत

मात्र एकदां एक गोष्ट भरवून द्या म्हणजे ती फिरून निघणें व दुसरा विचार भरवून देणें महाकर्म कठीण होतें.

जुन्या चालीचे जे हिंदुलोक आहेत ते नेहमीं एकच चिकाटी धरून बसणारे आहेत. म्हणून त्यांचे ठरीव व नेमलेले आचारविचार असतात; त्याप्रमाणेंच ते पूर्णपणें चालतात. त्यांच्या आचारांची बाकरीसारीक माहितीसुद्धां आमच्या जुन्या ग्रंथांतून लिहिलेली आहे. त्यांपैकीं थोडा अंश जरी त्यांनीं ग्रहण केला तरी तो त्यांचा अगदीं वज्रलेप होऊन राहतो. त्यांचा जो काय थोडाबहुत समाज आहे, त्याच्या हातचें भोजन मिळालें तरच ते जेवतात. तसें न मिळेल तर उपास काढतात. त्यावरून सुद्धां त्यांचा विलक्षण खरेपणा व कडकडीतपणा दिसून येतो. हा जो धर्माचरणाचा व धर्मश्रद्धेचा अद्भुत प्रभाव असतो तो जुन्याचालीच्या हिंदुलोकांमध्यें दिसून येतो. त्यांची जी जुनी पद्धत आहे तीच उत्तम असल्याबद्दल त्यांची खात्री झालेली असते. आतां त्या ग्रंथांतून सांगितलेले सारे नेमधर्म सर्वांसच पाळतां येतात असें नाहीं; व ते सारे तितके बरोबर असतात असेंही नाहीं. ह्याकरितां त्यांपैकीं शक्य तेवढे नियम ब्राह्मण पाळित असतात. आमच्या कांहीं ग्रंथांत लिहिलेलें आहे कीं, कोणत्याही मनुष्यानें दानधर्म करावा आणि तो अगदीं

कडेलोट होईपर्यंत! कोणी एखादा मनुष्य दुसऱ्यास जेऊं घालून आपण स्वतः मेला तरी तें पुण्य होय. आणि प्रत्येक मनुष्यानें असेंच करणें योग्य आहे. हेंच मत अगदीं परिपूर्ण रितीनें ग्रहण करावें अशी प्रत्येक ब्राह्मणाची इच्छा असते. ' हिंदुस्थानां'तील ग्रंथसमूह ज्यांनीं वाचला असेल, त्यांना ह्यावरून एका उत्कृष्ट गोष्टीची आठवण होईलच कीं, त्या गोष्टींत दानधर्म अगदीं शिखरास पोंचलेला आहे. ' महाभारतां ' त सांगितलें आहे की, एका कुटुंबानें एका आतिथीला आपलें अन्न देऊन टाकून तें सर्व कुटुंब क्षुधेनें व्याकुळ होऊन मरण पावले! ही कांहीं अतिशयोक्ति नव्हे तर असल्या गोष्टी अद्यापही हिंदुस्थानांत घडतात. कितीही दारिद्र्य असलें तरी, ब्राह्मणाची कोणतीही स्त्री क्षुधित अतिथि गांवांत आला असतां त्याला घासभर तरी अन्न घातल्यावांचून गांवांतून जाऊं देणार नाहीं. हें एक मातेचें कर्तव्यच, असें ' हिंदुस्थानां'तील लोक समजतात. ' हिंदुस्थानां'त आई नेहमीं सर्वांच्या मागून जेवीत असते. आधी सर्वांस भोजनाला वाढून त्यांना तृप्त करून मागाहून आपला विचार! म्हणूनच ' हिंदुस्थानां'त मातेला दैवत मानतात. पूर्वीं सांगितलेल्या मुलाची माता अशीच होती. आणि आह्मां सर्व हिंदुलोकांच्या माता अशाच असतात. ती आणि

तिचा पति खरोखर फार गरीब स्थितींत होती. तरी ती दुसऱ्यावर उपकार करण्याविषयीं सदा तत्पर असत. आतां मी आपल्याला ज्या मुलांविषयीं सांगणार आहें, तो मुलगा ह्या उभयतांच्या उदरीं जन्मास आला होता. हा मुलगा जन्मापासूनच मोठा विलक्षण* असे. जन्मापासूनच त्याला मागची सर्व आठवण असे. आणि आपण जगामध्यें कशाकरितां

---

* हा मुलगा म्हणजेच भगवान् श्रीरामकृष्ण परमहंस होत. त्यांच्या गांवामध्यें परमहंसाच्या वडिलांचें घर तेवढेंच काय तें ब्राह्मणाचें. बाकी सर्व लोहार, सुतार, गवळी, धनगर, तेली वगैरे हलक्या जातींचे लोक राहतात. रामकृष्ण परमहंसाच्या वडिलांचें नांव खुदीराम चट्टोपाध्याय असें होतें. त्यांची अत्यंत गरीबी होती तरी ते ब्राह्मणधर्माच्या आचारविचारानेंच रहात असत. ते मोठे भक्तिमान् असून साधुवृत्तीनें रहात. ते एकदां गयेच्या यात्रेस गेले असतां, त्यांस श्रीविष्णूचा दृष्टांत झाला कीं, मी तुझ्या पोटीं जन्म घेऊन येईन. त्यावरून त्यांनीं रामकृष्ण ह्याचें पाळण्यांतील नांव गदाधर असें ठेविलें. खुदीराम दिसण्यांत सभ्य, धिप्पाड असे असून स्वभावानें उदार असत. ते जें जें काय बोलत तें तें खरें होत असे. म्हणजे त्यांस वाक्सिद्धि होती. त्यामुळें त्यांच्या गांवांतील सर्व लोक त्यांस देवाप्रमाणें पूज्य मानीत. चट्टोपाध्याय हे पूर्वी डिरे म्हणून एक गांव होतें, तेथें रहात असत; व तेथेंच त्यांची वडिलोपार्जित जमीन वगैरे होती. परंतु त्या गांवच्या इनामदारानें त्यांना एका खटल्यांत आपल्या तर्फेनें साक्ष देण्याविषयीं आग्रह केला, तो त्यांस आवडला नाहीं. आणि

आलों आहों हें तो पूर्णपणें जाणत असे. त्याच्या आईबापांना दुसराही एक मुलगा होता. तो चांगला विद्वान् असून संस्कृ-

---

त्यासाठीं श्रीमंताशीं विरोध कोणी करीत बसावा, म्हणून त्यांनीं तें गांव सोडून दिलें. इतकेंच नव्हे, तर सर्व घरादारावर तुळशीपत्र ठेवून ते मुकाट्यानें बायकामुलांसह निघाले ते, कामर-पुकुर येथें येऊन राहिले; व तेथेंच चार दोन मित्रांच्या साहाय्यानें आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवूं लागले. गांवाबाहेरच एक लहानसा जमिनीचा तुकडा त्यांस मिळाला होता. श्रीराम हें त्यांचें कुळदैवत व उपास्यदैवत होतें; व त्यावर त्यांची अतोनात भक्ति असें. त्या शेताची पेरणी करतांना ते स्वतः तेथें जात; आणि ‘ रघुवीरा’च्या नांवानें त्यांत मूठभर दाणे पेरीत, आणि नंतर बाकीचें सारें शेत गडीमाणसांना पेरण्यास सांगत. पण चमत्कार हा कीं, तेवढ्या जमिनीच्या तुकड्यांत जेवढें धान्य उत्पन्न होई तेवढें त्यांच्या प्रपंचास पुरे, तुटवडा म्हणून कधीं आलाच नाहीं.

खुदीरामाच्या पत्नीचें-म्हणजे परमहंसांच्या मातुश्रीचें नांव-चंद्रमनी देवी असें होतें; ह्या बाई महान्साध्वी असून अत्यंत कोमल मनाच्या व उदार असत, हीं उभयतांही अतिथीचा सत्कार करण्यांत व गोरगरिबांस धर्म देण्यास सदासर्वकाळ दक्ष असत. आपणांस किंवा मुलांबाळांस उपास पडला तरी चिंता नाहीं, परंतु अतिथींला विन्मुख दवडावयाचें नाहीं, असें त्यांचें व्रत असे. वेळेस असेल ती भाजीभाकर मोठ्या भक्तिभावानें पुढें करावयाची. त्यांना उद्यांची काळजी म्हणजे कसली ती ठाऊकच नसे. साधुसंतांशीं सहवास ठेवावा, देवदेव करावा आणि सुजनतेनें रहावें हा त्यांचा नित्य क्रम असे.

ताचा अध्यापक होता. हा मुलगा लहान असतांनाच त्याचा पिता निवर्तला, म्हणून त्याला त्याच्या भावाबरोबर शिकावयास पाठविलें.* तथापि थोडयाच दिवसानंतर त्या मुलाला लौकरच कळून चुकलें कीं, आपल्या पाठीमागें जें शुल्ककाष्ट लावलें आहे तें केवळ पैसा मिळविण्याकरितां लावून दिलें आहे. ह्याचें पर्यवसान द्रव्यांत व्हावयाचें, ज्ञानांत व्हावयाचें नाहीं. ह्याविषयींच तो मनांत विचार करूं लागला आणि

---

* ब्राह्मणाच्या मुलानें शाळेंत गेलें पाहिजे. नंतर जी त्याला विद्या शिकवावयाची तिची मर्यादा ठरवून देतात. जुनी शिक्षण पद्धत अद्याप 'हिंदुस्थानां'तील पुष्कळ भागांत चालू आहे. विशेषेंकरून संन्याशांच्या मठामध्यें ती फार चालते. ही पद्धत अर्वाचीन कालच्या शिक्षणपद्धतीहून फार भिन्न आहे. विद्यार्थ्यांना फी वगैरे कांहीं द्यावी लागत नाहीं. कारण ज्ञानदान हें इतकें पवित्र समजतात कीं, त्याचा विकरा करणें योग्य नाहीं असें त्यांस वाटतें. तें त्यांनीं केवळ मोफत—फी वगैरे कांहींएक न घेतां—शिकविलें पाहिजे. कोणतेंही द्रव्य घेतल्याशिवाय शिक्षक लोक विद्यार्थ्यांस पढवितात. इतकेंच नव्हे, तर त्यांच्यापैकीं पुष्कळ अध्यापक लोक विद्यार्थ्यांना अन्नवस्त्र सुद्धां पुरवितात. आणि कांहीं कांहीं श्रीमान् कुटुंबें ह्या अध्यापकांना प्रसंगानुसार कांहीं देणग्यांचा पुरवठा करतात. लग्नकार्यांत, श्राद्धपक्षांत ते त्यांना दक्षणा म्हणून देत असतात. कांहीं विशिष्ट प्रकारच्या दक्षिणेवर आपला हक्क आहे असें ते समजतात. आणि त्याचा विनिमय ते आपल्या शाळेंतील विद्यार्थ्यांकडे करतात.

त्यानें आपल्या मनाशीं ठरविलें कीं, अशा प्रकारचें शिक्षण आपल्याला मुळींच नको. पैसा मिळविण्यासाठीं आपल्याला विद्या मुळींच धुंडावयाची नाहीं.

बाप वारल्यानंतर ह्या कुटुंबाला फारच गरिबी आली. तेव्हां ह्या मुलानें आपलाआपणच निर्वाह करण्याचा विचार केला ह्या वेळीं कलकत्त्याजवळच एक देवालय होतें.* येथें ही एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, 'हिंदुस्थाना 'मध्यें ब्राह्मणाला कांहीं चांगला धंदा सुचत नसला तर त्यानें पुजारी बनावें. तथापि हें काम हलकें समजतात. 'हिंदुधर्मा 'तील देवळें म्हणजे ख्रिस्ती धर्मांतील चर्चांप्रमाणें मात्र समजूं नयेत. देवालयें म्हणजे कांहीं सार्वजनिक पूजेचीं

---

* श्रीमती राणी रासमोनी ह्यांनीं इ. सन १८५३ मध्यें, कलकत्त्याच्या उत्तरेस सुमारें पांच मैलांवर दक्षिणेश्वर येथें एक काली देवीचें देवालय बांधलें. हें देवालय सर्व हिंदुस्थानांत अत्युत्कृष्ट असें आहे. राणी रासमोनी ह्या जातीनें शूद्र, तेव्हां देवप्रतिष्ठेचे विधि आपल्या नांवानें केले, तर ब्राह्मणादि उच्च जातींचे लोक, देवालयांत जेवावयास वगैरे येणार नाहींत; हा विचार त्यांनीं मनांत आणून देवाच्या अर्चेचे सर्व संस्कार ब्राह्मणद्वारें 'यजमानस्य' असा संकल्प करून गुरूच्या नांवानें केले. ह्या देवालयांत रामकृष्ण ह्यांच्या वडीलबंधूस पुजारी नेमलें होतें, अर्चेच्या दिवशीं त्यांचे दुसरे बंधूही आले होते; परंतु त्यावेळीं रामकृष्ण ह्यांच्या मनांत जातिधर्माचें वेड असें कांहीं खिळलेलें होतें कीं, त्यांनीं त्या शूद्रस्त्रीचें

ठिकाणें नव्हेत. कारण, खरें सांगावयाचें तर अशा प्रकारचीं सार्वजनिक पूजेचीं ठिकाणेंच 'हिंदुस्थानां'त नाहींत म्हटलें तरी चालेल. देवालयें बहुतकरून श्रीमान् लोकच बांधतात व तें एक पुण्यकर्म समजतात.

एखाद्या मनुष्यापाशीं रगडसा पैसा असला म्हणजे तो एखादें देऊळ बांधून त्यांत एखादी मूर्ति स्थापन करतो.

---

उपाध्येपण पतकरणें बरोबर नाहीं, अशाबद्दल आपल्या उभय बंधूंबरोबर फारच मोठा कडाक्याचा वाद घातला. शास्त्रानें ज्याअर्थी शूद्राच्या अन्नाचा निषेध केला आहे, त्याअर्थीं ह्या देवालयांत कोणींही अन्नग्रहण करूं नये, असें ते म्हणूं लागले. आणि त्या दिवशीं तेथें पंधरा वीस हजार लोक आनंदांत जेऊन तृप्त झालें असतां, हे रामकृष्ण मात्र एकटे काय ते उपाशी राहिले ! आणि रात्रीं वाण्याच्या दुकानांतून त्यांनीं एक पैशाचे पोहे विकत घेऊन खाल्ले; व ते परत कलकत्त्यास आले. परंतु सुमारें एक आठवडा गेल्यानंतर फिरून त्यांचें भावाशीं सख्य झालें, व ते त्या देवालयांत रहावयासही गेले. पण ह्या अटीवर कीं, मी आपलें जेवण आपल्या हातानें गंगातटाकीं करून खाईन. आणि त्याचप्रमाणें पुढें क्रम चालू झाला. ह्यास कांहीं महिने झाल्यावर त्यांचा भाऊ आजारी पडला, आणि त्यांच्यानें पूजेचें काम होईनासें झालें; तेव्हां त्यानें ती पूजा रामकृष्ण ह्यांस करावयास सांगितली. त्यांनींही ती गोष्ट मान्य केली, व तेव्हांपासून रामकृष्ण हे कालीदेवीचे एक श्रेष्ठ पुजारी बनले.

किंवा एखाद्या अवतारी पुरुषाची प्रतिमा मांडतो; आणि तिची परमेश्वर समजून पूजा करण्याची व्यवस्था करतो. 'रोमन क्याथालिक' चर्चमध्यें ज्याप्रमाणें पूजा करतात, त्याप्रमाणेंच येथेंही पूजा करित असतात. कांहीं पुराणांतला कथाभाग वाचतात व देवापुढें नंदादीप लावतात. आणि आपण ज्याप्रमाणें एखाद्या थोर पुरुषाला मान सन्मान देतो व त्याची बरदास्त राखतो त्याप्रमाणें त्या देवाशींही पूज्यभावानें वागतात. इतकेंच तेथें होत असतें. जो त्या देवळांत जातो तो तेथें न जाणाऱ्यापेक्षां मोठा सज्जन आहे असा कांहीं समजला जात नाहीं. अधिक योग्यतेचा मनुष्य मात्र अधिक धार्मिक समजतात. कारण, हिंदुस्थानांतील धर्मच असा आहे कीं, प्रत्येक मनुष्य आपआपल्या खासगी कृत्याचा मुखत्यार असतो. ह्यामुळें प्रत्येक असामी आपआपल्या घरीं देव मांडून त्यांची पूजा करतो. अत्यंत प्राचीन कालापासून आमच्या देशांत देवळांतील पूजेचा धंदा म्हणजे हलका समजतात. पण त्याहूनही एक विशेष कारण आहे, तें हें कीं, शिक्षण देतांना पैसा घेतल्यास जर दोष घडतो, तर धर्माच्या बाबतींत पैसे घेतल्यास तो किती घडावा? असें असतांही पूजेसारख्या पवित्र गोष्टीबद्दलही एखाद्या खरेदीविक्रीप्रमाणें फी घेतात. हें पाहून त्यावेळीं त्या मुलाला काय वाटलें

असेल ह्याची कल्पना करावी. तरी गरिबीसाठीं त्याला तो धंदा पतकरणें भाग पडलें.

ह्या देवालयांत एक देवी होती, तिचें नांव 'जगज्जननी.' ह्या मूर्तीची तो मुलगा दिवसाच्या दिवस प्रार्थना करीत बसे. तेथची पूजा, आर्ती, धुपार्ती वगैरे विधि करी पण एक गोष्ट त्याच्या मनांत नेहमीं घोळत असे, ती ही कीं " ह्यांत कांहीं खरेपणा आहे काय? ह्या मूर्तीच्या पलीकडे कांहीं अधिक आहे काय? जगामध्यें 'जगज्जननी' आहे ही गोष्ट तरी खरी काय? तीच हें जग चालवितें हें खरें, का आपला साराच भ्रमाचा भोपळा?" ह्याबद्दल त्यानें खूप विचार केला. तेव्हां त्याच्या ही गोष्ट लक्षांत आली कीं, प्राचीन मोठमोठे ऋषी व महात्मे ह्यांनीं ह्या कामीं अतोनात श्रम घेतले तेव्हां बऱ्याच कालानें त्यांच्या इच्छा तृप्त झालेल्या आहेत.*

---

* 'बंगाल्या'मध्यें अनेक कवि होऊन गेले. त्यांचीं पद्यें सर्वतोमुखीं आहेत. तीं पद्यें लोक 'कलकत्त्यां'तील रस्तोरस्तीं व खेड्यापाड्यांतून सुद्धां म्हणत असतात. त्यांपैकीं पुष्कळ पद्यें धर्मपर आहेत; आणि त्यांमध्यें एक तत्त्व मुख्य असून तेंच काय तें आमच्या 'हिंदुस्थान' च्या धर्मांतील विशेष होय. हें तत्त्व म्हणजे ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन किंवा साक्षात्कार घडणें हें होय. ही गोष्ट ज्यांत सांगितलेली नाहीं

निजाभ्यासाच्या योगानें त्याला दिसून आलें कीं, ' हिंदुस्थानां ' तील धर्माचें मुख्य तत्त्व म्हणजे ह्या ' जगज्जननीचें ' प्रत्यक्ष दर्शन हें होय. हीच गोष्ट त्या मुलाच्या मनांत भरली. त्याचें सारें तनमन ह्याच विचारात मग्न होऊन गेलें. आतां ह्या ' जगज्जननीचें ' प्रत्यक्ष दर्शन कसें घडतें ? हाच विचार मनांत दृढतर होत चालल्यामुळें तो बोलेनासा झाला; ऐकेनासा झाला; जगज्जननीच्या दर्शनाचें त्याला वेडच लागून राहिलें. हिंदुलोकांच्या मुलांच्या मनांत हाच

---

असा ' हिंदुस्थानां 'त एकही धर्मग्रंथ नाहीं. मनुष्याला परमेश्वर प्रत्यक्ष दृष्टिगोचर झाला पाहिजे; त्याची ओळख पटली पाहिजे; त्याचें ज्ञान त्याला झालें पाहिजे; आणि त्यानें त्याच्याशीं बोललें पाहिजे. तरच तो धर्म. पुष्कळ साधुसंतांनीं परमेश्वराचें दर्शन घेतल्याबद्दलच्या गोष्टींनीं ' हिंदुस्थानां 'तील सारें आकाश दुमदुमून गेलें आहे ! हाच त्यांच्या धर्माचा पाया आहे. आणि असे जे कोणी ईश्वरीतत्त्वाचा प्रत्यक्ष अनुभव घेणारे होते, त्यांनींच त्यांचे सर्व प्राचीन ग्रंथ, पुराणें आणि लेख लिहून ठेवलेले आहेत. हे ग्रंथ विद्वान् लोकांकरितां लिहून ठेवलेले नाहींत किंवा ते त्यांस समजावेत असाही पण त्यांचा हेतु नव्हता. कारण, ज्यांनीं ' सद्वस्तु ' पाहिली त्यांनींच ते लिहिलेले आहेत. तेव्हां जे स्वतःच तितक्या योग्यतेला पोंचतील किंवा अधिकारास पात्र होतील त्यांनाच ते समजतील. ते आपल्या ग्रंथांत म्हणतात कीं, ' सद्वस्तु ' असून ती ह्या जन्मांतसुद्धां प्रत्यक्ष पहावयास मिळते. धर्मापासूनच त्या ज्ञानाचा प्रारंभ. हेंच मुख्य

संशय उत्पन्न होतो. आम्ही जें करतों तें खरें काय? हाच काय तो आमच्या देशांतील प्रश्न असतो. हा प्रश्न ज्या वेळेस आमच्या मनांत उद्‌भवतो, त्यावेळीं ईश्वराविषयीं—आत्म्याविषयीं अनेक उपपत्ती आमच्या अगदीं हातासरशीं असल्या तरी त्यानें आमचें समाधान होत नाहीं. आमच्या—हजारों लोकांच्या—मनांत ईश्वरी साक्षात्कार हें एकच ध्येय असतें. परमेश्वर आहे ही गोष्ट खरी काय? तो असेल तर त्याचें आपल्याला दर्शन घेतां येणार नाहीं काय? सत्य गोष्ट आपल्या अनुभवास येईल काय? 'पाश्चात्य' लोकांच्या

---

तत्त्व प्रत्येक धर्मांत गोवलेलें आढळतें. आपल्याला एखादा उत्तम वक्ता आढळेल, मोठमोठीं प्रमाणें देऊन तो आपलें म्हणणें सिद्ध करील, अत्युच्च ज्ञानाचा बोध सांगेल, सर्व कांहीं होईल; पण त्याचें भाषण ऐकावयाला कोणी कुत्रासुद्धां येणार नाहीं; परंतु एखादा मनुष्य असा भेटेल कीं तो अगदीं गरीब जन्मभाषेशिवाय दुसरी भाषासुद्धां यावयाची नाहीं, इतकेंच नव्हे तर ती भाषासुद्धां धड नाहीं, तरी अर्धादेश त्याला देवाप्रमाणें मानून त्याच्या भजनीं लागेल. 'हिंदुस्थाना'त जेव्हां असल्या पाखांडी मताचा कमी किंवा अधिक प्रमाणानें फैलाव होतो त्यावेळीं अशा अधिकाराचा एखादा पुरुष अवतीर्ण होतो. धर्मासारख्या शुष्क प्रश्नाच्या शंका त्याला राहात नाहींत. कारण, त्याला ईश्वराचें स्वरूप व आत्म्याचें अमरत्व कळलेलें असतें. ह्यामुळें देशोदेशींचे लोक हळू हळू त्याची मनोभावानें पूजा करूं लागतात.

मनाला असें वाटतें कीं, ह्या गोष्टी अनुभवाच्या नव्हेत; पण आमच्या त्या प्रत्यक्ष अनुभवातल्या आहेत. त्याकरितांच कित्येक मनुष्यांनीं आपलें प्राण खर्ची घातले आहेत. ह्याच ध्येयाकरितां हजारों हिंदु लोक प्रत्येक वर्षीं आपलीं घरेंदारें सोडून देतात. आणि त्यांच्यापैकीं पुष्कळ लोक ह्यासाठींच अघोर तपश्चर्या करून मृत्यु पावतात; पण अशा प्रकारचे विचार ऐकले म्हणजे 'पाश्चात्य' लोकांच्या मनाला हें सारें स्वप्न वाटतें. तथापि मी आजामितीला जरी 'पाश्चात्य' देशांत राहत आहें तरी सुद्धां ती गोष्ट मला बालंबाल खरीच वाटत आहे.

लक्षावधि लोकांवर सत्ता चालविणारा बादशहा असो, कीं गल्लीकुचींत भीक मागणारा एखादा भिकारी असो वज्रदेही असो, कीं सुदामदेव असो; सगळ्याचेंच आयुष्य क्षणभंगुर आहे. हिंदूचें म्हणणें त्यांतून मुक्त होण्याला धर्म किंवा परमेश्वर ज्याला म्हणतात तोच काय तो एक मार्ग आहे. हें जर खरें ठरलें तर आयुष्य हें सुखकर होऊन तें बागविण्यासारखेंही आहे. तसें नसेल तर मात्र हा जन्म म्हणजे निरर्थक ओझें होईल. पण हा मनांतला हेतु कितीही विचार केला तरी सिद्धीस जात नाहीं. त्याचा प्रत्यक्ष अनुभव येईल तेव्हांच तो सिद्ध व्हावयाचा. खरी वस्तु प्रत्यक्ष पाहिली पाहिजे

आणि आमचें खरें समाधान होण्याला आम्हांला प्रत्यक्ष अनुभवच पटला पाहिजे. आम्हांला ईश्वराचें दर्शन घडलें पाहिजे, आणि परमेश्वर आहे अशी खात्री झाली पाहिजे. पण आमच्या ह्या अशा कृतीनें ह्या गोष्टीचा आम्हांला अनुभव यावयाचा नाहीं.

आम्ही ज्या मुलाविषयीं बोलतों आहों, त्या मुलाच्या मनांतही ह्याच कल्पना आल्या आणि त्याच गोष्टींचा त्यानें ध्यास घेतला. तो दिवसच्या दिवस सारखा रडत बसे आणि म्हणे, " हे जगज्जननी ! तूं जगांत खरोखरच आहेस काय ! कां साराच अभाव, आणि नुसतें काव्याचें अवडंबर ! 'जगज्जननी' असल्याबद्दल मनुष्यांचा निवळ भ्रम, कां ती खरोखरीच आहे ? आमच्यापाशीं जें ज्ञान आहे तें ग्रंथांचें व शिक्षणाचें; तें केवळ शब्दज्ञानच होय. त्यांत तर ती नाहीं हें खास. " असा जों जों ध्यास लागत चालला तों तों त्याचें मन अधिकच दृढ होत चाललें. त्याचे विचार इतक्या उच्च प्रतीचे झाले कीं, दुसऱ्याचे विचार त्याच्या मनांत मुळींच शिरत नसत. हा विचार इतक्या दृढतर स्थितीला पोंचला, व त्यांत त्यांचें मन इतकें तल्लीन झालें कीं, दुसरें कशाचेंच त्याला भान राहिलें नाहीं. ह्यामुळें देवाची पूजाही त्याच्याकडून नीट होईना. बारीकसारीक गोष्टी, लहानसहान

कामें अर्थातच होईनाशीं झालीं. देवीपुढें नैवेद्य आणून ठेवला तर त्याला तो दाखविण्याचीही शुद्ध नसे! कधीं कधी दिवा लावावयाचाही तसाच राही! त्यानें केव्हां केव्हां प्रहरान् प्रहर विचारच करीत बसावें, आणि देवाच्या पूजेचें काम कांहींच करूं नये. ईश्वराचा जे शोध करतात त्यांना तो दर्शन देतो, ह्या गोष्टी त्यानें ऐकिल्या होत्या, व त्या वाचल्याही होत्या. आणि आतां त्याचा शोध करावयाचें काम त्याच्यावर येऊन पडलें होतें. अखेर तेथील देवीची त्यांच्या हातून पूजा होणें शक्य नाहीं अशी स्थिति प्राप्त झाली; म्हणून त्यानें तें काम सोडलें.* व तेथें जवळच एक लहानसें जंगल होतें त्यांत जाऊन तो राहिला. त्यानें मला पुष्कळ वेळा सांगितलें आहे कीं, मी तेथें असतांना दिवस उगवे केव्हां व मावळे केव्हां हेंही मला समजत नसे. किंवा मी राहतों कसा ह्यांचीही मला दाद नसे. त्याला आपल्या देहाची शुद्ध नव्हती, ह्यामुळें

---

* दक्षिणेश्वराच्या देवालयानजीकच पंचवटी म्हणून ठिकाण आहे. तें एकांतस्थळ त्यांनीं तपश्चर्येसाठीं पसंत केलें. तेथें झोंपडी बांधून रहावें, असें त्यांच्या मनांत आलें. आणि चमत्कार हा कीं, भक्ताच्या मनांत येण्याचा अवकाश कीं तेथें भक्ताचा सहकारी सोय लावून देण्यास जणें उभा! तेथें लांकडें वगैरे झोंपडीस जें जें पाहिजे होतें तें गंगेंतून आधींच वाहून आलेलें! त्याची त्यांनीं झोंपडी तयार केली व तेथेंच ते एकांतांत राहूं लागले.

क्रमांक श्री. नि.
नों. दि. १०१६
३०/१२/५६
ग्रंथालय

जेवणखाणही तो विसरून गेला. तेथें असतांनाच त्याचा कोणी एक नातलग* होता, तो त्याच्यावर नेहमीं लक्ष ठेवीत असे. तो अन्न आणून तें त्याच्या तोंडांत घाली, व तो तें केवळ शरीरक्रियेनें खात असे. तो मध्येंच मोठ्यानें "हे माझे प्रभो! मला सत्य स्वरूप दाखीव!" म्हणून आरडत असे. "तूं आहेस काय? तूं आहेस काय? तुझें अस्तित्व आहे काय? असेल तर तूं मला अज्ञानांत कां टाकलेंस? मला दर्शन कां देत नाहींस? शब्दज्ञान व शास्त्रज्ञान सर्व व्यर्थ आहे. पदार्थमात्राविषयीं बोलणें म्हणजे केवळ शब्द!

---

* ते जगज्जननीला, म्हणत "माते! जें मला पातकी मनुष्यांकडून मिळणार नाहीं. तें मी फक्त तुझ्याकडूनच शिकेन." त्यावर पुन्हा शब्द होई, "होय बेटा. तेंच खरें." ते म्हणत, "मी माझ्या शरीराकडे मुळींच लक्ष देत नसें. माझ्या केंसांच्या जटा झाल्या होत्या, तरी त्याची मला शुद्धि नव्हती. माझा पुतण्या 'हृदय' मला दररोज वाढून घेऊन येत असे. तें मी कधीं खाई, कधीं खात नसें. तो माझ्या तोंडांत घांस घाली, तरी त्याची मला दाद नसे. म्हणून तें अन्न घशाखालीं उतरण्याची बहुतेक मारामारच पडे. मी नित्य प्रार्थना करी कीं, "माते! मी मोठा आहें, ही जी माझ्या मनांत कल्पना आहे, ती मोडून टाक. मी ब्राह्मण व तो अत्यंज हा भेदच मनांत येऊं देऊं नको. कारण, सर्वत्र सर्वव्यापी जर तूंच आहेस तर भेद तरी कां उत्पन्न व्हावा!"

सत्य! मला मुक्त करण्याला फक्त एक सत्य पाहिजे! मी सत्यालाच गांठ घालणार! मला सत्याचाच शोध लावावा असें वाटतें!!" हाच त्याचा विलप चालू असे.

अशा स्थितींत त्या मुलाच्या किती तरी दिवस आणि रात्री निघून गेल्या. सारा दिवस गेला आणि रात्र पडली म्हणजे देवालयांतील घंटानाद आणि मनुष्यांचा गोंगाट रानांत ऐकूं येत असे. तो ऐकून तर त्याला फारच दुःख होई आणि तो रडावयास लागे. "आई! दुसरा दिवस गेला अं! तरी तूं येत नाहींस! ह्या क्षणभंगुर आयुष्याचा एक दिवस गेला तरी मला सत्य सांपडलें नाहीं." अशा प्रकारें त्याच्या आत्म्यांतील वेदना दुःसह झाल्या म्हणजे तो कधीं कधीं देहभान विसरून जाऊन आपलें मस्तक एकदम जमिनीवर घांसून रडूं लागे.

मनुष्याचें अंतःकरण खळबळून सोडणारा निजध्यास तो असा असतो. पुढें हाच मनुष्य मला म्हणाला, "बेटा! समज कीं, एका खोलीमध्यें मोहरांनीं भरलेली एक थैली आहे, आणि बाहेरच्या बाजूला एक चोर उभा आहे. तर त्या चोराला झोंप येईल असे तुला वाटतें काय? कधीं येणार नाहीं. त्याच्या मनाला अगदीं चटपट लागून राहील, कीं त्या खोलींत मला कसें जातां येईल आणि तें

द्रव्य माझ्या केव्हां हस्तगत होईल. ह्या दृश्याच्या मागें एक सत्य म्हणून आहे, तोच परमेश्वर. तो कधींच नष्ट होणारा नव्हे. तोच सर्व सुखाचा निधि आहे. त्याच्या सौख्यापुढें आपलें हें संसारसुख म्हणजे केवळ पोरखेळ वाटतो. तर त्यांच्या मागें एखादा तरी मनुष्य दृढ निश्चयानें लागल्यावांचून व धडपड केल्यावांचून राहील असें तुला वाटतें काय? एक क्षणभर तरी त्याचे प्रयत्न बंद पडतील काय? कधीं पडणार नाहींत. तो त्याच्यासाठीं वेडा होऊन जाईल!" आणि ह्याच ईश्वराच्या वेडेपणानें तर त्या मुलाला पछाडलें होतें.

त्यावेळीं त्याच्या जवळ कोणी गुरु नव्हता. त्याच्या मनांत जो विकार उद्भवला होता, त्याशिवाय दुसरा विचार सांगावयाला त्याला कोणी नव्हतें. कोणत्याही गोष्टीची स्थिति अशीच असते. पैशाच्या इच्छेनें जर एखादा मनुष्य वेडा न होईल तर ह्या जगांतील मनुष्यें म्हणतील कीं, तर मग तो शुद्धीवरच नाहीं! कनक आणि कान्ता पुढें असतां तीं मिळविण्याविषयीं जो खटपट करींत नाहीं, त्यालाच लोक वेडा म्हणतात. पण असे मनुष्य म्हणजे निव्वळ मातीचे क्षार होत. ह्याच वेडेपणापासून हें आमचें जग पूर्वी हालवून सोडण्याचे अधिकार आलेले आहेत आणि

त्याच योगानें तें आज हालतही आहे; आणि त्याच रितीनें दिवस, महिने, आणि वर्षेंसुद्धां सत्याची गांठ घेण्याकरितां जिवाचीही खटपट चाललीच आहे. त्या मुलाला दृष्टांत होऊं लागले; कांहीं अद्भुत गोष्टी दिसूं लागल्या; आणि आपल्या आत्मस्वरूपांतील कित्येक गुप्त गोष्टी उकलण्यास प्रारंभ झाला. जणोंकाय मधला एक एक पडदाच निघत आहे! नंतर ती 'जगज्जननी' स्वतःच त्याची गुरु बनली, आणि तिनें त्यास प्रत्यक्ष* दर्शनाचा अनुभव दिला. त्याचवेळीं त्या ठिकाणीं एक बाई आली. ऽ ती दिसण्यांत अतिशय

---

* त्यांस देवीचीं दर्शनें होऊं लागलीं. पण त्यांस शंका येई कीं, हीं खरीं कशावरून? म्हणून ते त्याचे पडताळे पहात असत. ते एकदां देवीस उद्देशून म्हणाले, ' माते, तूं दर्शन दिलेंस, हें खरें कशावरून? राणी रासमोनीच्या वाड्यांतल्या दोन तरुण मुली, ज्या कधींही कोणाच्या दृष्टी पडावयाच्या नाहींत, त्या जर येथें माझ्या दृष्टीस पडल्या तर मात्र मी खरें म्हणेन." आणि खरोखरीच आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या दोन्ही मुली त्यांजपुढें येऊन हात जोडून उभ्या राहिल्या!

ऽ ही ब्राह्मणाची स्त्री बंगाल इलाख्यांत प्रसिद्ध होती, तिला वेदांत विषयाचीं पद्यें अतोनात तोंडपाठ येत असत. एका ग्रंथाच्या मागून दुसरा ग्रंथ, याप्रमाणें किती तरी ग्रंथ ती तोंडपाठ म्हणत असे. ती मोठमोठ्या पंडितांशीं वादाला उभी राही. तिनें सर्वसंगपरित्याग करून योगाभ्यास केला होता, त्यामुळें तिच्या आंगीं लोकोत्तर अशा यौगिक शक्ति

सुंदर असून तिच्यासारखी विदुषी तर कोणीच नव्हती. पुढें पुढें हे साधु त्या बाईसंबंधानें सांगत कीं, ती कांहीं शिकलेली नव्हती; पण सर्व विद्या तिला अवगत असत. तशी स्त्रिया मानवी स्वरूपांत शिकणें शक्यच नव्हतें. हिंदुसमाजांत ही गोष्ट आपल्याला विशेष दिसून येईल कीं, सामान्यातें हिंदु स्त्रिया, 'पाश्चात्य' लोक ज्याला स्वातंत्र्यहीन स्थिति म्हणतात त्या अज्ञानांतच राहिलेल्या असतात.

---

होत्या. ती भगवीं वस्त्रें परिधान करून संन्याशीं वेषानें आसेतुहिमाचल फिरत असे. पण ती कोण होती, तिचा जन्म कोठें, वंश कोणता, किंवा तिचें नांव काय; ह्यापैकीं कोणासच कांहीं ठाऊक नव्हतें. ती एक साक्षात् देवीच मनुष्यावर अनुग्रह करण्याकरितां, त्यांस पूर्णत्वास पोंचविण्याकरितां पातकांतून उद्धारण्याकरितां व दुःखितांस दुःखमुक्त करण्याकरितां, मृत्युलोकावर आवतरली होती. तिला तीन पुरुष अत्यंत पूर्णास्थितीला पोंचवावयाचे होते. त्यांस सहाय करण्यासाठीं, ती आली होती. रामकृष्ण यांस देवीनें वचन दिलें होतें कीं, मी येऊन तुला सिद्ध होण्याचा मार्ग दाखवीन. त्याप्रमाणें परस्परांची दृष्टादृष्ट होतांच तिनें त्यांना ओळखलें, व त्यांनीं तिला ओळखलें. ती म्हणाली, "शोधतां शोधतां दुसरे दोघे मला सांपडले, पण तूं मात्र अद्याप सांपडत नव्हतास, तो आतां सांपडलास." आजपर्यंत रामकृष्ण यांस, खरी भक्ति करण्यासारखें पात्र म्हणून मिळालेंच नव्हतें. पण ही बाई पाहिल्यापासून त्यांना जी तिची भक्ति लागली, ती अगदीं अपूर्व होती. त्यांच्या त्या भक्तिला सीमा नाहीं!

त्यांतच ही विरक्त स्त्री उत्पन्न झालेली होती. ती संन्यास वृत्तीची होती. हिंदुस्थानांतील स्त्रियासुद्धां सर्वस्वत्याग करून आपलें घरदार सोडून संन्यासिणी होतात.* त्या अविवाहित स्थितींतच राहतात, आणि परमेश्वराच्या भजन पूजनांत आपला सारा जन्म घालवितात. ती स्त्री तेथें आली तेव्हां हा मुलगा अरण्यांत बसून रडतो, शोक करतो व त्या मुलाला लोक वेडा म्हणतात, असें तिनें ऐकिलें, तेव्हां तिनें त्याला भेटण्याचा निश्चय केला. हीच त्याला मिळालेली पहिली मदत होय. तिनें त्याला काय होतें

* त्या बाईला पाहून लोकांना अतिशय आश्चर्य वाटलें. ती असें प्रतिपादन करी कीं, रामकृष्णाची योग्यता मजहूनही अधिक आहे. तो कांहीं वेडा नव्हे, हें तिनें सिद्ध करून दिलें. तिनें वैष्णवांतील कितीएक लोकांची उदाहरणें देऊन सांगितलें कीं, ह्या ईश्वरभक्तांच्या स्थितीच्या पायऱ्या आहेत. चारशें वर्षांपूर्वीं श्रीचैतन्य म्हणून जे बंगाल्यामध्यें साधु होऊन गेले, त्यांची स्थितिही अशीच होती. त्यांना कांहीं तरी उपायांनीं ताळ्यावर आणावे लागतात. उदाहरणार्थ—अंगाची आग. ही जशी रामकृष्णांची झाली तशीच गोपींचीही झाली होती. त्यांत ही राधेची विशेष; नंतर चैतन्यांची; ह्या उभयतांनाही कारण एक भक्तीच होय. त्या दोघांनाही चंदनाच्या उटीनें आणि हारानेंच गुण आलेला आहे. हा रोग नव्हे तर भक्तीच्या आवेशानें शरिरांत कांहीं थोडीशी बिघडाबिघड होते, ती स्थिात आहे. म्हणून हे उपचार करतांच रामकृष्णांसही गुण आला.

तें ताबडतोब ताडलें व म्हणाली, " बैस; असा वेडेपणा ज्याच्या अंगीं येईल तो खरोखरच धन्य होय. जगांतील प्रत्येक मनुष्य वेडाच आहे. कोणी द्रव्यासाठीं वेडा होतो, कोणी सुखासाठीं वेडा होतो; कोणी कीर्तीसाठीं वेडा होतो; कोणी इतर शेंकडो वस्तुंकरितां वेडे होतात; परंतु परमेश्वराकरितां जो मनुष्य वेडा बनतो तो खरोखर धन्य होय. असे लोक फारच थोडे असतात. " ह्या बाईनें त्याचा देह एका जागीं आणून ठेवला आणि त्याच्याजवळ ती कितीएक वर्षें राहिली, इतकेंच नव्हे तर तिनें त्यास हिंदुधर्मांतील कितीएक प्रकार शिकावेले; आणि योगाचाही अभ्यास करवून घेतला. त्यामुळें जणोंकाय परमार्थाची नदीच त्याच्यावर वाहूं लागली.

नंतर त्या ठिकाणीं असाच एक दुसरा संन्याशी * आला. " हिंदुस्थानां ' त भिक्षा मागत हिंडणारें बैरागी

---

* ह्या संन्याशाचें नांव ' तोंतापुरी ' असे होतें. तो मोठा धिप्पाड मजबूत आणि सशक्त होता. त्यानें लहानपणापासूनच वेदांताचा अभ्यास केला होता; आणि महत्कष्ट सोसून वेदांतील मर्म समजून घेतले होतें. तो कोणत्याही प्रकारचें वस्त्र म्हणून आंगावर घेत नसे; आणि कोठच्याही घरांत म्हणून वस्ती करीत नसे. ज्याची इच्छा झाली तर राजवाडेसुद्धां उघडे होतील, येवढी ज्याची योग्यता, तो सारी रात्र केवळ झाडाखालीं किंवा आकाशाच्या सुंदर नीलवर्ण चांदव्याखालीं काढी; मग थंडी असो कीं पाऊस असो. तीन दिवसांपेक्षां अधिक दिवस तो कधींही एके

असतात. त्यांच्यापैकींच हा एक मनुष्य होता. हा चांगला विद्वान असून तत्त्ववेत्ता होता. हा मनुष्य रहाणींत मोठा विलक्षण असून कल्पनावादी असे. हे जग मुळीं अस्तित्वांत आहे ह्यावरच त्याचा भरंवसा नव्हता. आणि तें सिद्ध करून दाखविण्यासाठीं तो कधीं कशाच्याच निवाऱ्याला बसत नसे. तो नेहमीं उघड्यावर राही व ऊन, थंडी, वारा सर्व कांहीं सहन करित असे. ह्या मनुष्यानें त्या मुलाला शिकवावयास प्रारंभ केला. प्रथम त्यानें वेदांतील तत्त्व

---

ठिकाणीं रहात नसे. तसेंच खाण्यापिण्याबद्दलही कोणास याचना, करावयाची नाहीं, किंवा फिकिरही बाळगावयाची नाहीं. वाऱ्याप्रमाणें यथेच्छ सर्व देशभर फिरावयाचें, कोणी जिज्ञासु व खरा भक्त आढळल्यास त्याला ज्ञानोपदेश करावयाचा आणि त्याला पूर्णतेप्रत पोंचावयास मदत करावयाची. वेदांताचा तर तो केवळ चालताबोलता पुतळा होता. आणि त्याप्रमाणेंच पूरेपूर त्याचें आचारण असे. रामकृष्ण हे गंगेच्या तीरावर बसलेले पाहून त्यांच्यामध्यें योगाचें तेज आहे असें त्यानें तावडतोब ओळखलें, आणि त्यास सत्योपदेश करून पूर्णतेस पोंचविलें. त्यांनीं एकदम त्यास हाक मारून म्हटलें, " हमारा बेटा! तुला निर्मळ मुक्ति पाहिजे काय? तर इकडे ये. मी तुला सांगून देतो, " परंतु रामकृष्ण ह्यांचा नेम असा असें कीं; प्रथम कालिकामातेस विचारल्यावांचून कांहींच करावयाचें नाहीं. ह्यास्तव त्यांनीं जाऊन देवीची परवानगी घेतली आणि लौकरच परत येऊन म्हणाले, " ठीक आहे. हा मी तयार आहे. " नंतर तोतापु-

सांगितलें. तों लौकरच त्याला एक चमत्कार दिसून आला. तो हा कीं, " शिष्यादिच्छेत्पराजयम् " म्हणजे त्या विषयांत शिष्याची गति गुरूपेक्षांही विशेष झाली. हा मनुष्य कांहीं महिनें त्या मुलापाशीं होता. नंतर त्यानें त्यास संन्यास-धर्माची दीक्षा दिली आणि तो निघून गेला. ती बाईही पण निघून गेली. कळी उमलून तिचें फूल तयार झालें म्हणजे झाड त्यास सोडून देतें हें प्रसिद्धच आहे, तद्वत्च तिनेंही प्रकार केला. त्यापुढें ती बाई जिवंत आहे कीं, मृत झाली हें सुद्धां कोणास कळलें नाहीं, किंवा ती परतूनही कधीं आली नाहीं.

देवळांत पुजारी असतांना आमच्या चरित्रनायकाची विलक्षण स्थिति पाहून लोकांना ह्या मुलाचें मस्तक ठिका-

---

रींनीं त्यांस एकाग्रता कशी करावी, तें सांगितलें. तीन दिवस अभ्यास केल्यानंतर त्यांस 'निर्विकल्प' समाधि लावतां आली. ह्या समाधींत इंद्रियज्ञानाची कांहींच शुद्धि रहात नाहीं. रामकृष्णांस इतक्या लौकर समाधि साध्य झाल्यामुळें त्या संन्याशासही फार संतोष झाला. आणि तो म्हणाला, " माझ्या लाडक्या! मीं चाळीस वर्षें हाल वनवास सोसून जी गोष्ट साध्य केली, ती तूं तीन दिवसांतच शिकलास. ह्याकरितां तुला आतां शिष्य म्हणतां येत नाहीं. ह्यापुढें मी तुला 'मित्र' म्हणणार. ते रामकृष्णा-जवळ अकरा महिने होते; आणि त्यांच्यावर तशीच त्यांची भक्तीही होती.

णावर नाहीं असें वाटलें. म्हणून त्याच्या एका आप्तानें त्यास घरीं नेलें आणि एका लहान मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें. उद्देश येवढाच कीं, तसें केल्यानें तरी त्याचें विचार बदलतील, व मन ठिकाणावर येईल. परंतु लग्न होतांच हा मुलगा फिरून तेथें आला. पूर्वीपेक्षां त्याचा वेडेपणा अधिकच वाढला. अशा प्रकारचें लग्न म्हणजे अर्थात् वाङ्-निश्चय होय. व ही मुलगी मोठी होईल तेव्हां खरें लग्न व्हावयाचें. त्यावेळीं तेथील चाली प्रमाणें नवऱ्यानें नवरीच्या घरीं जाऊन तिला आपल्या घरीं आणावयाचें. तथापि येथें हा नवरा तर आपल्याला बायको आहे हे सुद्धां विसरला होता! त्या मुलीचें गांव फार लांब होतें. तेथें त्या मुलीनें ऐकिलें कीं, आपला नवरा फारच धर्मशील झाला आहे. कोणी म्हणत तो विक्षिप्त झाला आहे. तेव्हां त्यांत कितपत तथ्यांश आहे हें पाहण्याकरितां ती माहेराहून निघाली, आणि तिचा नवरा जेथें राहत होता त्या ठिकाणीं आली. आणि अखेर त्याच्यापुढें उभी राहून मी आपली पत्नी असल्याची तिनें त्याला आठवण दिली. ही गोष्ट त्यानें तत्काल मान्य केली. 'हिंदुस्थानामध्यें' जर एखादा पुरुष किंवा बायको आपला जन्म विरक्तीत घालविण्याचा निश्चय करील तर त्याची सर्व कर्तव्यें त्यास पाळावीं लाग-

तात. अर्थात् सर्व विषय त्याला सोडावे लागतात. त्याप्रमाणें ह्या तरूण मनुष्यानेंही आपल्या पत्नीच्या पायावर मस्तक ठेविलें आणि म्हणाला, " ह्या जगांतील यच्चयावत् स्त्रिया मला मातोश्रीप्रमाणें आहेत, तरी पण बाकी तुझी पाहिजे ती सेवा करण्यास मी तयार आहे." *

ती स्त्रीही मोठी पवित्र व उदार अंतःकरणाची होती, आपल्या पतीची इच्छा समजण्याइतकें तिला ज्ञान होतें. तिनें तात्काळ त्यांस सांगितलें कीं, आपण जो आपल्या मनानें विरक्तीचा निश्चय केला आहे त्यांत व्यत्यय आणून आपण पुन्हां विषयांत पडावें अशी माझी मुळींच इच्छा नाहीं. माझी इच्छा येवढीच आहे कीं, मी नेहमीं आपल्या सान्निध्याला राहून आपली सेवा करावी, आणि आपली

* त्यांच्या आईला व भावांना वाटलें कीं, त्याला बायको वगैरे करून दिली, म्हणजे हें त्याचें वेड जाईल. म्हणून त्यांनीं त्यांस घरीं नेलें, आणि लग्नाचा विचार सुरू केला, तेव्हां रामकृष्णांनीं त्यांस सांगितलें कीं, रामचंद्र मुखोपाध्याय म्हणून एक गृहस्थ आहेत. त्यांच्या मुलीशीं माझें लग्न होण्याचें नेमलेलें–विधिलिखित–आहे, आणि ती मुलगी त्यांनीं देवीला वाहिलेली आहे. ह्याकरितां तीच मुलगी पहा. त्याप्रमाणें आईबापांनीं शोध करतां, ते गृहस्थ सांपडले. ती मुलगीही होती, आणि त्यांचें तिच्याशीं लग्नही पण झालें. ही मुलगी लग्नामध्यें पांच वर्षांची होती. तिचें नांव श्रीमती शारदा देवी किंवा शारदामिनी देवी असेंही तिला म्हणत. रामकृष्ण

आज्ञा पाळावी. ती गोष्ट त्यांनीं मान्य केल्यावर ती त्यांच्या जवळच राहिली, आणि साऱ्या शिष्यांत ती अगदी निस्सीम भक्तिमान् शिष्य बनली. ती त्यांना निरंतर देवाप्रमाणें पूज्य मानीत असे. ह्याप्रमाणें पत्नीची संमति मिळतांच त्यांच्या योजनेंतलि एक आडकाठी दूर झाली; आणि त्यांनीं निश्चित केल्याप्रमाणें सारा जन्म घालविण्याला ते तयार झाले.

अशा रीतीनें हा आमचा मनुष्य सर्वतोपरी मुक्त झाल्यावर, व थोरपणास चढल्यावर त्याच्या अंगांत जो पहिला आवेश चढला तो हा कीं, आपल्या समाजांतील भेदाभेद मानण्याचें जें धर्मभोळेपणाचें वेड आहे तें चटसारें नाहींसें करण्याची खटपट करावी. त्याबद्दलचा अभिमान व बंड अगदीं मोडून टाकण्यासाठीं आपण अगदीं हलक्या जातीसारखें

परमहंसांनीं तिचा फार ममतेनें आदरसत्कार केला, पण तिला असें सांगितलें कीं, 'पहिला रामकृष्ण तो मेला आणि हा नवा आहे. हा कोणत्याही स्त्रीकडे पत्नीत्वाच्या नात्यानें पहात नाहीं.' ते तिला 'आई' म्हणूनच हाका मारूं लागले. त्यांनीं तिला पुष्पें वाहिलीं; धूपदीप दाखविला, आणि मूल आईपाशीं प्रसाद मागतें, त्याप्रमाणें प्रसाद मागितला; आणि गाढ समाधींत निमग्न झालें. ती बायकोही मोठी दृढनिश्चयाची व थोर मनाची होती. तिनें त्यांस सांगितलें कीं, मला पतिसुखाची वगैरे कांहीं इच्छा नाहीं, तर आपण मला ईश्वरप्राप्तीचा मार्ग सांगावा, आणि आपणांस जेवणखाण करून घालण्याची व थोडें सुखसमाधान होईल, अशी जी काय थोडीबहुत

व्हावें. आमच्या देशामध्यें एक प्रकार आहे त्याला जातिभेद असें म्हणतात. त्यामुळें मनुष्यामनुष्यामध्यें जन्मतःच एक लहानमोठेपणा येतो आणि तो जन्मभर कायम राहतो. प्रत्येकाला आपआपल्या जन्माप्रमाणें जन्मसिद्ध पदवी प्राप्त होते आणि त्यानें कांहीं तरी अचाट कृत्य केल्यावांचून ती कांहीं सुटत नाहीं. जातीमध्यें ब्राह्मण ही सर्वांत श्रेष्ठ जात आणि चांडाळ ही अगदीं कनिष्ठ जात मानलेली आहे. ह्या रीतीमुळें कोणाला श्रेष्ठ पदावर चढतां येत नाहीं. आमचे ब्राह्मण आपलें काम करतांना त्यांत हलक्या जातींना घेत नाहींत, अलग ठेवतात. त्यामुळें त्यांना गल्ल्या झाड-ण्याचें काम करावें लागतें, किंवा हालालखोरी पतकरावी लागते. त्यांस कोणी शिवतही नाहीं. म्हणून तो मनुष्य

---

शुश्रूषा मजकडून होण्यासारखी असेल, ती करण्याची परवानगी असावी. त्या दिवसापासून ती त्या देवळाच्या आवारांत राहूं लागली; आणि पति सांगेल त्याप्रमाणें अभ्यास करूं लागली. मथुरानाथांनीं तिला दहा हजार रुपये देतों म्हणून सांगितलें, पण तिनें ते घेतले नाहींत. ती म्हणाली, "माझ्या पतींनीं कनककांता व सुखें यांजवर लाथ मारून परिपूर्णता संपादन केली आहे. त्यांना कशाचीच गरज नाहीं. तोच कित्ता मला वळ-विला पाहिजे." ती तशीच निःस्पृह व पवित्र राहिली; आणि आपल्या स्त्री जातीला उपदेश करून व पतीला साक्षात परमेश्वर समजून तिनें पतीचें व्रत तसेंच पुढें चालविलें.

रात्रीच्या वेळीं आपला खराटा व टोपली घेऊन देवळांतील गुप्त ठिकाणाकडे जातो. कारण तीं साफ करण्याचें काम ह्या भंग्याकडे असतें. तो खालीं वांकून तीं ठिकाणें साफ करण्याचें काम आपल्या हातांनीं करतो. आपल्या कुंच्यानें ती सर्व जागा साफ करून ठेवतो. इतका अपमान सोसून तरी त्याला स्वतंत्रपणें पोटाला मिळतें असेंही नाहीं. देवळांतून दररोज पुष्कळ भिकाऱ्यांना अन्न मिळतें. त्यांत मुसलमान, बाटे आणि दुसरेही कित्येक दुराचारी लोक असतातच. त्या सर्वांची जेवणीं खाणीं होईपर्यंत त्यानें तिष्ठत बसावयाचें. मग आमचे ब्राह्मण लोक आपल्या जेवलेल्या उष्ट्या पत्रावळी गोळा करून त्यांतील उष्टेमाष्टे तुकडे व मालिदा त्याच्या पदरांत टाकतात. नंतर ह्या त्या जाती जेवलेलीं ती जागा ते साफसूफ करतात.

तुम्हां ‘ पाश्चिमात्य ’ लोकांना ह्या शेवटच्या गोष्टींत फारसा अर्थ वाटणार नाहीं; परंतु आम्हांला हिंदुस्थानांमध्यें ती मोठी भयंकर व आत्मघाताची दिसते. जे लोक गलिच्छ असतात त्यांच्याकडून असली कृत्यें नेहमी होतात. हे लोक एखाद्या शहरांत गेले, तर त्यांनीं लोकांस आधीं सूचना द्यावी लागते, आणि त्याप्रमाणें ते देतातही ती सूचना म्हणजे ही कीं ‘ आपण आम्हांला शिवूं नये. ’ जुन्या ग्रंथांत असें लिहिलें

आहे कीं, जर अशा लोकांचें तोंड एखाद्या ब्राह्मणाच्या दृष्टीस पडलें तर त्यानें एक दिवस उपोषण करून हजार गायत्री मंत्राचा जप करावा. परंतु यावेळी तेथील ब्राह्मणांचा ब्राह्मण तेथलि उष्टीं गोळा करीत होता. आणि त्यांतील उष्टे तुकडे प्रसाद मानीत होता. इतकेंच नव्हे, तर रात्रीं हळूच चोरून जाऊन त्या हलक्या लोकांत मिसळून तो तें हळकें झाडलो-टीचें गलिच्छ काम करी ! आणि मी मानवजातीचा खरा खरा सेवक आहे, ह्याकरितां मला तुमच्या घरांतील झाडू होऊं द्या, हें तो प्रत्यक्ष उदाहरणानें दाखवी.

ह्या मनुष्याच्या अंतःकरणांत दुसरी एक प्रबळ इच्छा उद्भवली तीं ही कीं, हिंदुधर्माशिवाय जे इतर धर्म आहेत त्यांत कितपत सत्य आहे, तें पहावें. हा कालपर्यंत त्यांना आपल्या धर्माशिवाय दुसरा धर्म ठाऊक नव्हता, पण यापुढें त्यांना वाटूं लागलें कीं, दुसऱ्या धर्मांत काय आहे व ते कसे काय वागतात तें पहावें. व त्याच्यासाठीं जें जें करावें लागेल तें तें करावें, अशी त्यांच्या अंतःकरणांत इच्छा उद्भवली ह्याक-रितां त्यांनीं इतर धर्मांतलि गुरूंची गांठ घेतली. पण आम्ही हिंदुस्थानांतील लोक गुरु कोणाला म्हणतो, तेंही आपणांस नीट समजलें पाहिजे. हे गुरु म्हणजे केवळ ग्रंथांतील कीटक

नव्हेत, तर जनिन्मुक्त झालेले पुरुष म्हणजे खरें खरें आत्मज्ञान ज्यांनीं संपादन केलें आहे असे पुरुष अनेकच्चे नव्हत.

त्यांना एक मुसलमान फकीर सांपडला, तेव्हां ते त्याच्या जवळ जाऊन राहिले. त्यांनीं त्याचा अनुग्रह घेतला; व ते कांहीं काल मुसलमानही बनले. ते मुसलमानांप्रमाणेंच राहूं लागले. ते मुसलमानांप्रमाणेंच पोशाख करीत, आणि त्याच्या धर्माप्रमाणेंच बरोबर वागत. नंतर त्याप्रमाणेंच दुसऱ्या धर्मांत शिरून त्यांनीं त्याच्याप्रमाणेंही वागणूक केली. आणि सरतेंशेवटीं निश्चय ठरविला कीं, हें सारे धर्म खरेच आहेत. कारण सर्वांमध्यें ध्येय असें एकच आहे. पण त्या स्थळीं जाण्याचे मार्ग मात्र वेगवेगळे आहेत, इतकेंच कायतें.

नंतर आपण परिपूर्ण व्हावें असा त्यांच्या मनांत विचार आला, आणि स्त्रीपुरुषांतील भेदही सुटावा असें त्यांच्या मनानें घेतलें. कारण आत्म्याला कांहीं स्त्रीपुरुष हा भेद नाहीं. आत्मा हा पुरुषही नव्हे व स्त्रीही नव्हे. लिंगभेद हा फक्त देहांत आहे, आणि जो पुरुष आत्मत्वाला पोहोंचण्याची इच्छा करतो, तो त्याशीं एकरूप होऊं शकणार नाहीं. कारण तो जर पुरुषदेहानें जन्मला असेल तर प्रत्येक वस्तूंत स्त्रीत्वाची कल्पना त्यांच्या मनांत उभी राहील. त्यावरून त्यांना वाटूं लागलें कीं आपण बायकोच आहोंत. ते स्त्रीचा वेष करूं

लागले. बोलणेंसुद्धां बायकांसारखेंच बोलत. त्यांनीं पुरुषाचे सारे धंदे सोडून दिले, आणि आपल्या कुटुंबांतील स्त्रियांतच ते राहूं लागले. ह्याप्रमाणें कांहीं वर्षें गेल्यानंतर त्यांचें मन बदललें आणि स्त्रीपुरुषाची कल्पनाच नाहींशी झाली. त्यामुळें त्याबरोबर त्यासंबंधाच्या त्यांच्या इच्छाही मावळल्या, आणि त्यांच्या दृष्टीनें सारी सृष्टीच निराळी झाली.

पाश्चत्य देशांतील लोक आपल्या स्त्रियांची पूजा करतात असें आम्ही ऐकतों. पण त्यांचें सौंदर्य व तारूण्य ह्या दृष्टीनें तसें होणें साहजिकच आहे. परंतु ते जी स्त्रीची पूजा करीत ती अशाकरितां नव्हे. तर प्रत्येक स्त्रीचें मुख त्यांना 'जगज्जननी' प्रमाणेंच मनमोहक वाटे, म्हणून! त्यांत दुसरी भावनाच नसे. ज्यांना लोक शिवणारसुद्धां नाहींत अशा बायकांपुढें हे गृहस्थ उभे रहात आणि त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून आपल्या अश्रुजलानें त्यांचे चरण धुवीत आणि अर्धवट शुद्धींत ह्मणत:—

"हे 'जगज्जननी!' तूं एका स्वरूपानें रस्त्यांतून चालत असतेस, आणि दुसऱ्या स्वरूपानें तूं सर्व ब्रह्मांड होऊन राहतेस. माते! मी तुला नमस्कार करतो. आई! मी तुला वंदन करतो." असें म्हणतांना मीं स्वत: त्यांस कित्येक वेळां पाहिलें आहे, सर्व विषयासक्ति सुटल्यानंतर व त्या वृत्तीला मिळाल्या-

नंतर त्या सौख्याचा विचार करा. त्यांना प्रत्येक स्त्रीचें मुख अगदीं निराळ्या प्रकारचें दिसत असे. अशा प्रेमदृष्टीनें व अशा पूज्यबुद्धीनें जो कोणी स्त्रियांकडे पाहील त्याला त्या स्त्रियांच्या पलीकडे मानवजातीची संरक्षक अशी आनंदमय 'जगज्जननींच' साक्षात दिसेल. आम्हांला जें काय पाहिजे तें हेंच. परंतु आपल्याला असेंही ह्मणतां येण्यासारखें आहे कीं, स्त्रीला पुढें करून ती ईश्वरी शक्ति आपल्याला तोंडघशी देणार नाहीं, कशावरून? पण तिनें कधीं कोणाला आजपर्यंत फसविलें नाहीं, व पुढें ती कोणाला फसविणारही पण नाहीं. ती न समजतां आपण होऊनच आपल्या भक्ताला दर्शन देते; ती प्रमाद व कपट ओळखते; ती ढोंगीपणा जाणते; सत्याचा प्रभाव ती नेमका ताडते; अध्यात्माचें तेज पहाते; आणि पवित्रतेचा पवित्रपणांही मनांत आणते. जगांतील प्रत्येक देशांत असा पवित्रपणा असणें अत्यंत अवश्य आहे.

त्या मनुष्याच्या चरित्रांत असा कडक व निर्मळ पवित्रपणाच भरलेला होता. आमच्या आयुष्यांत ज्या नाना प्रकारच्या धडपडी उत्पन्न होतात, त्या सर्व त्याच्या नष्ट झालेल्या होत्या. त्यानें आपले पाऊण आयुष्य खर्चीं घालून जीं पारमार्थिक रत्नें पैदा केलीं तीं सर्व मनुष्यांस देण्याची तयारी होऊन राहिली होती. ह्मणून आतां हें धर्ममंडळ स्थापन झालें आहे. हें

3C32

धर्ममंडळ मोठें विलक्षण आहे. गुरु ह्मटला म्हणजे आमच्या देशांत अत्यंत पूज्य व सन्माननीय गणला जातो. त्याला तेथें प्रत्यक्ष परमेश्वर असेंच समजतात. आईबापांनासुद्धां मान देत नाहींत, इतका आम्ही गुरूला मान देतों. आईबाप आम्हांला फक्त शरीरच देतात; परंतु गुरु हा आम्हांला मुक्तीचा मार्ग दाखवितो. आम्ही त्याचीं लेंकरें आहोंत आणि त्याच्या अध्यात्मपरंपरेंतच आम्ही जन्मतों. एखादा अद्वितीय गुरु भेटला कीं, सर्व हिंदु लोक त्याला सन्मान देण्यासाठीं येतात, व ते त्याच्याभोवतीं जमतात. अशा प्रकारचा तो एक गुरु होता; पण आपला कोणीं सन्मान करावा अथवा करूं नये ह्याचा विचारही त्याच्या मनांत येत नसे. आपण मोठे सद्गुरु आहों अशीं त्याच्या मनांत भावनाही नसे. त्याला येवढेंच वाटे कीं, प्रत्येक कार्य घडविणारी एक काय ती ' जगज्जननी ' आहे. दुसरें कोणी नाहीं. ते नेहमीं म्हणत, " माझ्या तोंडांतून जर कांहीं चांगलें निघालें तर तें बोलणारी ' जगज्जननीच. ' त्याच्याशीं मला काय कर्तव्य आहे ? " कोणतेंही काम करीत असतांना त्यांची कल्पना नेहमीं हीच असे; आणि त्यांच्या अंतकालपर्यंत त्यांनीं ती सोडली नाहीं. नाहीं तर हल्लींच्या सुधारकांचें व टीकाकारांचें काम कसें असतें तें आपण पाहतोंच. ते दुस-

त्याचें छिद्रान्वेषण कसें करतात, चांगल्या वस्तूची मोडतोड करून आपल्याच कल्पनेची कशी शक्कल लढावितात, हें सारें जगजाहीरच आहे. आपण सारे आपल्याच अकलेचे तारे तोडीत असतों. मात्र दुर्दैवानें ते तुटत नाहींत! हेंच काय तें भाग्य. कारण, आपल्याप्रमाणेंच दुसराही प्रत्येक इसम आपआपला सल्ला द्यावयाला तयार असतोच. पण ह्या साऱ्यापेक्षां श्रेष्ठ असा तेथें एकच मनुष्य होता. त्याला कोणींच ओळखलें नाहीं. त्याच्या साऱ्या चरित्रांत एकच मोठें तत्त्व होतें. तें हें कीं, "धुंडावयाला कोठेंच बाहेर जाऊं नका. तुमचें हृत्कमल विकसित होऊं द्या. म्हणजे बाकी सर्व कांहीं आपोआप प्राप्त होईल. प्रथम परमार्थ साध्य करा. म्हणजे तो जगाला द्यावयाला कांहींच उशीर लागणार नाहीं." शिकावयाची मोठी गोष्ट काय ती हीच. हीच गोष्ट माझ्या गुरूंनीं मला शेंकडों वेळां सांगितलेली आहे. पण ती मी किती तरी वेळां विसरूनच जातों!

"विचाराचें सामर्थ्य केवढें असतें तें समजून घ्या. एखादा मनुष्य गुहेंत जाऊन कोंडून घेऊन बसेल आणि गहन विचार करून करून मृत्यु पावेल. तरी तो विचार त्या गुहेचा खडक फोडून बाहेर पडेल; आणि त्याच्या लहरी सर्व वातावरणांत पसरून अखेर सर्व मनुष्यजात त्याच विचारानें भरून

जाईल. इतकें एका विचाराचें सामर्थ्य आहे. ह्याकरितां आपल्या कल्पना दुसऱ्याला सांगण्याची घाई करूं नका. प्रथम असें पहावें कीं, आपल्याला कधीं तरी द्यावयाचें आहे. ज्याला कांहीं द्यावयाचें आहे तें तो एकटाच देत असतो; आणि ज्याला कांहीं शिकवावयाचें आहे तो एकटाच कांहीं तरी शिकवितो. कारण, शिकविणें म्हणजे कांहीं बोलणें नव्हे, शिकविणें म्हणजे कांहीं आपलें मत कळविणें नव्हे. तर तो एक ज्ञानोपदेश आहे. ह्या झाडाचें फूल तोडून जसें मला झट्कर तुम्हांला देतां येईल, तसा कांहीं परमार्थ देतां येत नाहीं. त्याला ह्यापेक्षां पुष्कळ विशेष ज्ञान लागतें. ह्याकरितां प्रथम आपण सदाचारी बनावें हेंच तुमचें श्रेष्ठ कर्तव्य आहे. तें तुम्हास करतां येईल. " आधीं स्वतः सत्य संपादन करा. म्हणजे पुढें ज्याला तुम्हीं शिकविणार त्याला तेवढेंच पुष्कळ होईल. त्यांत सर्वांचा समावेश होईल." असें माझ्या गुरूंचें म्हणणें होतें. त्यांनीं कोणावर कधीं टीका म्हणून केलीच नाहीं.

ह्या मनुष्याच्या सहवासांतच रात्रंदिवस मीं कैक वर्षें काढलीं; परंतु त्या महात्म्याच्या मुखांतून कोणत्याही पंथ-विषयीं किंवा व्यक्तीविषयीं कधीं निंदेचें अक्षर म्हणून बाहेर पडलें नाहीं. सर्वांविषयीं त्यांची बुद्धि नेहमीं अशीच असे-

त्यांच्या ऐक्याचें गूढच त्यांना सांपडलेलें होतें. एखादा मनुष्य मोठा बुद्धिमान् होईल; भक्तिमान् होईल; खोल होईल; किंवा चलाखही होईल. निरनिराळ्या धर्मांमध्यें अशा प्रकारचे एक दोन मनुष्य तरी असतातच; किंवा हे चारही गुण एकाच मनुष्यामध्येंही असूं शकतील आणि असे असतील तेच पुढें कांहीं तरी करून दाखवितील, अशी त्यांची कल्पना होती.

त्यांनीं कोणास कधीं नांवें ठेविलीं नाहींत. त्यांना सर्वांमध्यें सारें चांगलेंच दिसत असे. ही गोष्ट त्यांनीं इतक्या पल्लयाला पोंचविली होती कीं, एकदां एका अत्यंत निंद्य पक्षांतील कांहीं लोक येऊन त्यांनीं त्यांच्या तोंडावरच जेव्हां त्यांच्या तत्त्वावर भडिमार केला तेव्हां ते फक्त इतकेंच म्हणाले कीं, " ठीक, ठीक, कदाचित् प्रत्येक घराला मागलें दार असेल ! " सारा देवभोळेपणा पाहून त्यांची दृष्टि निवळली होती. त्यामुळें त्यांचे ठिकाणीं पारमार्थिक तत्त्व तत्काळ भरत असे; आणि तें दुसऱ्यास दाखविण्याविषयीं ते सदासर्वदा तयार असत. ह्या निरनिराळ्या देखाव्यांचा तो एक केंद्र होता. म्हणून ते सर्वांची नेहमीं सांगडच घालीत असत. ते बोलूं लागले म्हणजे त्यांच्या प्रत्येक शब्दांत ज्ञानाचा प्रभाव व तेज फाकत असे. कारण, ते जें काय बोलत त्यांत भाषासौंदर्य कांहींच नसे. पण बोलण्याचा जो ठसा ऐकणाराच्या

क्रमांक २४ नों. वि. १०७५ ३०/७/४५

मनावर उमटतो तो कांहीं व्यक्तीवर अवलंबून नसतो, तर त्याच्या आचरणावर व वजनावर अवलंबून असतो, हा अनुभव आम्हांला आलेला आहे. आह्मांपैकीं प्रत्येकाच्या मनावर त्यांच्या बोलण्याचा ठसा एकसमयावच्छेदेंकरून उमटे. मोठमोठ्या वक्त्यांचीं भाषणें आम्ही ऐकितों, त्यांच्या भाषणांत मोठमोठालीं अद्भूत प्रमाणें दिलेलीं असतात, पण आम्ही घरीं गेलों कीं त्या साऱ्यावर पाणी पडतें. दुसऱ्या वेळीं आम्ही चारच शब्द कानांनीं ऐकतों. त्यांतील भाषा साधीच असते, पण ते शब्द जन्मभर आम्हांला आठवत असतात. ते आमच्या हृदयांत राहतात, त्यांची हृदयांत ग्रंथि पडते आणि शेवटीं त्याचे परिणामही पण घडून येतात. ज्याला आपलें व्यक्तित्व दुसऱ्यांत घालतां येतें, अशा मनुष्याच्या शब्दाचाही परिणाम घडून येतो. पण तसें करणाराच्या अंगीं चांगलेंच व्यक्तित्व पाहिजे. उपदेश हा सारेच देतात आणि घेतात. गुरु उपदेश देतो आणि शिष्य ग्रहण करतो. पण एकानें कांहीं तरी दिलें पाहिजे, आणि दुसऱ्यानें घेण्याला हात पसरला पाहिजे.

हा मनुष्य 'हिंदुस्थान' ची राजधानी जें 'कलकत्ता' शहर त्याच्या जवळच रहावयाला आला.* 'कलकत्ता' हें

---

* परत येतांना वैद्यनाथाजवळील एका खेड्यांतील गरिबी पाहून त्यांचें अंतःकरण इतकें कवळलें कीं, तेथील लोकांस सुखी केल्यावांचून

आमच्या देशांत मोठी महत्वाची ' युनिव्हार्सिटी ' असलेलें शहर आहे. तेथून प्रत्येक वर्षीं हजारों नास्तिक व देहात्मवादी बाहेर पडतात. ह्या आमच्या युनिव्हार्सिटींतील उत्तमोत्तम असे पुष्कळ लोक नास्तिक व अशक्यवादी असे म्हणविणारे ह्या महात्म्याकडे येऊन त्यांचें भाषण ऐकत असत. मलाही लहानपणापासूनच सत्यशोधनाचा फार नाद होता. एखादा मनुष्य उत्कृष्ट पुराण वगैरे सांगत असला म्हणजे मीही कधीं कधीं तेथें जाऊन ऐकत असें. आणि तें त्याचें आटोपलें म्हणजे मी त्याच्याकडे जाऊन त्याला विचारीं कीं, " तुमचें भाषण सारें खरें आहे काय? किंवा तुमचा तरी त्यावर विश्वास आहे काय? त्याच्याबद्दलची खात्री तुह्मांला स्वतःला तरी आहे काय? " म्हणजे तो उत्तर देई कीं, " माझीं मतें हींच असून माझा त्याच्यावर विश्वास आहे. " ह्यापैकीं पुष्कळ लोकांना मी असा प्रश्न करीं कीं, " तुम्हीं परमेश्वर पाहिला आहे का? " पण ते सारे लोक निव्वळ फसवें होत, असाच मला अनुभव आला. ' श्रीशंकराचार्यां 'नीं एके

---

आपण निघणार नाहीं, असा त्यांनीं निश्चय केला. ह्याकरितां मथुरानाथांनीं कित्येक दिवसपर्यंत राहून त्या सर्व गांवाला अन्नवस्त्र पुरविलें! व गरिबांच्या अडचणी दूर करण्यासाठीं थोडाथोडा पैसा दिला; आणि रामकृष्ण परमहंसांना संतोषित करून बरोबर आणलें.

ठिकाणीं म्हटलेलें मला आठवतें, तें हे कीं, "अलंकार-शास्त्रांत कुशल असलेले विद्वान् लोक लांब लांब व गोड गोड वाक्यांनीं युक्त अशा अनेक मार्गांनीं पुराणांतील गोष्टी वर्णन करतात. त्यामुळें इतरांना त्यांच्या बुद्धिमत्तेचें कौतुक वाटतें इतकेंच. तेणेंकरून बुद्धीचा आनंद वाढतो; परंतु त्यापासून मनुष्य अज्ञानांधःकारांतून मात्र सुटत नाहीं."

अशा प्रकारें मी अधिकाधिकच नास्तिक बनत चाललों असतां एकाएकीं माझ्या अंतःकरणावर चक्क प्रकाश पडला. तो प्रकाश असा; मीं एके दिवशीं ह्या पूर्वीं सांगितलेल्या मनुष्याचें नांव ऐकिलें आणि त्यांस भेटावयास गेलों. पाहिलें तों हा मनुष्य इतर मनुष्यांसारखाच साधा दिसत होता. पण त्याच्यामध्यें कांहीं ढोंग नव्हतें. तो अगदीं साधीच भाषा बोलत असे. ती इतकी कीं, जणों काय हा एखादा गांवढळ मनुष्यच आहे! तें पाहून मीं मनांत म्हटलें, "असला हा मनुष्य सद्गुरु होईल काय?" मी हळूहळू त्याच्याजवळ गेलों आणि साऱ्या जन्मभर जसा इतरांस मीं प्रश्न करी त्याप्रमाणें मीं त्यालाही प्रश्न केला. मीं त्याला विचारलें, "तुमचा परमेश्वरावर भरंवसा आहे काय?" त्यानें उत्तर दिलें. "होय." "तर मग महाराज! आपण तो असल्याचें सिद्ध कराल काय?" "हो; अलबत." "तें कसें काय?"

" येथें मी जसा तुला पाहतों आहे, तसाच मीं त्याला पाहिलेला आहे. मात्र इतकेंच कीं, दृष्टि थोडीशी निराळी. "

हें ऐकल्याबरोबर मी एकदम चकित झालों. कारण, परमेश्वर पाहतां येतो, असें एकदम जोरानें सांगण्याचें धाडस करणारा मनुष्य हा मला प्रथमच भेटला. कारण, धर्म म्हणजे सत्तत्त्व; तें कळण्याला व त्याचें ज्ञान होण्याला, आपल्यासभोंवार असलेल्या जगाचें ज्ञान होण्याला जो काय मार्ग आहे, त्यापेक्षां अधिक अमर्याद व दुर्घट मार्ग असला पाहिजे. तो कांहीं मनुष्याची थट्टा व थोतांड नव्हे. म्हणून मीं त्या मनुष्याकडे दररोज जाण्याचा परिपाठ ठेवला. अर्थात् तेथें पुष्कळच अनुभव आले. ते आतांच मला सांगतां येत नाहींत. तरी मी येवढें सांगतों कीं, तेथें मला धर्माचा खरा मार्ग सांपडला. एका स्पर्शानें, एका दृष्टीनें, सारें आयुष्य बदलून गेलें. ही गोष्ट वारंवार माझ्या प्रत्ययास आलेली आहे.

आपण सर्वांनीं बुद्ध, ख्रिस्त व महंमद ह्यांच्यासंबंधानें वाचलेलेंच आहे. ते सुद्धां उभे राहून एका मनुष्याला म्हणतात कीं, " तूंच सर्व हो, म्हणजे खुनी मनुष्य असला तरी सुद्धां तो मुक्त होईल. " हें म्हणणें मलाही पटलें. ह्या सर्व गोष्टींचा

मीं जेव्हां आपल्या ठिकाणींच विचार केला, तेव्हां माझा नास्तिकपणा आपोआपच नाहींसा झाला.

माझे गुरु मला नेहमीं म्हणत असत कीं, "जगांतील इतर वस्तूंपेक्षां धर्म हा अधिक खरेपणानें व सोप्या रीतीनें देतां घेतां येण्यासारखा आहे." ह्याकरितां प्रथम परमार्थी व्हा. देण्यासारखें कांहीं तरी हस्तगत करा आणि मग जगापुढें उभे राहून तें त्याला द्या. धर्म म्हणजे कांहीं शब्द नव्हेत, कीं कल्पनाही नव्हेत, किंवा तो पंथही नव्हे. धर्म हा पंथामध्येंही रहात नाहींच, आणि समाजमध्येंही रहात नाहीं. धर्म हा परमेश्वर आणि आत्मा ह्यांच्या सांध्यावर असतो. मग त्याला जात किंवा समाज कसा काय उत्पन्न करणार? एखाद्या समाजाकडून किंवा कामदाराकडून धर्माचा प्रसार कधीं झाला आहे काय? व्यापारधंद्यांत तर तो अधोगतीलाच जातो. जेथें धर्माची विक्री चालते, तेथें व्यापाराचींच तत्त्वें धर्मांत शिरून परमार्थ नष्ट होतो. 'एशिया' हेंच धर्माचें मूलस्थान आहे. साऱ्या जगांतील धर्म तेथूनच उत्पन्न झालें. आधीं प्रथम उत्पन्न झालेल्या अशा एका धर्माचें तरी मला नांव सांगा पाहूं? पण हो! अशा मार्गानें धर्माचा प्रसार करणारें 'युरोपखंड' आहे, म्हणूनच त्याला कधीं यश येत नाहीं, आणि जग परमार्थी बनत नाहीं. मताधिक्य

झालें म्हणून मनुष्य अधिक धार्मिक होतो, किंवा कमी मतें पडलीं म्हणून परमार्थ कमी होतो असें आहे काय? जीव आणि शिव ह्यांच्यामधील जो संबंध तोच धर्म होय. तो सत्याचरणावर आहे. शब्दांत नाहीं, ग्रंथांतही नाहीं; किंवा धार्मिक शरीर एकत्र होण्यांतही नाहीं; अथवा स्नान, संध्या, प्रार्थना इत्यादि कवाईत करण्यामध्येंही नाहीं. ही धर्माची कवाईत म्हणजे कवच आहे, खरा धर्म नव्हे, ह्या गोष्टी ‘ युरोपां ’ तच आहेत. ‘ एशियां ’ मध्यें नाहींत. कारण, ‘ एशिया ’ हें धर्माचें माहेरघर आहे. म्हणून निरनिराळे पंथ सोडून देईपर्यंत व ग्रंथांत आणि शब्दांतच तो आंवळलेला असेपर्यंत त्याची कधींच भरभराट होणें नाहीं. ह्या मनुष्याच्या चरित्रापासूनच मी जो काय पहिला धडा शिकलों तो हाच.

ह्या मनुष्यापासून मीं दुसरा धडा कोणता घेतला म्हणाल तर दुसऱ्या कोणांस दुखवूं नये. कोणत्याही मनुष्याच्या धर्मांत ढवळाढवळ करूं नये. तुम्हांला कांहीं अधिक चांगलें त्याला देववलें तर द्या. तो जेथें उभा असेल तेथेंच त्याला हात द्या. आणि वर काढा. परंतु त्याची पूर्वींची श्रद्धा असेल ती नष्ट करूं नका. सांगितल्याबरोबर जो पुरुष एका क्षणांत हजार पुरुष बनूं शकतो, तोच खरा गुरु होय. जो तत्काल खालीं उतरून विद्यार्थ्यांच्या बरोबरीचा

होतो, विद्यार्थ्यांच्या आत्म्यामध्येंच आपला आत्मा घालतो, त्यांच्याच डोळ्यानें पाहतो, त्यांच्याच कानांनीं ऐकतो, आणि त्यांच्याच मनानें समजतो, तोच खरा गुरु होय. तोच गुरु खरें शिक्षण देईल, इतरांच्यानें होणार नाहीं.

कोणतीच गोष्ट मान्य करूं नये, असा जे उपदेश करणारे आहेत ते अधोगतीला नेणारे व विध्वंसक होत. हे जगांत इतकें असून मानवजातीकरितां कांहींच करीत नाहींत. जगांतील धर्म असे उलट किंवा परस्परविरोधी मुळींच नाहींत. ते एका शाश्वत धर्माचेच अनेक पोटभेद आहेत. एक सर्व-व्यापी धर्म आहे, तो शाश्वतरूपानेंच अस्तित्वांत आलेला आहे, आणि तोच चिरकाल राहील. हाच धर्म अनेक देशांत आपला परिणाम करतो; आणि निरनिराळ्या मार्गांनीं आपला अंमल चालवितो. ह्याकरितां सर्व धर्मांना आपण मानच दिला पाहिजे; आणि शक्य असेल तितका मान्य करण्याविषयीं आपण खटपट केली पाहिजे. धर्म जे प्रगट होतात ते कांहीं जातीकडे किंवा स्थलाकडे पाहून प्रगट होत नाहींत. तर व्यक्तीच्या सामर्थ्याप्रमाणें प्रगट होतात. एका मनुष्यामध्येंच त्याच्या कर्माप्रमाणें शीघ्र व निश्चित धर्म प्रगट होत असतो. दुसऱ्या एखाद्यामध्यें त्याच्या भक्तीप्रमाणें प्रगट होतो, तर

तिसऱ्यामध्यें त्याच्या गहन ज्ञानाप्रमाणें प्रगट होतो; व चवथ्यामध्यें त्याच्या तत्त्वज्ञानाप्रमाणें प्रगट होतो. हाच त्याचा नित्यांचा क्रम.

आम्ही जर दुसऱ्याला असें म्हणूं कीं " तुमचे मार्ग बरोबर नाहींत " तर ती आमची चुकी होईल. मुख्य व गूढ तत्त्व जें काय आपल्याला मुख्यतः शिकावयाचें तें हेंच कीं, सत्य हें एकच असून तें एकसमयावच्छेदेंकरून एक व अनेक रूपांनींही असूं शकतें. ह्याकरितां तें पाहणारा ज्या ज्या स्थळावरून तें पाहतो, तेथून एकच सत्य असलें तरी तें त्याला निरनिराळ्या रूपानें दिसतें. ह्यावरून आपण कोणाशींही विरोध न करितां सर्वांशीं सहानुभूतीच दाखविली पाहिजे.

जगामध्यें निरनिराळे उत्पन्न झालेले स्वभाव हे नेहमींचेच आहेत, ही गोष्ट लक्षांत आणून त्यामुळेंच धर्मांतील तत्त्वेंही निरनिराळीं झालीं आहेत हे लक्षांत ठेवावें. आपण परस्परांस क्षमा करण्याविषयीं एकमेकांचे बांधलेले आहोंत हें आपणांस समजलें पाहिजे. स्वभाव ज्याप्रमाणें नानाविध असून ते एकरूप आहेत व जगांतील ह्या नानाविध चमत्कारांच्या पलीकडे अनंत व अधिकारी असें ऐक्य आहे, त्याचप्रमाणें प्रत्येक मनुष्याची गोष्ट आहे. एक सूक्ष्म आणु हा

सुद्धां सूक्ष्म परमाणूंचाच समुदाय आहे. ह्या सर्व भिन्नत्वांमधूनच हे शाश्वत ऐक्य धांवत असतें. तेंच आम्हीं ओळखलें पाहिजे. साऱ्या कल्पनांपेक्षां ह्याच कल्पनेबद्दल आजकाल ओरड केली पाहिजे, असें माझें मत आहे. धर्मपंथांची जणों काय आढीच घातलेली आहे. अशा एका देशांतून एक पंथ येऊन त्याच्या दुर्दैवानें म्हणा कीं सुदैवानें म्हणा धर्माची म्हणून कांहीं कल्पना आहे, असा प्रत्येक मनुष्य धर्माचा शोध करण्याकरितां पुढारी म्हणून पाठवावा लागतो. असे जगांतील अनेक धर्मपंथ अगदीं लहानपणापासून मी पहात आलों आहे. 'मार्मन' लोक सुद्धां 'हिंदुस्थानां'त धर्मोपदेश करण्याकरितां आलेले होते. सारे बिचारे खुशाल येऊं देत! धर्मोपदेश करण्याचें स्थळ तेंच आहे. इतर कोणत्याही देशापेक्षां त्याच देशांत धर्माचें बीज लौकर रुजलें जातें; व त्याचीं पाळेंमुळेंही फार खोल जातात. आपण येऊन हिंदु लोकांना जर राजकीय विषय शिकवूं लगाल, तर तो त्यांना मुळींच समजणार नाहीं; पण तुम्हीं जर त्यांना धर्मोपदेश कराल तर तुम्हांला शेंकडों—नव्हे हजारों—अनुयायी येऊन मिळतील. आणि तुमच्या हयातींतच तुम्हांला चालता बोलता परमेश्वर दृष्टीस पडेल. 'हिंदुस्थाना'ला हीच गोष्ट पाहिजे आहे, आणि ती तशी आहे ह्यांतच मला आनंद

वाटतो. हिंदुधर्मांतही अनेक पंथ आहेत. आणि त्यांची संख्याही पुष्कळ आहे; आणि त्यांपैकीं कांहीं अगदीं प्रसिद्ध-पणें निराशेनें विरुद्धही झालेले आहेत. तथापि तेही सारे सर्वांप्रमाणें एकाच धर्माचीं निरनिराळीं स्वरूपें हेंही पण मी सांगून ठेवतों.

"निरनिराळ्या नद्या ज्याप्रमाणें निरनिराळ्या पर्वतां-तून निघतात, त्या सरळ किंवा वांकडयातिकडया वहातात तरी शेवटीं त्या सर्वांचें पाणी समुद्रामध्यें एकरूपच होऊन जातें, त्याप्रमाणें निरनिराळे धर्म व पंथ आपआपल्या मार्गा-नुसार निरनिराळे वाटत असले तरी ते अखेर तुझ्यापाशीं एकरूपच होणार." पण ही कांहीं सिद्ध करीत बसण्याची गोष्ट नव्हे. तिला अनुभवच पाहिजे. आपण कित्येक लोक असें म्हणतांना ऐकतों कीं, "हो अलबत; त्यांत पुष्कळ गोष्टी चांगल्या आहेत." हा कांहीं पक्ष घेण्याचा मार्ग नव्हे.

कित्येकांमध्यें अत्यंत अद्भुत व उदात्त असे विचार असतात; दुसऱ्या कितीएकांमध्यें ऐतिहासिक नव्हेत असे उत्क्रांतीचे लहान लहान भाग असतात. "आमच्यामध्यें सर्व कांहीं भरलेलें आहे." एक मनुष्य म्हणतो, 'आमचाच धर्म काय तो सर्वांत उत्तम, कारण तो अत्यंत प्राचीन आहे.' दुसराही म्हणतो कीं, 'माझा धर्म उत्तम, कारण तो अत्यंत

अर्वाचीन असल्यामुळें नवा व ताजा आहे.' परंतु संरक्षक सामर्थ्य हें प्रत्येकामध्येंच आहे, हें आपण ओळखलें पाहिजे. देवळांत ह्मणा कीं मठांत म्हणा, आपण त्याविषयीं जें जें काय भिन्न भिन्न ऐकतों, तो सुद्धां देवभोळेपणाच आहे. परमेश्वर एकच असून तोच साऱ्यांना उत्तर देत असतो. तो तुम्हींही नव्हे, मीही नव्हे किंवा मनुष्यापैकीं कोणीही नव्हे. ह्या आत्म्याच्या सूक्ष्म जीवांशाचें संरक्षण करण्याला किंवा त्याची मुक्तता करण्याला त्याच्यावांचून दुसरा कोणी समर्थ नाहीं. दुसरा कोणी जबाबदारही नाहीं. सर्वांचा जबाबदार तो एक सर्वसमर्थ प्रभूच आहे. परमेश्वरावर आपली श्रद्धा आहे; ह्या साडेतीन हात देहांतच सर्व सत्य आम्हीं हस्तगत केलें; आणि बाकीच्या सर्व मनुष्यजातीच्या संरक्षणाचा आम्हीं जिम्मा घेतों; असें जे लोक छातीला हात लावून सांगतात तें कसें काय हेंच आम्हांला समजत नाहीं!

मनुष्याला ह्या देहांतच परिपूर्ण होतां येतें, ही गोष्ट माझ्या गुरूच्या समक्षच माझ्या प्रत्ययास आलेली आहे. ज्याची जिव्हा कधीं कोणाला शाप देत नाहीं; कीं कधीं कोणाची निंदा करीत नाहीं. एखादी वाईट गोष्ट पाहण्याला-सुद्धां ज्याचे नेत्र जणोंकाय अंध होतात. वाईट चिंतण्याला-सुद्धां मनाला सामर्थ्य रहात नाहीं. चांगल्याशिवाय दुसरें

कांहीं ज्याला दिसतच नाहीं. अशी निस्सीम पवित्रता, असें कडकडीत वैराग्य, हेंच काय तें परमार्थांतील रहस्य होय. वेद म्हणतो, " संततीनें किंवा संपत्तीनें मनुष्य अमरत्वाला पोंचत नाहीं, तर वैराग्यानेंच फक्त तें प्राप्त होतें. " ख्रिस्त म्हणतो, " तुझ्याजवळ जें असेल तें विकून गरीबाला दे आणि माझ्या मागून चल. "

मोठमोठे साधु आणि महात्मे ह्यांनीं हेंच प्रतिपादन केलें आणि तेंच केलें. वैराग्याशिवाय परमार्थ साधणार कसा? साऱ्या धार्मिक विचारांना वैराग्याचा पाठिंबा हा नेहमीं असावयाचाच, त्यांत कांहीं अंश कमी असल्याचें कोठें दृष्टीस पडेल तर, त्या धर्मांत तितक्याच अंशानें संसारज्ञान घुसलेलें असावयाचेंच, आणि त्याच मानानें परमार्थज्ञान कमी पडावयाचें त्या मनुष्यानें तर वैराग्याला सारा देहच अर्पण केलेला होता. आमच्या देशामध्यें जो संन्याशी होतो त्यालाही जड संपत्ति व सत्ता सर्व सोडून द्यावी लागतात. त्याप्रमाणें आमच्या गुरूंनीं तीं सर्व सोडून दिलीं होतीं. ते पैशाला शिवतसुद्धां नसत. इतकेंच नव्हे तर,* त्यांनीं आपल्या ज्ञान-

* अभ्यासानें त्यांची भावनाशक्ति इतकी जबर झाली होती कीं; त्यांच्या मनोधर्माविरुद्ध यत्किंचित्‌ही एकादी गोष्ट असली तरी त्यांचें मन त्यांस त्याची तावडतोब सूचना देत असे. एकदां तें यदु मलिक यांचे

तंतूंना अशी कांहीं संवय लावून ठेवली होती कीं, ते जर झोपेंत असले आणि कोणी एखाद्यानें त्यांच्या हातावर एखादं नाणें आणून ठेवलें, तर सारें शरीर कापूं लागे, शिरा आखडत आणि तें नाणें ताडकर उडून बाहेर पडे ! *

बागेंत असतां यदुमलिक यांनीं त्यांस प्रकृतीसाठीं रोज एकेक गोळी घ्यावी म्हणून तीन गोळ्या दिल्या. त्यांत थोडी अफू होती. त्या गोळ्या वस्त्रांत घेऊन ते दक्षिणेश्वरीं निघाले. पण तेवढ्यानेंच त्यांचें मन गोंधळून ते वाट चुकले. कांट्याकुट्यांत शिरूं लागले. असें कां होतें हें प्रथम त्यांस समजेना. पण कांहीं वेळानें त्यांच्या ध्यानांत आलें कीं, ह्या अफूच्या गोळ्या ! लगेच त्यांनीं त्या फेंकून दिल्या व ते सरळ वाटेस लागले.

* भगवान् रामकृष्ण स्वामी विवेकानंदांस म्हणत ‘ सराफ रुपये पारखून घेतो, त्याप्रमाणें मीं सांगितलेली प्रत्येक गोष्ट तूं नीट पारखून घेत जा. पुरी कसोटी लागल्याशिवाय तूं कोणतीही गोष्ट मान्य करूं नको. ’ एकदां परमहंस कलकत्त्यास असतां स्वामी विवेकानंद दक्षिणेश्वरीं आले. तेथें येऊन पाहतात तों भगवान् रामकृष्ण तेथें नाहींत. तेव्हां त्यांच्या मनांत एक विलक्षण कल्पना आली व त्यांनीं आपल्या गुरूंच्या–रामकृष्णांच्या म्हणण्याचें प्रत्यंतर पहावयाचें ठरविलें. आणि लगेच त्यांनीं आपल्या खिशांत एक रुपया होता तो जवळ कोणी नाहींसें पाहून अंथरुणाखालीं घालून ठेविला व स्वतः पंचवटींत जाऊन ध्यान करूं लागले. थोड्याच वेळानें परमहंसांची स्वारी कलकत्त्याहून दक्षिणेश्वरीं आली. पण खोलींत पाऊल टाकतांच त्यांच्या सर्वांगास पेटके येऊं लागले व चुकून निखाऱ्यावर पाऊल पडतांच मनुष्य जसा दचकून मागें सरतो, तशी एकदम त्यांची अवस्था

पुष्कळ लोक असे होते कीं, त्यांना वाटे आपल्या हातून, कांहीं देणगी हे घेतील तर आपण मोठे भाग्यवान् समजूं. आणि पुष्कळ लोकांनीं हजारों रुपये त्यांनीं घ्यावें म्हणून दिलेही होते. पण ते पाहतांच हा मनुष्य तेथून दूर निघून गेला. निरिच्छतेमध्यें विजयी झाल्याचें तें एक* मूर्तिमंत उदाहरण होतें. कनक आणि कांता ह्याविषयीं पूर्ण-पणें विरक्ति बाणलेला असा तो जीवन्मुक्त होता. त्याची राहणी अगदीं कल्पनेच्या बाहेरची होती. हल्लींच्या युगांत अशा प्रकारच्या मनुष्याची फार आवश्यकता आहे. ह्या दिवसांत अशा वैराग्याची फारच जरूर आहे. कारण,

---

झाली. हा प्रकार काय आहे, हेंच त्यांस समजेना. भगवान् आल्याचें समजतांच विवेकानंदही तेथें आले, आणि गुरूंची ती अवस्था पाहून ते चकित झाले व त्यांस रामकृष्णांच्या कसोटीची धन्य वाटली ! अंथरुणाखालीं साप-बीप तर नसेलना म्हणून एकानें अंथरुण वर उचललें. तों काय ? सळकर रुपाया ! मग स्वामींची अवस्था काय विचारावी ! पण गुरु दयाशील ! त्यांना त्या गोष्टीचा राग तर आला नाहींच, पण उलट त्यांचें स्वामी विवेकानंदांवरचें प्रेम अधिकच दुणावलें.

* एकदां मथुरादासांनीं एक बहुमोलाची शाल परमहंसांचे अंगावर आणून घातली. ती पाहतांच प्रथम त्यांस आनंद झालासा दिसला. पण दुसरेच दिवशीं त्यांनीं तिचा चोळामोळा करून तिची केरसुणी बनविली आणि तिनेंच आपली बसण्याची जागा झाडून काढली !

आजकाल मनुष्यास असें वाटतें कीं, अवश्य वस्तू म्हणून ज्यांना आपण म्हणतों, त्या असल्याशिवाय आपल्याला एक महिनाभर सुद्धां रहातां यावयाचे नाहीं. आणि त्या वस्तू तर काय गणितश्रेढीनें आणि भूमितिश्रेढीनें वाढतच आहेत. ह्या अशा काळांत हें अगदीं अवश्य आहे कीं, एखादा मनुष्य उदयास येऊन जगांतील नास्तिकपणा त्यानें चव्हाटयावर आणला पाहिजे आणि जगांतील सारा पैसा, सोनें, नाणें केवळ कस्पटाप्रमाणें मानलें पाहिजे. अशी माणसेही या जगांत आहेतच.

ह्या मनुष्याला विश्रांति म्हणून कसली ती ठाऊक नव्हती. त्याच्या आयुष्याचा पूर्वार्ध परमार्थाची प्राप्ति करून घेण्यांत खर्च झाला; आणि उत्तरार्धांतील कांहीं वर्षें तो लोकांस देण्यांत खर्च झाली. त्याचा उपदेश ऐकावयाला लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत असत, आणि ते अहोरात्र सारखेच सारखे बोलत रहात. असे एक दिवस दोन दिवस नव्हेत तर महिनेच्या महिने! इतकेंच नव्हे, तर अखेर त्यामुळेंच त्यांचें शरीर अगदीं थकून जाऊन असाध्य स्थितीवर आलें. हळू हळू त्यांचा आवाज चढून अखेर अगदीं बिघडला. तरी त्यांनीं आपल्या प्रकृतीबद्दल विचार म्हणून केलाच नाहीं. आम्ही त्यांच्या जवळ होतोच. आम्हांला तें पहावेना. त्यांनीं

फार बोलूं नये म्हणून आम्हीं पुष्कळ प्रयत्न केला, लोकांना भेटण्याची बंदी केली. पण त्यांना जेव्हां समजलें कीं, लोक आपल्याला भेटावयास येतात व त्यांना बंदी करण्यांत येते, तेव्हां त्यांनीं तसें न करण्याबद्दल सांगून जो येईल त्यास भेटावयास परवानगी दिली. आणि प्रत्येकाच्या प्रश्नांचीं योग्य उत्तरें देऊं लागले. त्यांना जर कोणीं विचारलें कीं, "त्यापासून आपल्याला त्रास होत नाहीं काय?" तर ते थोडेंसें हांसून म्हणत, "हें शरीर होय? असलीं शरीरें माझ्याजवळ शेंकडों आहेत! दुसऱ्याची सेवा करतांना हा देह पडला तर मला मोठा आनंद होईल. एका जीवाचा जरी माझ्याकडून उद्धार होईल तरी मी एकसें काय, पण असलीं हजारों शरीरें त्यासाठीं अर्पण करीन!"

कोणी एक धार्मिक मनुष्य येऊन त्यांना म्हणाला, "महाराज! आपण तर मोठे योगी आहांत. मग आपण आपल्या शरीराकडे थोडेंसें लक्ष देऊन आपली व्याधि बरी कां करीत नाहीं?" ह्यावर ते प्रथमतः कांहीं बोललेच नाहींत. पण दोन तीन वेळां जेव्हां त्यानें तीच तीच विनंति पुन्हा केली, तेव्हां ते हळूच म्हणाले, "भल्या माणसा! तूं मोठा शहाणा आहेस असें मी समजत होतों. परंतु तूं सुद्धां इतर सामान्य लोकांप्रमाणेंच बोलतोस. हें शरीर परमे-

श्वराला अर्पण केलें आहे. तेव्हां तुमचें म्हणणें असें आहे काय कीं, तें दिलेलें शरीर मीं पुन्हां परत घ्यावें? तें तर मी जगाच्या सेवेला वाहिलेलें आहे."

असें म्हणून लोकांना उपदेश करण्याला त्यांनीं सुरवात केली. तेव्हां सद्गुरु आतां देह सोडून जाणार अशी जिकडे तिकडे कुणकुण सुरू झाली. मग काय विचारावें? नेहमींपेक्षां लोकांची दर्शनाला अधिक अधिकच दाटी होऊं लागली. हिंदुस्थानांतील लोक साधूच्या दर्शनाला कसे व किती येतात, ह्याची आपल्याला कल्पना सुद्धां होणार नाहीं. ते त्याच्याभोंवतीं पाळा घालून उभे राहतात, आणि ते जरी देहधारी असतात तरी ते देवस्वरूपीच होऊन राहतात. हजारों लोक केवळ त्यांच्या वस्त्राचा पदर तरी आपणास लागावा म्हणून तिष्ठत असतात. ह्याप्रमाणें एकाची परमार्थवृत्ति पाहून दुसऱ्याचीं मनेंही तिकडेच वळतात. ह्यामुळें मनुष्याला जी इच्छा असते किंवा पाहिजे असते तें तो प्राप्त करून घेतो. राष्ट्रांनासुद्धां हीच गोष्ट लागू आहे.

आपण जर हिंदुस्थानांत याल, आणि राजकीय विषयावर एखादें व्याख्यान द्याल तर तें कितीही चांगलें असलें तरी तें ऐकावयाला लोक जितक्यास तितकेंच येतील

पण तेंच तुम्ही जाऊन धर्मसंबंधीं व्याख्यान द्या, आणि तें सिद्ध करून दाखवा—मात्र केवळ शब्द जाल कामाचें नाहीं—तर हजारों लोक तुमच्या दर्शनास येऊन तुमच्या पायीं लागतील.

म्हणून त्यांनीं आपला उपदेश व बोध सारखा चालू ठेवला. आणि त्यांनीं आपल्या प्रकृतीकडे यत्किंचितही पाहिलें नाहीं. आम्हांला त्यांचा तो क्रम बंद करतां येईना. लांबलांबचे पुष्कळ लोक येत असत आणि त्यांच्या साऱ्या प्रश्नांचीं उत्तरें देईपर्यंत त्यांना विश्रांति म्हणून मिळत नसे. ते म्हणत, "मला जेथपर्यंत शक्ति आहे तेथपर्यंत त्यांना मला उपदेश केला पाहिजे." आणि त्यांच्या शब्दाप्रमाणें त्यांची कृति ही चालूच असे. सरते शेवटीं त्यांनीं आम्हांला सांगितलें कीं, आज आम्ही आपला देह ठेवणार. आणि रात्रीं वेदांतील एक उत्कृष्ट व पवित्र मंत्र म्हणून समाधींत प्रवेश करून या अलौकिक आणि अवतारी पुरुषानें आपला देह ठेवला. अशा प्रकारें हा महात्मा आम्हांस सोडून गेला व दुसऱ्या दिवशीं आम्हीं त्याचें दहन केलें !

त्यांनीं ज्यांना ज्यांना उपदेश केला होता, त्यांच्यापैकीं थोड्यांनाच त्यांचे विचार व हेतु माहित होते. इतर

शिष्यमंडळींत बरेच सुशिक्षित तरूणही पण होते.* त्यांनीं सर्व जगावर हिंडून त्यांचें ते उपदेशाचें काम पुढें चालविण्याचें व्रत पतकरलें. इतकेंच नव्हे, तर तो त्यांचा क्रम अव्याहत चालू आहे. त्यांत पुष्कळ लोकांनीं विघ्नें आणण्याचा प्रयत्न केला, पण ते ठासून त्यांच्यापुढें उभे राहिले. त्या महात्म्याच्या अंतःप्रेरणेनें त्यांच्या आनंदमय सहवासांत कित्येक वर्षें काढल्यानंतर त्यापासून निर्मित तेज घ्यावयास तें विसरलें नाहींत. म्हणूनच ते आपल्या ठिकाणावर उभे राहिले! ह्या तरूण मनुष्यांनीं संन्यासधर्माप्रमाणें वागण्याला सुरवात केली आहे. त्याचा अभ्यास चालविला आहे. जे ज्या गांवीं जन्मले होते, त्याच गांवांत ते भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करतात. ह्यापैकीं पुष्कळ लोक घरचे चांगले संपन्न व श्रीमंत आहेत, तरी सुद्धां त्यांना त्यांत दिक्कत वाटत नाहीं. मोठ-मोठे नास्तिक होते त्यांना ते प्रथम भेटले, पण ते त्यांतूनही

* त्यांनीं पूर्वींच सांगून ठेवलें होतें कीं, माझे मोठमोठाले अनेक शिष्य आहेत. ते लौकरच येऊन दाखल होतील. त्यांची सर्व माहिती मला आहे. मी निरंतर शाश्वत, अजरामर व परिपूर्ण आहे. फक्त जनांचा उद्धार करण्याकरितां व मार्ग दाखविण्याकरितांच मी हें सारें केलें. ते म्हणत, “ मी नित्यमुक्त असून परमेश्वराचा अवतार आहे. ” डाळिंबाला प्रथम फळ येतें, आणि मागाहून फूल येतें. तशीच गोष्ट नित्यमुक्तांची आहे. ते लोककल्याणाकरितांच जन्म घेतात.

टिकले, आणि दिवसेंदिवस त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर आपल्या सद्गुरूचा निरोप पोंचविला. तो इतका कीं, त्यांची मतें सर्व 'हिंदुस्थानां'त कोंदून राहिली. हा मनुष्य 'बंगाल्यां'तील एका यःकश्चित खेडयांत उत्पन्न झाला. त्याला जरी शिक्षण नव्हतें, तरी त्यानें स्वयंस्फूर्तीनें व पूर्ण दृढनिश्चयानें सत्यज्ञान संपादन करून तें इतरांना दिलें; आणि आपण लावलेली ज्योत पुढेंही विझूं नये म्हणून त्यानें आम्हां कांहीं तरूणांना ती ज्योत कायम ठेवण्याविषयीं मागें ठेवलें आहे.

आज भगवान् '**रामकृष्ण परमहंस**' ह्यांचें नांव सर्व 'हिंदुस्थानां'त दुमदुमून राहिलें आहे, व लाखो लोकांस त्यांचा परिचय झाला आहे. इतकेंच नव्हे, तर त्या मनुष्याचा प्रभाव 'हिंदुस्थान'च्याही फार पुढें गेला आहे. आणि मी जर कधीं कोठें जगामध्यें सत्याचा एक शब्द बोललों, परमार्थाचा शब्द माझ्या तोंडांतून निघाला, तर तो सारा त्यांचा होय. आणि दोष व राग जो काय बाहेर पडेल तो माझा स्वतःचा म्हणून समजावें.

तर आजकाल अशाच मनुष्याची फार अवश्यकता आहे; आणि ह्या युगांत जें काय पाहिजे आहे तें असेंच कडकडीत वैराग्य पाहिजे आहे. आजकालचे स्त्री आणि पुरुष जर आपल्यामध्यें कांहीं पवित्रतेचें पुष्प--सुमन--वालागित अस-

तील तर तें त्यांनीं ईश्वराच्या चरणींच अर्पण करावें! आपणांमध्यें जे कोणी तरुण असतील त्यांनीं पुन्हा ह्या संसारांत परतून येण्याची इच्छा करूं नये. त्यांनीं सर्वस्वत्याग करावा. त्यांनीं वैराग्यशील बनावें. असें वैराग्य हेंच काय तें परमार्थांतील रहस्य आहे.

प्रत्येक स्त्री ही आपली माता आहे, अशीच भावना धरा. हा द्रव्यलोभ सोडून द्या. तसें करण्याला हरकत कोणती ? तुम्ही कोठेंही असा, परमेश्वर तुमचें संरक्षण करील. ईश्वर आपल्या लेंकराची काळजी घेतच असतो. ह्याकरितां हेंच करावयाला कंबर बांधा! असें करण्याइतके तुम्हीं धैर्यशाली व्हा! असा स्वार्थत्याग करणें हेंच अवश्य आहे.

ह्या 'पाश्चात्य' देशावर मृत्यूच्या आणि नश्वर ऐश्वर्याच्या लाटा उसळत असलेल्या तुम्हांला दिसत नाहींत काय ? तुम्ही आपल्या डोळ्यांवर किती दिवस पडदा बांधून ठेवणार? विषयाचा आणि गलिच्छपणाचा परिणाम तुम्हांला दिसत नाहीं काय ? तीं समाजाचा प्राण कसा बरें खात आहेत? माझ्यावर विश्वास ठेवा. ह्या गोष्टींच्या बोलण्यानें, किंवा सुधारणेच्या चळवळीनें कधींच आळा बसणार नाहीं. तर वैराग्यानें, मृत्यूमध्येंही व ऱ्हासामध्येंही ताठ उभे राहिल्यानेंच सच्छीलतेचा पर्वत अचल राहील. बोलूं नका; तर

पवित्रतेची ज्योत, पातिव्रत्याचें तेज वैराग्याची कांति, तुमच्या शारिरांतील प्रत्येक रोमरंध्रांतून बाहेर पडूं द्या!

द्रव्याकरितांच जे रात्रंदिवस जीव तोडीत आहेत, त्यांना तसेच गोते खात बसूं द्या! कारण, अशा स्थितींत सुद्धां एखाद्याला संपत्ति म्हणजे केवळ क:पदार्थ वाटेल! केवळ विषयच सोडा असें नाहीं, तर विषय आणि संपत्ति ह्या दोहोंनाही दूर झुगारून द्या! तुम्ही स्वत: सर्वस्वाचा एकदम त्याग करा!

पण हें करणार कोण? तर जरत्कारू—म्हतारेकोतारे नव्हत, लोकांकडून गांजलेलें पीडिलेले नव्हेत, तर नव्या दमाचे व ताजे, पाणीदार, खंबीर, तरूण आणि सौंदर्ययुक्त असे स्वार्थत्याग करणारे लोक पाहिजेत. तरच त्यांच्या त्यागानें अखिल जगाचें संरक्षण होईल. आपले जीव खर्ची घाला! तयार राहून सर्व मानवजातीचे स्वत: सेवक व्हा. जिवंत—चालतीं बोलतीं पुराणें—बना! ह्याचेंच नांव वैराग्य. बोलणें हें कांहीं वैराग्य नव्हे. उभे रहा आणि सर्वांना दिपवून सोडा! म्हणजे तीच तुमची दृष्टि विषयी मनांना व द्रव्यलोभी मनांना थरथर कांपवून सोडील. शब्दांनीं कांहींएक होणें नाहीं. सारा उपदेशसुद्धां वायफळ आहे. द्रव्यतृष्णेला उत्तेजक अशीं पुस्तकें भराभर बाहेर पडतात; पण त्यांच्यापासून कांहींच

का. नि. नों. दि. ९०७५ ३०।२४ वाचनालय

कल्याण होणार नाहीं. कारण त्यांतील शब्दांच्या पलीकडे त्यांचें सामर्थ्य म्हणजे आवळ्यायेवढें पुज्य!

उठा! परमेश्वराबद्दल खात्री करून घ्या. म्हणजे सर्व भेदाभेद व ऐषआराम ह्यांचें वैराग्य घेतां येईल, आणि मग बोलण्याची गरजच राहणार नाहीं. तुमचें हृत्कमलच विकास पावेल आणि आत्मस्वरूपच पसरून राहील. मग जें जें काय प्राप्त होईल, त्यानें त्यानें विस्तवांत भाजल्याप्रमाणें तुम्हीही तप्त व्हाल, आणि तुमचें परमार्थज्ञानही तावून सुलाखून निघेल.

भगवान् श्रीरामकृष्णांचा अर्वाचीन जगाला जो काय निरोप आहे तो हाच कीं, "मतांची किंवा मताभिमानांची तुम्ही मुळींच काळजी करूं नका. कारण पंथ हे केवळ प्रार्थनेकरितां व कवाइतीकरितां आहेत. परमार्थ म्हणून ज्याला म्हणतात तो जेवढा प्रत्येकामध्यें आहे, त्यांच्याशीं तुलना करून पाहिलें तर त्यापुढें त्यांची संख्या कांहींच नव्हे. तो जर एखाद्या मनुष्यामध्यें वाढला, तर लोककल्याण करण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं अधिक येईल. आणि तो ज्याच्या अंगांत अतिशय येईल तो आपल्या जातिबांधवांचें अतिशय कल्याण करील. तर प्रथम त्या परमार्थाचीच ओळख करून

द्या. दुसऱ्यांना नांवें ठेवूं नका. कारण, सारीं मतें व मताभिमान चांगलेच आहेत. आपल्या आचरणावरून सर्वांस हें दाखवून द्या कीं, धर्म हा ग्रंथाचाही विषय नव्हे, किंवा तो श्रद्धेचाही विषय नव्हे. तर प्रत्यक्ष कृतीचा किंवा अनुभव घेण्याचा विषय आहे. जे अनुभव घेतील त्यांनाच हें कळेल. अशा प्रकारचा परमार्थ दुसऱ्याला न समजतांसुद्धां देतां येईल. येवढा अधिकार ज्यांना प्राप्त होतो, तेच मनुष्यजातीच्या श्रेष्ठ गुरूंमध्यें मोडतात; व त्यांच्याच अंगीं तेजस्विता असते."

तर तुम्हीही तसेच व्हा! असले पुरुष कोणत्याही देशांत जितके अधिक निर्माण होतील, तितका तितका तो देश अधिक उच्च पदवीला चढेल. आणि ज्या भूमींत असे पुरुष मुळींच निपजणार नाहींत ती भूमि रसातळास जाईल! तिला तारणारा कोणी नाहीं! ह्याकरितांच माझ्या गुरूचा सर्व जगाला असा निरोप आहे कीं, "आपण सर्व परमार्थी व्हा! प्रथम सत्य संपादन करा!!" म्हणजे तोच प्रत्येक देशांतील तरुण व जवान लोकांना सांगत सुटेल कीं, वैराग्य घेण्याचा समय येऊन ठेपला आहे. मानवजातीकरितां सर्वस्वाचा त्याग करा!

त्यागावांचून अमृतत्वाची प्राप्ति होणें शक्य नाहीं. त्यागासारखी अभयप्रद अशी दुसरी वस्तु या जगांत नाहीं.

त्यागांतच मानवी आयुष्याच्या उन्नतीचें बीच आहे. अमृतत्वाची प्राप्ती करून घ्यावयाची असेल, तर त्यागाची कास धरा!

मनुष्याच्या प्रेमाबद्दल तुम्ही कितीही बोललां तरी त्याचा अनुभव येईपर्यंत केवळ शब्द हे पोकळच होत. त्यापासून भयाची मुक्तता होत नाहीं. आतां करून दाखविण्याचा काल आला आहे. ह्याकरितां अर्वाचीन जगाला सांगणें म्हणून हेंच कीं,


"करा!"

**खड्ड्यांत उडी टाका,**

**आणि**

**जगाला वर काढा!**

ॐ! ॐ!! ॐ!!!


ॐ तत सत

# रामकृष्ण-बोधामृत.

भगवान् श्रीसद्गुरु रामकृष्ण परमहंस हे मोठमोठालीं व्याख्यानें वगैरे कधींच देत नसत. तर आबालवृद्धांस समजेल अशा रीतीनें सोपे दृष्टांत देऊन ते ज्ञानामृताचें तत्त्व प्रत्येकाच्या हृदयांत ठसवीत. वेदांतासारखा कठीण विषय प्राकृतांच्या मनांत भरवून देण्याची शैली, ह्या महात्म्याइतकी इतर साधुसंतांतसुद्धां क्वचित्च आढळेल, इतकी अप्रतिम असे. ती आमच्या वाचकांस समजावी—त्या अमृतरसाचा आस्वाद आमच्या महाराष्ट्रीय वाचकवर्गासही घेतां यावा म्हणून मासल्याकरितां त्यांच्या मुखांतून निघालेलीं कांहीं बिनमोल अमृतवचनें येथें मुद्दाम देत आहों, आणि त्यांतही तीं विषयवारीनें दिल्यास वाचकांस विशेष सोईचें होईल असें वाटल्यावरून मुद्दाम तशी योजना करीत आहों.

## १ सत्यज्ञान व धर्म.

रिकामें भांडें पाण्यांत बुडविलें कीं, 'बुडबुड' शब्द करितें, परंतु तेंच भरलें कीं त्याचा आवाज बंद होतो. त्याचप्रमाणें जेथपर्यंत मनुष्याला ईश्वरसाक्षात्कार झाला नाहीं

तेथपर्यंत तो नानाप्रकारचे तर्क व वादविवाद करीत असतो. परंतु एकदां का त्या परमस्वरूपाची प्राप्ति झाली कीं त्यांची ती सर्व गडबड शांत होऊन तो स्वरूपसुखाचाच अनुभव घेऊं लागतो.

* * * *

भ्रमर मधुपान करण्यासाठीं पुष्पावर जाऊन बसला नाहीं तोंपर्यंत सारखा ‘ गुं गुं ’ करीत हिंडत असतो. पण एकदां कां कमलपुष्पावर बसून तो मधुपान करूं लागला, कीं त्याचें तें ‘ गुं गुं ’ लगेच बंद पडतें. तद्वत् परमात्मानुभव आला नाहीं तोंपर्यंत धर्माचा विचार करणें जरूर आहे.

* * * *

बाजार भरलेल्या जागेपासून एखादा मनुष्य फार दूर असतो, तेव्हां त्याला एक मोठा गोंगाट आणि “ हो ! ! हो ! ! ” अशासारखा हलकल्लोळ होत असलेला ऐकूं येतो. परंतु तो प्रत्यक्ष जेव्हां बाजारांत जाऊन पोंचतो, तेव्हां तेथें त्यास गलबला वगैरे कांहींच ऐकूं येत नाहीं. कोणी नारळ विचारीत आहे, कोणी केळीं विचारीत आहे, इत्यादि निरनिराळीं भाषणें स्पष्ट ऐकूं येतात. त्याप्रमाणें मनुष्य जितका जितका परमेश्वरापासून अधिक अधिक दूर असतो, तितका तितका तो विचार, प्रमाण, आणि भवतिनभवति ह्यांच्या

गोंधळांत आणि शब्दांच्या कलकलाटांत असतो. परंतु एकदां का साधक मनुष्य परमेश्वरस्वरूपास मिळाला कीं, हे विचार, प्रमाणें, भवतिनभवति सर्व कांहीं लयास जातें. आणि त्याला परमेश्वराचीं सर्व गुह्यें, व निर्मल ज्ञान हीं कळूं लागतात.

* * * *

दोन गृहस्थ एका बागेंत गेले. त्यांत एकजण आपणास फार बुद्धिमान् समजे. त्याला बागेंत पाऊल टाकतांच एक आंब्याचें झाड दिसलें, त्याच्या फांद्यांची गणती सुरू केली,—कोणत्या फांदीला किती आंबा लटकला आहे, आणि त्याची किंमत कोठवर जाईल, इत्यादि गोष्टींचें चक्र त्याच्या डोक्यांत चालूं झालें. दुसरा बिचारा साधा—सरळमार्गी होता. त्यानें बागेच्या मालकाकडे वशिला लावून आंबे खाण्यास सुरवात केली. आतां ह्या दोघांत खरा बुद्धिमान् कोण बरें? आंबे खाल्यानें पोट भरेल, पण फांद्या व फळें मोजीत बसल्यानें फायदा कोणता? याचप्रमाणें जे अज्ञ आहेत, ते वृथैव वादविवाद व भांडणतंटे यांत पडत असतात, परंतु जे सुजाण आहेत ते भगवत्कृपा प्राप्त करून घेऊन ह्या संसारोद्यानांत ब्रह्मानंदाचें मधुर फळ चाखतात.

* * * *

विवेक आणि वैराग्य यांवांचून शास्त्रांचें मर्म समजत नाहीं व धर्मही हातीं लागत नाहीं. सत् आणि असत् याचा विचार करणें–देह व आत्मा भिन्न आहेत, असें जाणणें–हा विवेक; आणि विषयांपासून परावृत्त होणें–अलिप्त राहणें–हें वैराग्य होय.

* * * *

एकदां बाबू केशव चंद्रसेन दक्षिणेश्वरीं आले व त्यांनीं रामकृष्णांस प्रश्न केला, ‘ पुष्कळ मोठमोठे पंडित एवढीं शास्त्रें–पुराणें मुखोद्गत करतात, पण त्यांतलें ज्ञान पहावें तों त्यांस कांहींच नसतें. ह्याचें कारण काय ? ’ त्यावर रामकृष्ण म्हणाले, ‘ घार, गिधाडें इत्यादि पक्षी अस्मानांत खूप उंच भरारी मारतात, पण–इतकें उंच जाऊनही त्यांची नजर पहावीं तों खालीं कोठें एखादा घाण–सड्का–पदार्थ पडला आहे. इकडे लागून राहिलेली असते. तीच गोष्ट या पंडितांची आहे. त्यांना शास्त्रें तर मोठमोठीं अवगत असतात, पण मन पहावें तों सदादित कनककांता यांत गढलेलें! आणि म्हणूनच ते सत्यज्ञानापासून कोसचे कोस दूर असतात ! ’

* * * *

पंचांगांत खूपसे पर्जन्ययोग दिलेले असतात, पण पंचांग पिळलें तर एक थेंब तरी निघेल काय? त्याचप्रमाणें ग्रंथांतरीं कितीतरी धर्मज्ञान सांगितलें, परंतु ते नुसतें मुखोद्गत करून कोणी धार्मिक होईल काय? नाहीं. तर त्यांत सांगितल्याप्रमाणें वर्तेल तोच धार्मिक होईल.

* * * *

चार आंधळे होते. ते हत्ती कसा असतो तें प्रत्यक्ष (हात लावून) पहावें, म्हणून निघाले. (कर्मधर्मसंयोगानें एक हत्ती भेटला.) एकानें त्याचे पाय चाचपले व म्हणाला 'हं! हत्ती खांबासारखा आहे खांबासारखा!' दुसऱ्यानें त्याची सोंड धरली आणि म्हणाला, 'हत्ती एकादां भला मोठा सोट असतोना? तसा आहे.' तिसऱ्यानें त्याचें पोट ठोकलें व म्हणाला, 'हां! हत्ती पिंपासारखा आहे बरं का?' चवथ्या स्वारीच्या हातास त्याचा कान लागला, तेव्हां ते म्हणाले, 'छेः! हत्ती हुबेहूब सुपासारखा आहे.' झालें. अशा प्रकारें तें अंधचतुष्टय 'हत्ती असा नाहीं, असा असतो' म्हणून अगदीं हमरीतुमरीवर आलें. इतक्यांत दैववशात् तिकडून एक वाटसरू आला. त्यानें हे आंधळे आपापसांत इतकें वर्दळीवर आलेले पाहून हटकलें कीं, 'बाबांनो! काय भानगड आहे? काय म्हणून तुम्ही झग-

ढतां आहां?' तेव्हां चौघांनींही इत्थंभूत मजकूर निवेदन केला. वाटसरूनें सांगितलें; 'सद्‌गृहस्थ हो! तुम्हांपैकीं एकालाही हत्ती कसा काय असतो, हें माहित नाहीं. हत्ती खांबासारखा नसतो, तरी पण त्याचे पाय खांबासारखें असतात; तो सोटासारखा नसतो, पण त्याची सोंडच सोटासारखी असते; तो पिंपासारखा नसतो, पण त्याचें पोट पिंपासारखें असतें; तसेंच तो सुपासारखा नसून त्याचे कान मात्र सुपासारखे असतात. हीं सर्व मिळून हत्ती होतो.' अशा प्रकारें हत्तीचें यथार्थ स्वरूप समजून आल्यावर त्यांचा वाद मिटला. त्याचप्रमाणें परमात्म्याच्या सत्य स्वरूपाचें ज्ञान झालें नाहीं तोंपर्यंत मनुष्य निरानिराळ्या मतांचें वैशिष्ट्य मानीत असतो. परंतु एकदां त्या सत्य—शुद्ध—परमात्म--स्वरूपाचें त्यास ज्ञान झालें कीं, त्याला समजून चुकतें कीं हीं भिन्न भिन्न मतें त्याचींच अंगभूत आहेत.

*     *     *     *

तहानेनें जीव घोपला आहे तर 'गंगेचें पाणी घाग आहे' असें म्हणून कोणी एकाद्या तलावाचें पाणी पिण्यास जाईल काय? त्याचप्रमाणें ज्याला धर्माची तहान लागली आहे तो 'हा धर्म बरोबरसा नाहीं, तो अमका ठीक आहे'

असें म्हणून उगाच हिकडे तिकडे हिंडत राहील काय? खऱ्या तहानेपुढें विचार कुंठित होतो.

## २ ब्रह्म, आत्मज्ञान व ईश्वर.

मनुष्य आपणच आपणाला जाणूं लागला म्हणजे त्याला ईश्वरही जाणतां येतो. 'मी' म्हणजे कोण, याचा पुरोपूर विचार करूं लागलें म्हणजे समजून येतें कीं, मी ह्या अर्थाची कांहीं वस्तु नाहीं. हात, पाय, डोळे, नाक किंवा रक्त, हाडें, मांस, मज्जा इत्यादींमध्यें मी कोण? कांदा सोल सोल सोलला तर टरफलेंच टरफलें होतात, त्याशिवाय दुसरें कांहीं हातीं लागत नाहीं. तद्वत् नीट विचार करूं लागलें म्हणजे 'मी' किंवा 'माझें' म्हणण्याजोगें कांहींच उरत नाहीं.

* * * *

एकदां तोतापुरींना परमहंसांनीं विचारलें, 'आपण येवढ्या पायरीला पोंचलां आहां नि आतां तुम्हांला ध्यान करण्याची काय जरूरी आहे?' तोतापुरी म्हणाले, 'भांडें जर दररोज घांसलें नाहीं तर त्यास डाग पडतील. तसेंच हें आहे. रोज नियमानें ध्यान न केलें तर चित्त मलिन होऊन जाईल.' त्यावर रामकृष्ण म्हणाले, 'पण भांडें

सोन्याचें असलें तर डाग पडत नाहीं. तद्वत् ज्याला एकदां सच्चिदानंदाची प्राप्ति झाली, त्याला फिरून साधनाची अवश्यकता नाहीं.'

* * * *

पायांत कांहीं घातलेलें असलें म्हणजे मनुष्य कांटयाकुटयावरून खुशाल चालून जातो. तसेंच ज्याला आत्मज्ञान झालें तो ह्या कंटकमय संसारांत निर्भयपणें वावरत असतो.

* * * *

कमल विकास पावलें कीं, भ्रमर त्यावर आपोआप जाऊन बसतात. तद्वत् आत्मजागृति झाली कीं सर्व गोष्टी आपोआप सिद्ध होतात.

* * * *

मनुष्य 'हे देवा! हे परमेश्वरा!' असें जोंपर्यंत ओरडत आहे तोंपर्यंत, समजावें कीं, त्याला ईश्वरदर्शन झालेलें नाहीं. कारण ईश्वरदर्शन झाल्याबरोबर त्याच्या वृत्ति अगदीं शांत होतील व तो आपण आपणांतच—स्वस्वरूपांत—लीन होऊन जाईल.

* * * *

सर्व वस्तु उष्ट्या आहेत. आजपावेतों न उष्टावलेली जर कोणती वस्तु असेल तर ती केवळ एक ब्रह्म होय. वेद, पुराणें आदिकरून किती तरी वेळां मानवमुखांतून बाहेर पडून उष्टीं झालेलीं आहेत. परंतु ब्रह्म ही काय चीज आहे, हें आजवर स्वमुखानें कोणी सांगूं शकला नाहीं.

* * * *

एक गृहस्थ परमहंसांकडे गेला, आणि म्हणाला, ‘ माझ्या हृदयांत ज्ञानाचा पूर्ण प्रकाश पडेल, असें मला एकच सार–वाक्य सांगा.’ परमहंस चटकन् म्हणाले:—‘ ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या—ह्याप्रमाणें मनोधारणा ठेवा म्हणजे झालें.’

* * * *

नारळ किंवा खजुराचे पिढे खालीं पडतात, पण त्याची खूण किंवा वण झाडावर शिल्लक राहतोच. तद्वत ह्या शरीरांत वास करणारें आमचें ममत्व किंवा ‘ माझे ’ पणा एकदम—निखा’लस—जाऊं शकत नाहीं, थोडाना थोडा तरी शिल्लक राहतोच. परंतु हें जें सर्वसाधारण ममत्व ते मुक्त पुरुषांना मात्र बिलकुल बद्ध करूं शकत नाहीं.

* * * *

रात्रींच्या वेळीं नभोमंडलांत असंख्य तारे लकलकतांना दृष्टीस पडतात, पण सूर्योदय झाल्याबरोबर एकही

तारा कोठें दृश्यमान होत नाहीं. म्हणून काय तारे नाहींतच असें म्हणावयाचें कीं काय? तसेंच हे मनुष्या! अज्ञानामुळें परमेश्वर दिसत नाहीं म्हणून ‘ परमेश्वर नाहींच ’ असा भलताच समज करून घेऊं नको.

* * * *

समुद्रांत मोतीं असणारच, पण परिश्रम केल्याशिवाय तें हातीं लागत नाहीं. तद्वत संसारांतसुद्धां ईश्वर भरलेला आहे, पण तो प्रयत्नाशिवाय कसा मिळणार?

* * * *

कर्त्याशिवाय कर्म व्हावयाचें नाहीं. एखाद्या निर्जन अरण्यांत एखादी देवाची मूर्ति जर आपल्या दृष्टीस पडली तर मूर्ति करणारा जरी तेथें प्रत्यक्ष उभा नसला तरी त्याच्या अस्तित्वाची जाणीव आपणास होतेच. त्याचप्रमाणें हें विश्व पाहिल्याबरोबर त्याच्या कर्त्याची (ईश्वराची) ही कल्पना आपल्या पुढें तात्काल उभी राहते.

* * * *

ईश्वर एकच आहे, पण अनंत रूपांनीं नटला आहे. सरडा निरनिराळ्या वेळीं निरनिराळे रंग बदलीत असतो.

केव्हां लाल, केव्हां पिवळा, केव्हां दुसरा कोणता तरी! एकदां एक तर एकदां एक! हा सरड्याच्या आंगचा धर्म माहित नसल्यामुळें कांहीं असामींत सरड्याच्या रंगासंबंधानें वाद उपस्थित झाला. एक म्हणे 'तो पिवळा आहे.' पण दुसरा म्हणे 'नाहीं. तो लाल आहे.' तर तिसरा म्हणे 'छे! तो निळा आहे.' कर्मधर्मसंयोगानें त्याच वाटेनें एक तज्ज्ञ चालला होता. त्याच्याकडे हा वाद गेला. तो म्हणाला, 'बाबांनो! तुमचें प्रत्येकाचें म्हणणें खरें आहे. सरडा तांबडाही, पिवळाही आहे व ते तिसरे म्हणतात तसाही आहे.' त्याचप्रमाणें परमेश्वराचींही अनंत रूपें आहेत. ज्यानें त्याचें एखादेंच रूप पाहिलेलें असतें. असा भक्त त्याचें तेवढेंच रूप सत्य मानतो; पण ज्यास परमेश्वराच्या अनंत रूपांचें ज्ञान झालें आहे तो सांगूं शकतों कीं, हीं सर्व रूपें त्या परमेश्वराचींच आहेत.

*  *  *  *

खानदानीच्या स्त्रिया चिकाच्या पडद्यांत बसलेल्या असतात. त्यांना पडद्याच्या आंतून सर्व कांहीं दिसत असतें, पण त्या मात्र कोणाच्या नजरेस पडत नाहींत. तद्वत ईश्वर सर्वांठायीं भरून राहिलेला आहे. तो सर्व कांहीं पहात असतो, पण स्वतः मात्र कोणाला दिसत नाहीं.

## ३ साकार, निराकार, ब्रह्म व शक्ति (प्रकृति.)

जें निराकार असतें, तेंच साकार होतें. महासागरांत अथांग पाणी भरलेलें असतें, पण क्वचित समयीं तें थंडीच्या कडाक्यानें सर्व गोठून त्याचें बर्फ बनून राहतें. त्याप्रमाणें ईश्वरही भक्तीच्या कडाक्यानें साकार रूप धारण करतो. आणि सूर्योदय झाल्याबरोबर जसें बर्फ वितळावयास लागतें व पुन्हां पहिल्यासारखें पाणीच पाणी होऊन जातें, तसेंच ज्ञान-सूर्याचा उदय झाल्याबरोबर साकाररूप लुप्त होऊन निराकारच शिल्लक राहतें.

* * * *

अग्नि म्हटल्यानें आपणांस काय बोध होतो? वर्ण, ज्वलनशक्ति आणि धगधगीतपणा, यांची समष्टि तो अग्नि होय. त्याचप्रमाणें अनंत शक्तींची समष्टि तें ब्रह्म होय. ब्रह्म आणि शक्ति अभिन्न आहेत.

* * * *

ब्रह्म आणि शक्ति एकरूपच आहेत. ब्रह्म जेव्हां निष्क्रिय स्थितींत असतें, तेव्हां त्यास शुद्ध ब्रह्म म्हणतात; आणि जेव्हां तें सृष्टि, स्थिति, लय इत्यादि करितें तेव्हां त्यास शक्ति ( प्रकृति ) असें म्हणतात.

* * * *

शक्तीविना ब्रह्माचें ज्ञान होणार नाहीं. म्हणजे ब्रह्माचें ज्ञान करून घेणें असेल तर तें शक्तीचे–प्रकृतीचे--द्वाराच होईल, हें सांगणें नकोच.

* * * *

बगीच्यांत एखादें फूल फुललें म्हणजे त्याचा सुगंधच चहूं दिशांना त्याची जाहिरात पोंचवतो. तद्वतच शक्तिरूपी परिमळ परब्रह्मरूप पुष्पाची जाणीव करून देतो.

## ४ माया कशी आहे ?

दक्षिणेश्वरच्या देवालयांत नागारखान्यावर थोडे दिवस एक साधु येऊन राहिला होता. तो कधीं कोणाशीं फारसा बोलत नसे. निरंतर ध्यानधारणेंत मग्न असे. एक दिवस असें झालें कीं, एकदम खूप आभाळ आलें व चहूंकडे अंधारच अंधार झाला. नंतर अमळशानें जी एक वावटळ आली तिनें आभाळ पार उडवून दिलें. हें पाहून साधु खद-खद हंसूं लागला. आजच साधूस हंसतांना पाहून परम-हंसांनीं विचारलें, ‘आपण नेहमीं अगदीं गप्प बसलेले, असतां आणि आजच एवढें हंसण्यासारखें काय झालें?’ साधु म्हणाला, ‘संसारांत मायाही अशी आहे. प्रथम आकाश अगदीं लख्ख होतें. नंतर एकाएकीं ढग येऊन त्यांनीं

काळोखच काळोख करून टाकला व त्याचे मागून जी एक जंगी वावटळ उठली तिनें ढगांची पार वाताहात उडविली! आकाश पुन्हां पहिल्यासारखें स्वच्छ आहे तसेंच आहे.'

* * * *

सूर्य पृथ्वी प्रकाशित करतो खरा, पण एक लहानसा ढग आड आला कीं तो आम्हांला दिसेनासा होतो. तद्वत् तो सर्वसाक्षी परमात्मा आम्हां मायाबद्धांना ( मायेचें पटल ज्यांच्या डोळ्यावर आलेलें आहे अशांना ) दृग्गोचर होत नाहीं.

* * * *

जोंपर्यंत पाणी गादलेलें आहे तोंपर्यंत त्यांत सूर्य, चंद्र इत्यादींचें प्रतिबिंब बरोबरसें दिसत नाहीं. त्याचप्रमाणें जोंपर्यंत मायेचें म्हणजे ' मी ' ' माझें ' ह्यांचें आवरण आहे तोंपर्यंत आत्मदर्शन व्हावयाचें नाहीं.

* * * *

जीवात्मा आणि परमात्मा यांच्यामध्यें मायेचा पडदा पडलेला आहे. हा पडदा किंवा हें आवरण जोंपर्यंत निघालें नाहीं तोंपर्यंत त्या दोघांची–जिवाशिवाची–प्रत्यक्ष भेट होत नाहीं. राम वनवासास निघाले तेव्हां अग्रभागीं राम, मागें लक्ष्मण व जानकी दोघांच्यामध्यें अशी चालली होती. राम परमात्मा, लक्ष्मण जीवात्मा व सीता ही माया होय. ही

माया जोंपर्यंत मध्यें होती, तोंपर्यंत लक्ष्मणास रामदर्शन होत नसे. पण ती जरा बाजूस झाली कीं, लक्ष्मणास रामाचें दर्शन होई.

* * * *

सर्पाच्या मुखांत विष असतें, पण त्याचें विष त्याला स्वतःला बाधत नाहीं. तें दुसऱ्याला बाधतें. त्याचप्रमाणें भगवंताची माया स्वतः भगवंताला आवरण घालूं शकत नाहीं, पण दुसऱ्यावर मात्र घालते.

* * * *

मायेचा स्वभाव शेवाळासारखा आहे. हातानें पाणी जरा हालविलें कीं, शेवाळ बाजूस सरतें व स्वच्छ पाणी दिसूं लागतें. त्याचप्रमाणें आपण जोंपर्यंत आत्मानात्मविवेक, सत्समागम इ० करतों आहों तोंपर्यंत आपली बुद्धि निर्मळ असते ( वासना दूर असतात ), पण शेवाळ जसें थोडा वेळ गेला नाहीं तोंच पुन्हां तेथें जमूं लागतें, तद्वत् पुन्हां थोड्याच अवकाशांत विषय आणि वासना जमा होऊन बुद्धीला आवरण घालतात. शेवाळ कितीही दूर लोटा, तें पुन्हां पुन्हां पहिल्यासारखें जमावयाचेंच. तशीच मायेलाही कितीदां दूर लोटा ती पुनः पुन्हां आपल्या बुद्धीवर झापड घालावयाचीच. पण तेंच शेवाळ जर मध्यें लाकूड किंवा

वासा असें कांहीं तरी चौफेर घालून बंदोबस्त केला तर पुन्हां तेथें येईनासें होतें व तळचें निर्मळ पाणी दिसूं लागतें. त्याचप्रमाणें एकवार मध्येचें आवरण दूर करून तथ भक्तीचा व ज्ञानाचा चौफेर तणावा दिला कीं, फिरून माया आंत प्रवेश करूं शकत नाहीं. मग केवळ सच्चिदानंदस्वरूपच स्वयमेव प्रकाशमान होतें.

* * * *

मायेचे दोन प्रकार आहेत—एक विद्या व दुसरी अविद्या. विद्येचेही फिरून दोन प्रकार आहेत—विवेक आणि वैराग्य. आणि अविद्येचे तर सहा प्रकार आहेत—( तेच षड्रिपु होत.) काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर. ही अविद्यारूप माया ‘ मी, ’ ‘ माझें ’ इत्यादि प्रकारांनीं जीवास बद्ध करिते आणि विद्या ( ज्ञानरूप ) माया तें आवरण छेदून टाकते.

* * * *

मायेची जाणीव झाली कीं माया पळालीच! एक ब्राह्मण आपल्या गांवाहून दुसऱ्या एका गांवीं कांहीं धर्मकृत्य करण्याकारतां निघाला. त्यास एक गरीबसा माणूस वाटेंत भेटला. ब्राह्मणास वाटलें आपल्या बरोबर एखादा गडी वगैरे असल्यास उत्तम होईल. तेव्हां तो त्या माणसास म्हणाला, ‘ अरे! मला एक गडी पाहिजे. तूं येतोस का

माझ्याबरोबर? तुझी खाण्यापिण्याची सर्व कांहीं तजवीज होईल.' तो म्हणाला, 'पण महाराज! मी धेड आहें.' ब्राह्मणानें सांगितलें, 'कांहीं हरकत नाहीं. मी सांगेन तेथें अगदीं बाजूस बस म्हणजे झालें. कोणाशीं अवाक्षर बोलूं नको.' माणूस म्हणाला, 'ठीक आहे.' असें म्हणून दोघे चालूं लागले. गांवीं पोंचून ब्राह्मण यजमानकृत्यांत गुंतला असतांना दुसरे एक भटजी पळीपंचपात्र घेऊन तेथें आले. तों हा वाटेंत बसलेला! ते म्हणाले, 'अरे, जरा वाट सोड.' हा एक नाहीं, दोन नाहीं. ते पुन्हां म्हणाले, 'अरे वाट सोड. जरा बाजूला बस.' तरी ह्याचें एक नाहीं, दोन नाहीं! शेवटीं ते रागावून म्हणाले, 'केव्हांचा सांगतों आहे तुला बाजूस हो म्हणून, तुला ऐकूं येत नाहीं? धेड कुठला?' 'धेड' शब्द त्या भटजींच्या तोंडून निघाला मात्र, तों ह्या बुवाजींनीं पाठीस पाय लावून आपला रस्ता सुधारला!!

## ५ अवतारीपुरुष.

एखाद्या गवताच्या काडीवर एखादा कावळा बसला तर ती काडी तात्रडतोब पाण्यांत बुडेल. पण मोठमोठे ओंडके जेव्हां नदींतून वाहूं लागतात तेव्हां किती तरी

लोक त्यावर मजेनें बसून जातात व पैलतीरास लागतात. त्याचप्रमाणें जेव्हां अवतारी पुरुष जन्मास येतात तेव्हां त्यांच्या साह्यानें हजारों लोक तरून जातात.

* * * *

आगगाडीचें एंजिन स्वतः झपाट्यानें जातेंच, आणखी शिवाय मालानें भरलेले कैक डबेही बरोबर खेंचून नेतें. त्याचप्रमाणें अवतारी पुरुष हजारों स्त्रीपुरुषांना ईश्वराकडे खेंचून नेतात.

## ६ साधनास योग्य काल.

मी लहान मुलांवर एवढें प्रेम कां करतों ठाऊक आहे? लहानपणीं मुलांचें मन अगदीं रुपयास रुपया असतें. पण तेच मोठें झालें म्हणजे निरनिराळ्या गोष्टींत आणेवारी लागते. लग्न झालें म्हणजे मन आठ आणे स्त्रींत, मूल झालें कीं चार आणे मन मुलांत आणि उरले चार आणे ते इतर विषयांत वांटून जातात. लहानपणीं ईश्वरसाधन करणें फार सुलभ पडतें. वृद्धापकाळीं ईश्वरसाधन फारच कठीण जातें, कारण त्या वयांत मन फार पांगलेलें असतें.

* * * *

नों. दि.
९०९६
३०।२४।५५
ग्रंथालय

मनुष्याचें मन मोत्याच्या लडीसारखें आहे. ती एकवार तुटली म्हणजे फिरून नीट होणें कठीण पडतें. त्याचप्रमाणें मनुष्याचें मन एकवार संसाराला चिकटलें म्हणजे फिरून त्याला जाग्यावर आणणें फार कठीण!

* * * *

वेत कोवळेपणीं लववला म्हणजे लावतो, पण तोच जून झाला—वाळला—म्हणजे लववूं गेलें तर त्याचे दोन तुकडे होतात. त्याचप्रमाणें बालकाचें मन सहजासहजीं ईश्वराकडे वळूं शकतें, पण मोठेपणीं मन ईश्वराकडे लावूं गेलें तर दूर दूर पळतें.

* * * *

राघूला कंठ फुटला कीं मग कोणताही शिकविलेला शब्द त्यास येत नाहीं. परंतु कोवळेपणीं थोडयाशा प्रयत्नानेंही तो शब्द उचलतो. त्याचप्रमाणें वृद्धापकाळीं ईश्वरस्वरूपांत मन निश्चल करणें फार कठीण पडतें. परंतु बालपणीं तें सहज होऊन जातें.

* * * *

एक शेर दुधांत एक छटाकभर पाणी घातलें तर थोडक्या आंचेनेंसुद्धां त्याचा खवा बनतो. परंतु शेरभर दुधांत तीन पाव पाणी मिसळून खवा तयार होण्यास फार

आंच द्यावी लागते व जळणही फार खर्च होतें. बाल्यावस्थेंत विषयवासना कमी असते, म्हणून त्या वयांत विशेष आयास न करितां ईश्वराकडे मन लागते. पण वार्धक्यांत वासनांचें आधिक्य होत असतें, त्याकारणानें त्या वयांत ह्या कामीं फार सायास करावे लागतात.

*  *  *  *

सूर्योदयाचे आधीं दहीं घुसळलें तर जसें उत्तम लोणी निघतें तसें ऊन्ह चढूं लागलें म्हणजे निघत नाहीं. तद्वत् बाल्यावस्थेंत विरक्त होऊन ईश्वरसाधन केलें तर त्यास जशी सिद्धि प्राप्त होते तशी ती उतार वयांत होत नाहीं.

*  *  *  *

वासनारहित मन खडखडीत काड्याच्या पेटीप्रमाणें आहे. तीवर जरा काडी घांसा ती ताबडतोब पेटते. पण तीच सरदलेली असूं द्या कीं कितीही वेळ जरी काडी ओढली तरी ती पेटत नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांचें मन खरें खरें निर्मळ आहे, त्यांस जरा उपदेश दिला कीं तेथें ईश्वरी प्रेम उत्पन्न होतें; आणि जे विषयासक्त आहेत त्यांना हजार वेळ बोध केला तरी ‘ पालथ्या घागरविर पाणी ’ असें होतें.

*  *  *  *

3632

एक मासेविकी बाई बाजारांत मासळी विकून घरीं चालली होती. चालतां चालतां रात्र झाली. तिचें घर (गांव) तर बरेंच दूर राहिलें. तेव्हां तिनें विचार केला कीं, येथल्या येथेंच कोठें तरी निवाऱ्याची जागा पाहून रात्र काढावी. इतक्यांत तिला एक माळ्याचें खोपट लागलें. तेथल्या माळ्यानें आपल्याकडून होईल तितकी तिच्या निजण्याची उत्तम तजवीज करून दिली, पण त्या बाईस कांहीं केल्या झोंप लागेना. शेवटीं झोंप न येण्याचें कारण शोधतां असें दिसून आलें कीं, ती जेथें निजली होती तेथें वरच एक फुलांनीं भरलेली टोपली होती; व तींतील फुलांच्या सुवासानें तिला झोंप येईना! हें पाहून तिनें आपल्या मासळीच्या टोपलीवर पाणी शिंपडून ते आपल्या नाकाला लावलें. तेव्हां तो सुगंध मेला व तिला क्षणार्धांत गाढ झोंप लागली! वासनेंत गुरफटलेल्या मनाची स्थितिही अशीच असते. कुवासनेशिवाय त्याला कांहींच गोड लागत नाहीं.

*　　*　　*　　*

आंबे, संत्रीं, नारिंगें इ. मधुर फळें देवाला अर्पण करितां येतात किंवा लोकांच्याही उपयोगीं पडतात. पण त्यास कावळ्यानें टोंच मारली कीं, तें फळ ना देवाला,

ना मनुष्याला उपयोगीं असें होतें. पवित्र अंतःकरणाच्या बालकाचीही अशीच गोष्ट असते. लहानपणापासूनच जर त्याला धर्मप्रवृत्त केलें तर तें या लोकींचें ( संसार ) व परलोकींचें ( परमार्थ ) साधन फार उत्तम तऱ्हेनें करूं शकेल. परंतु एकदां का त्याच्या मनांत विषय–वासनेचें वारें शिरलें कीं तो अगदीं फुकट गेला म्हणून समजावें. मग तो स्वार्थ व परमार्थ दोहोंलाही आंचवतो !

## ७ भक्तीचा जिव्हाळा.

सतीचें मन पतीकडे, लोभ्याचें मन द्रव्याकडे किंवा विषयी मनुष्याचें मन विषयाकडे लागलेलें असतें, त्याचप्रमाणें भक्ताचें मन परमेश्वराकडे लागलें पाहिजे. ज्या दिवशीं भगवंताकडे इतकें प्रेम ओढेल, त्या दिवशीं भगवद्दर्शन होईल.

* * * *

' काय करावें ? संतति नाहीं, हाडांची काडें केलीं तरी एक छदाम दृष्टीं पडत नाहीं ' म्हणून हाय हाय करून कैक लोक व्याकुळ होत असतात. परंतु ' ईश्वरदर्शन होत नाहीं. ईश्वराच्या चरणकमलीं मन जडत नाहीं, ' म्हणून कितीसे लोक डोळ्यांतून पाणी काढतात बरें ?

* * * *

लहान मूल केव्हां केव्हां ‘ पैसा दे ’ म्हणून आई-जवळ हट्ट घेऊन बसतें, कधीं रडूं लागतें, तर कधीं खुंतून बसतें. त्याचप्रमाणें तुम्ही त्या आनंदस्वरूप ईश्वराचे दर्शनाकरितां लडिवाळ मुलाप्रमाणें शुद्ध अंतःकरणानें व्याकुळ व्हाल, तर दर्शन होण्याला क्षणाचाही विलंब लावणार नाहीं.

* * * *

पाण्यांत बुडाल्यावर जसे प्राण व्याकुळ होतात, तसे ईश्वरदर्शनार्थ जेव्हां प्राण व्याकुळ होतील तेव्हांच त्याचें दर्शन घडेल.

* * * *

एका आईला पुष्कळ मुलें होतीं. त्यांतील एकाला तिनें एक कांचेचा मणी दिला; दुसऱ्याला बाहुली दिली; तिसऱ्याला थोडासा खाऊ दिला. तेव्हां त्यांना आपल्या आईचा विसर पडला, आणि तीं आपआपल्या खेळण्याच्या नादांत गुंतलीं, असें पाहून आईही आपल्या घरांतील कामास निघून गेली. परंतु त्यांतील एका मुलानें आपली खेळावयाची वस्तू फेंकून दिली. आणि “आईग! ए आई!!” असें म्हणून रडत रडत आईकडे आलें. तेव्हां ती धांवत आली, आणि तिनें त्याचें मुख कुरवाळून त्यास कडेवर घेतलें. त्याचप्रमाणें हे मनुष्या! तूं आपल्या जगज्ज-

ननीला—आदिमातेला—विसरला आहेस, आणि जगांतील पोकळ अभिमानांत गुंतला आहेस. तो जर फेंकून देशील, आणि आपल्या आईकडे—जगन्मातेकडे—रडत जाशील, तर ती धांवत येऊन तुलाही कडेवर घेईल!

* * * *

साध्या कांचेवर कशाचेंही प्रतिबिंब उठत नाहीं, पण त्याच कांचेस रसायन लावलें कीं प्रतिबिंब (प्रतिमा) उठूं लागतें. (फोटोग्राफीचें उदाहरण आहेच.) त्याचप्रमाणें निर्मल मनावर भक्तीचें रसायन चढविलें कीं, भगवंताची सुंदर प्रतिमा दिसूं लागते. केवळ मन निर्मल आहे, पण भक्ति-रसायन नाहीं तर प्रतिमादर्शन होऊं शकणार नाहीं.

* * * *

प्रथम भाव, नंतर प्रेम (उत्कट भक्ति) आणि शेवटीं भावसमाधि—म्हणजे समरस होणें, असा क्रम असतो. जे अत्यंत प्रेमी आहेत ते नामसंकीर्तन करतां करतां प्रथम 'राधाकृष्ण जय' 'राधाकृष्ण जय' असा भजनाचा गजर करीत असतात. नंतर क्रमाक्रमानें भक्तिप्रेमांत बुडून जाऊन नुसता 'जय जय' असा शब्दघोष चालवितात, व शेवटीं नुसतें 'ज' एवढेंच म्हणत भावसमाधींत तल्लीन होऊन जातात.

अशा प्रकारें जो प्रेमकीर्तन करील त्याच्या बाह्योपाधि तुट-
तील व त्यास अनुपम शांतिसुख मिळेल.

*  *  *  *

भगवच्चरणारविंदीं एकदां प्रेम जडलें म्हणजे विष-
योपाधि आपोआपच तुटते. आधीं साखर खाल्लेली असली
म्हणजे मग दुसरा कोणताही गोड पदार्थ फिका लागतो.
तद्वत् भक्तिप्रेमापुढें दरोबस्त विषय व कर्में फिकीं पडत
जातात. मग त्यांची कांहीं मातब्बरी रहात नाहीं.

*  *  *  *

नुकतेंच लग्न झालेली बायको, मूल झालें नाहीं
तोंपर्यंत घरांतील कामकाज लक्ष्यपूर्वक करून रात्रंदिवस
त्यांतच खपत असते. पण तेंच तिला मूल झालें कीं पुरें,
तिनें गृहकृत्याकडे दुर्लक्ष केलेंच. मग तिला त्यामध्यें गोडीच
वाटेनाशी होते. ती साऱ्या दिवसभर त्या आपल्या लाडक्या
मुलाचें कौतुक करते, आणि त्याचे मुके घेत बसते. त्या
प्रमाणें मनुष्य अज्ञानावस्थेंत असतो तोंपर्यंत रात्रंदिवस नाना-
प्रकारच्या व्यवसायांत मग्न असतो. परंतु त्याच्या अंतःकर-
णांत परमेश्वराची ओळख झाली कीं पुरे, मग त्याला व्यव-
सायांत सुख वाटेनासें होतें. उलट परमेश्वराची सेवा
करण्यांत व तत्संबंधीं कृत्यें करण्यांतच त्याला परमानंद

वाटतो. दुसऱ्या कोणत्याही धंद्यापासून त्याला सौख्य होत नाहीं, आणि निर्मल प्रेमतंद्रींतून त्यास बाहेर पडवत नाही.

* * * *

एकदां एक ज्ञानी व एक भक्त असे एका जंगलांतून चालले होते. रस्त्यांत त्यांस एक वाघ भेटला. ज्ञानी होता तो म्हणाला, 'पळायचें कशासाठीं ? आपणांस वांचवायला ईश्वर समर्थ आहे.' भक्त म्हणाला, 'छे ! बाबा तें नाहीं कामाचें, आपण पळणार जी गोष्ट आपणा स्वतःला करतां येण्यासारखी आहे तीकरितां देवाला काय म्हणून त्रास द्यावयाचा !'

* * * *

ज्याच्यावर हरिभक्तीचा अंमल बसला तो म्हणतो 'हे भगवन्, मी यंत्र, तूं यंत्रचालक आहेस; मी गृह. तूं गृही ( घरमालक ) आहेस; मी रथ, तूं रथी आहेस. आपण जसें बोलवाल तसें मी बोलेन; आपण जसें चालवाल तसा मी चालेन, आणि आपण जसें करवाल तसे मी करीन.'

## ८ नारदाचा गर्व व निस्सीम भक्ति.

एकदां नारदमुनींस असा गर्व झाला कीं, माझ्यासारखा निस्सीम भगवद्भक्त कोणी आढळावयाचा नाहीं. तें भगवंतांनीं अंतर्साक्षित्वानें जाणलें. तेव्हां भगवान् ( श्रीकृष्ण ) म्हणाले, 'नारदा, चला आपण थोडें दूर फिरून येऊं.'

असें म्हणून उभयतां थोडे दूर गेले, तों एक ब्राह्मण त्यांच्या दृष्टीस पडला. पहावें तर तो हातानें अगदीं वाळून गेलेलें गवत खात होता आणि कमरेस तर तरवार लटकलेली! त्यास पाहिल्याबरोबर नारदांनीं ताडलें कीं, हा ब्राह्मण वैष्णव असावा. कारण वैष्णव धर्मीयांना हिंसा अगदीं वर्ज्य! हिरवें गवतसुद्धां जीव समजतात, व म्हणूनच ते वाळलेलें—मेलेलें—गवत खाऊन आपला निर्वाह करतात. परंतु त्याच्याजवळ तरवार पाहून मात्र नारदमुनि बुचकळ्यांत पडलें वैष्णव आणि त्याच्याजवळ तरवार हें काय गौडबंगाल आहे? त्याचें नारदास मोठें आश्चर्य वाटून त्यांनीं भगवंतास विचारलें, 'देवा! हें काय कोडें आहे? हा तर वैष्णव, ओल्या गवतालासुद्धां जीव समजणारा आणि ह्याच्याजवळ हें जीवहत्त्येचें साधन—तरवार—कशाला?' देव म्हणाले, 'नारदा, तें तूं त्या ब्राह्मणालाच विचारून ये.' नारदऋषि त्या ब्राह्मणाजवळ गेले व म्हणाले, 'महाराज! आपण तर कसलीही हत्त्या करीत नाहीं आणि हें हत्यार—तरवार—आपल्याजवळ कशाला?' ब्राह्मण म्हणाला, 'ही तरवार एवढ्याच करितां जवळ बाळगली आहे कीं, तीन असामी भेटले तर त्यांस शासन करावयाचें आहे.' नारद म्हणाले, 'कोण बरें ते तीन असामी?' ब्राह्मण म्हणाला, 'एक तो अर्जुन. केवढा कृतघ्न

पहा कीं, त्यानें माझ्या आवडत्या देवाला—श्रीकृष्णाला—भारती युद्धांत कुरुक्षेत्रावरून आपला रथ हाकायला लावलेन्!' नारद म्हणाले. 'बरें, आणखी दुसरें कोण?' ब्राह्मण म्हणाला, 'ती आपमतलबी द्रौपदी! तिला कांहीं तरी तारतम्य असायचें होतें! तिनं तर माझ्या भगवंताला शिळंच—एक भाजीचं पान—खायला घातलंन्' नारद म्हणाले, 'आणखी तिसरें कोण?' ब्राह्मण म्हणाला, 'तिसरा तो दुष्ट नारद.' नारदांनीं विचारलें, 'कां बरें? त्यानें काय केलें?' ब्राह्मण म्हणाला, 'कां? त्याचें कारण धाष्टर्य नाहीं तुमच्या लक्ष्यांत येत? अहो! रात्रंदिवस त्याचें भजन आणि वीणा चालला आहे भगवंताच्या कानाशीं! अगदीं दम पडूं देत नाहीं. त्याच्यामुळें भगवंताला अगदीं चैन नाहीं. परंतु माझ्या भगवंताच तिकडे काय होतें आहे, तें ह्याच्या गांवींही नाहीं!' त्या ब्राह्मणाची ती भक्ति—तें निस्सीम भगवत्प्रेम—पाहून नारद अगदीं चकित झाला, त्याच्या गर्वाचें अगदीं पाणी झालें, व तेव्हांपासून 'मीच काय तो मोठा भक्त' ही जी त्याची भावना होती ती निर्मूल झाली.

## ९ जीवांचें निरनिराळे प्रकार.

माशा दोन प्रकारच्या असतात—एक मधमाशी व दुसरी साधी माशी. मधमाशी जी आहे ती केवळ मधच

प्राशन करीत असते. पण दुसरी जी आहे ती वेळेनुसार मध प्राशन करते खरी, पण जेव्हां तिला एखादा व्रण किंवा चांगली चिघळलेली जखम आढळून येते तेव्हां ती मध सोडून त्या घाणीवर जाऊन पडते. त्याचप्रमाणें मनुष्येंही दोन प्रकारचीं आहेत-एक ईश्वरप्रेमी व दुसरा संसार-लालची. ईश्वरप्रेमी जो आहे तो एका ईश्वराराधनावांचून दुसरें कांहीं पहात नाहीं. आणि जो संसार-लालची आहे तोही ईश्वराराधन करतो खरा, पण कनक आणि कांता समोर आलीं कीं तो ईश्वरास सोडून त्यांत बुडालाच !

* * * *

कासवाच्या पाठीवर तरवार मारली तर तिची धारच बोथटून जाईल. पण कासवावर त्याचा कांहींच परिणाम होणार नाहीं. तद्वत् जे बद्ध जीव आहेत त्यांना धर्माचा किंवा नीतीचा कितीही उपदेश करा, पण त्यांच्यावर त्याचा बिलकुल परिणाम होत नाहीं.

* * * *

संसारी मनुष्य पोपटासारखा आहे. पोपट सदोदित 'राधे कृष्ण' 'राधे कृष्ण' असें सारखें म्हणत असतो, पण मांजरानें त्याजवर झडप घातली कीं, 'कें कें' ह्या शब्दाशिवाय त्यास दुसरें कांहीं आठवत नाहीं. त्याचप्रमाणें

जो संसारी आहे तो जों पावेतों स्वसुखांत आहे तों पावेतों धर्म, कर्म, ईश्वरगुणानुवाद, भजनपूजन सर्व कांहीं नित्य-नेमपूर्वक करीत असतो. पण आपत्प्रसंग आला कीं त्यानें त्या, सगळ्याला टाळा दिलाच !

*      *      *      *

गुरूनें आपल्या शिष्यास बोध केला कीं, 'बाबा! ईश्वर सर्व चराचर वस्तूंमध्यें भरून राहिला आहे.' शिष्यानें तेवढेंच ध्यानांत धरलें. एके दिवशीं तो रस्त्यानें जात असतां एक मस्त झालेला हत्ती समोरून आला. महातानें त्यास सांगितलें, 'बाबा! बाजूस हो.' पण त्यानें मनांत विचार केला कीं, 'मीही ईश्वर आहें व हत्तीही ईश्वर आहे. मग हत्तीला भिण्याचें कारण काय?' ह्या पोक्त विचारानें तो न हलतां तेथेंच उभा राहिला शेवटीं हत्तीनें जवळ येतांच त्यास सोंडेंत धरून दूर फेंकून दिलें. शिष्योत्तमांना चांगलेंच लागलें! तो गुरूपाशीं गेला व त्यानें त्यास सर्व वर्तमान निवेदन केलें. गुरु म्हणाला, 'अरे बाबा! हत्तीही ईश्वर आहे व तूंही ईश्वर आहेस, हे खरें. पण वरचा महातही ईश्वरच--त्यानें तुला 'बाजूस हो' म्हणून इषारा दिला असतां तू त्याचें कां ऐकलें नाहींस?'

*      *      *      *

एका विहिरींत एक बेडूक रहात असे. तो तेथेंच जन्म पावला व तेथेंच लहानाचा मोठा झाला. विहिरीच्या बाहेरही कांहीं जग म्हणून आहे, याची त्या बिचाऱ्याला कल्पनाही नव्हती. एक दिवस समुद्रांतला एक बेडूक त्यास सहजासहजीं भेटला. दोघांची गोष्टींनें गोष्ट निघतां निघतां विहिरींतील बेडकानें सहज त्यास विचारलें, 'भाऊ! तुमचा समुद्र समुद्र म्हणतात तो कितीसा मोठ आहे?' दुसरा म्हणाला, 'खूपच मोठा.' त्यावर कूपस्थानें आपल्या दोन्ही जांघा पसरून म्हटलें, 'काय? तुमचा समुद्र येवढा आहे?' पाहुणा म्हणाला, 'ह्याहून किती तरी मोठा आहे.' हें ऐकून पहिले मंडूकमहाराज विहिरीच्या ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत एक गिरकी मारून येऊन ऐटींत पुसतात 'ह्याहूनही तुमचा समुद्र मोठा आहे?' परस्थ म्हणाला, 'भल्या गृहस्था! कोणीकडे तो (प्रचंड) समद्र, आणि कोणीकडे विहीर! दोहोंची बरोबरी कशी होईल? समुद्र तो समुद्र आणि विहीर ती विहीर!' इतक्यानेंही कुपस्थ मंडुकराजांची खात्री पटेना. तो आपल्याशीं म्हणाला, 'काय? ह्या विहिरीहूनही मोठी अशी कांहीं वस्तु असणें शक्य तरी आहे काय?' ज्यांनीं कांहीं पाहिलें वा ऐकिलें नाहीं, आणि जे असें सम-

जतात की आपण जें काय पाहिलें किंवा ऐकिलें आहे त्याहून विशेष असें या जगांत—या संसारांत—कांहीं नाहीं अशा अज्ञान्यांचीही हीच अवस्था असते.

*    *    *    *

कसोटी लावली कीं सोनें का पितळ ह्याची पारख होते. तद्वत् ईश्वरासमोर निष्कपट कीं कुटिल ह्याची तावड-तोब परीक्षा होते.

*    *    *    *

गाईचा रंग निरनिराळा असतो. एकादी गाय काळी असते, एकादी बांडी असते, तर एकादी कबऱ्या रंगाची किंवा सफेत असते. परंतु त्या सर्वांचें दूध पहावें तों येथून तेथून एकच तऱ्हेचे म्हणजे पांढरेंच असतें. तद्वत् एकादा मनुष्य सुंदर असतो, एकादा काळा ढुस्स, कोणी सज्जन, कोणी दुर्जन असें पहाण्यांत येतें. पण त्या सर्वांत भरून राहिलेला ईश्वर एकच आहे.

## १० साधनांत काय पाहिजे ? धीर.

**मागें पाऊल घेऊ नका—सारखें पुढें चला.**

एका मनुष्यानें परमहंसांस विचारलें, ‘ मी आज पुष्कळ दिवस साधन करीत आहे, पण मला अजून थोडी-

सुद्धां सिद्धि मिळाली नाहीं. मग काय माझें साधन सारें फुकट गेलें?' परमहंस किंचित स्मित करून म्हणाले:— 'हें पहा! जो पिढीजाद शेतकरी आहे तो बारा वर्षें जरी अवर्षण पडलें तरी शेती सोडणार नाहीं. परंतु जो उपरी शेतकरी आहे–'शेती केल्यापासून फार फायदा आहे.' एवढें नुसतें ऐकूनच ज्यानें शेती करण्यास सुरवात केली–तो एक साल अवर्षण झालें कीं, ताबडतोब शेती सोडून देईल. तसाच जो खरा—एकनिष्ठ—भक्त आहे तो सारा जन्म ईश्वर-साधन करून सुद्धां जरी त्याची प्राप्ति झाली नाहीं तरी निराश होत नाहीं. इतकेंच नव्हे तर निरंतर साधनांतच मग्न असतो.

* * * *

समुद्रांत एक प्रकारचीं कालवें असतात. तीं सदोदित शिंपल्याचें तोंड उघडून समुद्रसपाटीवर तरंगत असतात. पण स्वातीच्या पावसाचा थेंब तोंडांत पडला पुरे कीं, तीं जीं खालीं जातात तीं फिरून कधीं वर येत नाहींत. तत्त्व-जिज्ञासु—श्रद्धावान्-साधकसुद्धां अशाच प्रकारें गुरूपदेशामृताचा एक बिंदु जरी मिळाला तरी साधनाच्या अगाध समुद्रांत बुडी देतो. दुसरीकडे ढुंकूनसुद्धां पहात नाहीं.

* * * *

बड्या लोकांची गांठ घ्यावयाची तर आधीं कितीतरी देवडीवाल्यांची खुशामत करावी लागते. त्याचप्रमाणें भगवद्‍दर्शनार्थही अनेक प्रकारचें भजनपूजन, योगयाग इ० साधनांचा आणि इतर नानाप्रकारच्या उपायांचा अवलंब करावा लागतो.

## ११ ध्यान कसें करावें?

ध्यानांत पूर्ण तन्मयता आली पाहिजे. जेव्हां ध्यान परिपूर्ण होतें, तेव्हां एकादा पक्षी अंगावर बसला तरी सुद्धां त्याची आपणांस दाद लागत नाहीं. मी (अर्थात् रामकृष्ण परमहंस) जेव्हां कालीच्या मंदिरांत बसून ध्यान करीत असें तेव्हां कैक लोक सांगत कीं, 'तुमच्या अंगावर अनेक पक्षी बसून क्रीडा करीत होते.'

* * * *

साधुपुरुष रात्रीं बिछान्यांत पडून पडूनच नुसतें तोंडावर पांघरूण घेऊन ध्यान करीत असतात. लोकांना वाटतें ते निजलेच आहेत. त्यांचें बाहेर कांहींही दिसण्यांत येत नाहीं.

## १२ बरेंवाईट कर्म.

कोसल्यांतला किडा त्याच्या तोंडांत असलेल्या एक प्रकारच्या रसानें आपलें घर (कोसला) तयार करतो आणि

त्यांत आपल्याला गुंडाळून घेतो. त्याचप्रमाणें संसारी जीव आपल्या कर्मांनींच आपणांस बद्ध करून घेतात. त्या किडयाचें पोर झालें म्हणजे तें तो कोसला फोडून बाहेर पडतें. तद्वत् विवेक आणि वैराग्य बाणल्याबरोबर जीव आपला आपणच मुक्त होतो.

* * * *

पारा आणि पाप कोणी छपवूं शकत नाहीं. जर एखाद्यानें गुप्त रीतीनें पारा खाल्ला तर तो केव्हांना केव्हां आंगावर फुटणारच. त्याचप्रमाणें पापकर्माचेंही केव्हांना केव्हां प्रायश्चित्त भोगावें लागतेंच.

## १३ पूर्णत्वाची पायरी.

जहाज कोणत्याही दिशेला का जाईना होकायंत्राचा कांटा सदोदित उत्तरेलाच झुकावयाचा. त्यामुळें जहाज आपली इष्ट दिशा चुकत नाहीं. त्याचप्रमाणें मनुष्याचें मन सदोदित ईश्वराकडे असेल तर तो संसारांत केव्हांही भुलणार नाहीं.

* * * *

आंबा पिकला म्हणजे आपोआप गळून पडतो, त्याचप्रमाणें ज्ञानाचा प्रकाश झाला कीं जीवाचें ‘ अहं ’ ही आपोआप नाहींसें होतें.

* * * *

बीं जमिनींत पेरलें कीं त्यास अंकुर फुटून त्याचें झाड तयार होतें. पण तेंच बीं भाजून पेराल तर त्यास बिलकुल अंकुर फुटणार नाहीं. त्याचप्रमाणें जो सिद्ध-पदाला पोंचला, त्याला फिरून या संसारांत जन्म घ्यावा लागत नाहीं.

* * * *

परिसाच्या स्पर्शानें एकदां लोखंडाचें सोनें झालें म्हणजे मग तें तुम्ही जमिनींत पुरून ठेवा कीं उकिरड्यावर फेंकून द्या, तरी तें सोनेंच्या सोनेंच असावयाचें. तें पुन्हां लोखंड व्हावयाचें नाहीं. त्याप्रमाणें परमेश्वराच्या स्पर्शानें ज्याचें अंतःकरण एकवार पुनीत झालें, तो संसाराच्या उपद्-व्यापांत असो, कीं अरण्यांतल्या एकांतात असो, त्याला अपवित्रता कधीं शिवावयाची नाहीं.

* * * *

लोखंडाच्या तरवारीला परीस लावला, तरं ती सुवर्णाची होते. तिचा आकार पूर्वींप्रमाणें असावयाचा तसाच असतो, परंतु लोखंडाच्या तरवारीप्रमाणें कोणास मारावयाचें मात्र तिच्यानें होत नाहीं. तद्वत् ईश्वरचरणांचें जो सान्निध्य पावतो, त्याच्या आकारांत कांहीं बदल होत नाहीं, पण पुढें तो कोणाचें वाईट म्हणून करीत नाहीं.

अनुक्रम १२३५० वि. क्रि. २०१५ नों. दि. ३०।७।५४

## १४ साधनमार्ग.

गुरुवाक्यावर अढळ—एक नंबरचा—विश्वास असल्या शिवाय ईश्वरप्राप्ति कदापि व्हावयाची नाहीं.

*　*　*　*

सत्संग तांदळाच्या धुवणासारखा आहे. ज्याला निशा फार चढली असेल त्याला तांदळाचें धुवण दिलें कीं उतार पडतो. त्याचप्रमाणें संसारमदानें धुंद झालेल्यांना उतार म्हणजे एक सत्संगच होय.

*　*　*　*

नामाची आवड व नामविश्वास उत्पन्न झाला म्हणजे दुसऱ्या कसल्याही साधनाची गरज रहात नाहीं. नामाच्या प्रभावानें त्याचे सर्व संशय दूर होतात, नामानें चित्त शुद्ध होतें व नामानेंच भगवत्साक्षात्कार होतो.

## १५ ईश्वरप्राप्तीच्या मार्गांतील अडथळे.

ओल्या मातीचें भांडें घडवितां येतें, परंतु तीच सुकली तर तें बनवितां येत नाहीं. तसेंच ज्याचें चित्त विषय-लोलुपतेनें मलिन—जड—झालेलें आहे, त्याच्या हातून काल-त्रयीं परमार्थाचें कार्य होणार नाहीं.

*　*　*　*

बीं जमिनींत पेरलें कीं त्यास अंकुर फुटून त्याचें झाड तयार होतें. पण तेंच बीं भाजून पेराल तर त्यास बिलकुल अंकुर फुटणार नाहीं. त्याचप्रमाणें जो सिद्ध-पदाला पोंचला, त्याला फिरून या संसारांत जन्म घ्यावा लागत नाहीं.

*     *     *     *

परिसाच्या स्पर्शानें एकदां लोखंडाचें सोनें झालें म्हणजे मग तें तुम्ही जमिनींत पुरून ठेवा कीं उकिरड्यावर फेंकून द्या, तरी तें सोनेंच्या सोनेंच असावयाचें. तें पुन्हां लोखंड व्हावयाचें नाहीं. त्याप्रमाणें परमेश्वराच्या स्पर्शानें ज्याचें अंतःकरण एकवार पुनीत झालें, तो संसाराच्या उपद्-व्यापांत असो, कीं अरण्यांतल्या एकांतात असो, त्याला अपवित्रता कधीं शिवावयाची नाहीं.

*     *     *     *

लोखंडाच्या तरवारीला परीस लावला, तर ती सुवर्णाची होते. तिचा आकार पूर्वींप्रमाणें असावयाचा तसाच असतो, परंतु लोखंडाच्या तरवारीप्रमाणें कोणास मारावयाचें मात्र तिच्यानें होत नाहीं. तद्वत् ईश्वरचरणांचें जो सान्निध्य पावतो, त्याच्या आकारांत कांहीं बदल होत नाहीं, पण पुढें तो कोणाचें वाईट म्हणून करीत नाहीं.

अनुक्रमांक १०३५८० वि. क्रमांक २०१५ नों. दि. ३०।७।५४

## १४ साधनमार्ग.

गुरुवाक्यावर अढळ—एक नंबरचा—विश्वास असल्याशिवाय ईश्वरप्राप्ति कदापि व्हावयाची नाहीं.

* * * *

सत्संग तांदळाच्या धुवणासारखा आहे. ज्याला निशा फार चढली असेल त्याला तांदळाचें धुवण दिलें कीं उतार पडतो. त्याचप्रमाणें संसारमदानें धुंद झालेल्यांना उतार म्हणजे एक सत्संगच होय.

* * * *

नामाची आवड व नामविश्वास उत्पन्न झाला म्हणजे दुसऱ्या कसल्याही साधनाची गरज रहात नाहीं. नामाच्या प्रभावानें त्याचे सर्व संशय दूर होतात, नामानें चित्त शुद्ध होतें व नामानेंच भगवत्साक्षात्कार होतो.

## १५ ईश्वरप्राप्तीच्या मार्गांतील अडथळे.

ओल्या मातीचें भांडें घडवितां येतें, परंतु तीच सुकली तर तें बनवितां येत नाहीं. तसेंच ज्याचें चित्त विषयलोलुपतेनें मलिन—जड—झालेलें आहे, त्याच्या हातून कालत्रयीं परमार्थाचें कार्य होणार नाहीं.

* * * *

जोंपावेतों मनांत वासनालेश वास करतो आहे तों पावेतों ईश्वरप्राप्ति होण्याचें नांवच नको. उघडच आहे कीं, दोऱ्याला थोडीशी गांठ आहे तोंपर्यंत दोरा कांहीं नेडयांत जावयाचा नाहीं. तेंच मन जर वासनेचा मल झडून शुद्ध होईल तर ईश्वरप्राप्ति लगोलग!

*   *   *   *

ज्याच्या भावरूप घरांत चोरी होत नाहीं, त्याला ईश्वरलाभ घडतो. अर्थात् शुद्ध भाव व विश्वास यांनीं ईश्वर मिळतो.

## १६ प्रपंच आणि परमार्थ.

कोणी एकानें परमहंसास विचारलें, 'संसारांत राहून ईश्वरोपासना हातून कशी घडेल?' परमहंस म्हणाले, 'स्त्रिया धान्य कुटीत असतांना तुम्हीं पाहिलें नाहीं काय? त्या एका हातानें मुसळ चालवतात, आणि दुसऱ्या हातानें उखळांतला घांस नीट करीत असतात. मध्येंच मूल येतें, त्यास स्तनपान देत असतात. इतक्यांत कोणी तरी येतें व त्याच्याशीं त्यांच्या गप्पासप्पाही चालतात. परंतु त्यांचें सर्व लक्ष्य पहावें तों मुसळापाशीं—तें कसें चाललें आहे, ह्याकडे! जरा चकलें कीं हाताचा चेंदामेंदा होऊन जावयाचा! त्याच-

प्रमाणें संसारांत राहून सर्व कांहीं करावें, पण चित्त मात्र भगवत्स्वरूपीं असावें. त्याच्याकडचें लक्ष्य चळलें कीं, अनर्थ ओढवलाच!

* * * *

जारिणी स्त्री आपल्या आप्तपरिवारांत राहून घर-काम करीत असते, पण तिचें सर्व चित्त आपल्या प्रियकराकडे लागलेलें असतें. त्याच्या भेटीसाठीं तिचें मन अगदीं आतुर होत असतें. त्याचप्रमाणें तुम्हीही संसारकर्मे करीत जा, पण चित्त एकसारखें परमेश्वराकडे असूं द्या.

* * * *

एका शेतकऱ्यानें शेताला चांगलें पाणी मिळावें म्हणून सर्व दिवसभर मोट चालविली. परंतु संध्याकाळीं येऊन पाहतो तों पाण्याचा एक टिपूसही दिसेना. शेतांत कांहीं खड्डे होते, त्यांत सर्व पाणी गडप झालें. त्याचप्रमाणें जो मनुष्य विषय, वासना, मानसन्मान-लौकिक ह्यांच्या भरीं पडून परमार्थसाधन करूं पाहतों, त्याचें तें साधन व्यर्थ होतें. जन्मभर ईश्वरोपासना करूनसुद्धां शेवटीं जों पाहतो तों काय? त्यास ताबडतोब कळून येतें कीं, आपली सारी उपासना वासनांच्या खाचेंत वाहून गेली!

## १७ साधक आणि भक्ति.

एकच मनुष्य कोणाचा बाप, कोणाचा भाऊ, कोणाचा मुलगा, कोणाचा मामा, कोणाचा जांवई तर कोणाचा सासरा असतो. म्हणजे पहा बरें, एकच मनुष्य पण त्याचे संबंधभेदानें किती प्रकार होतात? त्याचप्रमाणें सच्चिदानंद, एकच, पण त्याचें भक्तमंडळ शांत, दास्य, वात्सल्य, मधुर इत्यादि नाना भावनेनें त्याची उपासना करीत असतें.

* * * *

जसा ज्याचा भाव तसेंच त्याला फळ मिळतें. म्हणजे ज्याला खुद्द ईश्वर पाहिजे असतो, त्याला तोच मिळतो; आणि ज्याला ईश्वर नको पण त्याचें ऐश्वर्य मात्र हवें आहे, त्याला तेंच प्राप्त होतें.

ॐ !

REFBK-0003832
अनुक्रम ........
नों. दि.
दा. क. ....
नालय